www.rajdand.com
सातारा/पुणे, गुरुवार
19.01.2024
पृष्ठ : ४ । मुल्य : ४ । पौष कृ.२९
rajdandlive
Reg.No.MAHMAR/17902/1999

मराठी माणसाचा मानदंड
राजदंड
स्थापना १९९९

२५ वर्षे विश्वासार्हतेची

# शालेय स्तरावर ‘कोचिंग सेंटर’ बंद!

## केंद्र सरकारच्या नियमावलीमध्ये महत्त्वाची तरतूद

**मुंबई : केंद्र शासनाने इयत्ता दहावीच्या खालील (किंवा १६ वर्षांखालील) विद्यार्थ्यांना ह्यकोचिंग सेंटरह्नमध्ये प्रवेश देण्यास मनाई केली आहे. विद्यार्थी आत्महत्या, स्पर्धापरीक्षा आणि प्रवेश परीक्षांच्या तयारीच्या नावाखाली वाढलेली खासगी शिकवण्यांची दुकानदारी आणि मनमानी कारभारावर अंकुश ठेवण्यासाठी केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने शिकवण्यांसाठी नियमावली जाहीर केली आहे.**



स्पर्धा परीक्षा आणि प्रवेश परीक्षांच्या तयारीसाठी राजस्थानमधील कोटासह देशभरातील अनेक शहरे खासगी शिकवण्यांसाठी प्रसिद्धी पावत आहेत. विद्यार्थ्यांना उसंत न देता, काळ वेळ न पाहता परीक्षेसाठी घोकंपट्टीचा रेटा लावणाऱ्या शिकवण्यांच्या कारभारावर सातत्याने टीकाही होत असते. विद्यार्थ्यांच्या वाढत्या आत्महत्यांमुळे या शिकवण्यांचा कारभार गेल्या दोन वर्षांपासून अधिक चर्चेत असून त्याबाबत खासदारांनी अधिवेशनात प्रश्न उपस्थित केले होते. या पाश्वर्भूमीवर केंद्राने खासगी शिकवण्यांना नियमावलीच्या चौकटीत बांधण्याचा प्रयत्न केला आहे. या नियमावलीनुसार आता पहिलीपासून सुरू असलेले मोठे शिकवणी वर्ग बंद करावे लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे शिकवण्यांचा आवाका दहावीनंतर प्रवेश देता येणाऱ्या आणि स्पर्धा परीक्षांच्या तयारीपुरत्याच राहण्याची शक्यता आहे.

पुढील तीन महिन्यांत नव्याने सुरू होणाऱ्या किंवा असलेल्या शिकवण्यांनी नोंदणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. नोंदणी, पडताळणी, कारवाई आणि एकूण नियमनाची जबाबदारी राज्य शासनांची असेल, असेही नियमावलीत स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच आपल्या शिकवणी केंद्रातील सुविधा, शुल्क, शिक्षकांची माहिती, त्यांची पात्रता, समुपदेशकांचे तपशील, अभ्यासक्रम, अभ्यासक्रमाचा कालावधी, वसतीगृह असल्यास त्याची माहिती, शुल्क आदी तपशील संकेतस्थळावर जाहीर करणे बंधनकारक असेल. सुट्टीच्या दिवशी कोणतीही परीक्षा घेण्यात येऊ नये, असेही नियमावलीत स्पष्ट करण्यात आले आहे.

एखाद्या विद्यार्थ्याने प्रवेश घेतल्यानंतर काही कालावधीने प्रवेश रद्द केला, तर त्याला उर्वरित कालावधीचे शुल्क परत करण्यात यावे. त्याचबरोबर वसतीगृह, खाणावळ याचेही शुल्क परत करावे, अशी तरतूद करण्यात आली आहे.

कोचिंग सेंटर किंवा शिकवणी संस्था कशाला म्हणावे, याची व्याख्याही नियमावलीत करण्यात आली आहे. त्यानुसार एका वर्गात पन्नास किंवा त्यापेक्षा अधिक विद्यार्थी शालेय, महाविद्यालयीन किंवा विद्यापीठाच्या अभ्यासक्रमाला पूरक, स्पर्धा परीक्षा किंवा प्रवेश परीक्षांच्या तयारीसाठी खासगी शिकवणी असेल, तर त्या संस्थांना कोचिंग सेंटर संबोधण्यात आले आहे. कला, खेळ किंवा तत्सम प्रशिक्षण वर्गासाठी ही नियमावली लागू नसेल. घरगुती स्वरूपात घेण्यात येणाऱ्या शिकवण्यांचाही नियमावलीत उल्लेख नाही. त्यामुळे दहावीच्या खालील विद्यार्थ्यांच्या घरगुती शिकवण्यांसाठी बंधने लागू होणार नाहीत.

### नियमावलीमध्ये काय?

* दहावी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व १६ वर्षावरील विद्यार्थ्यांनाच कोचिंग सेंटरमध्ये प्रवेश
* किमान पदवी उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांचीच शिक्षक म्हणून नियुक्त
* प्रत्येक कोचिंग सेंटरमध्ये समुपदेशाची नियुक्ती बंधनकारक
* नियमांचे उल्लंघन केल्यास १ लाख रुपयांपर्यंत दंड किंवा नोंदणी रद्द करण्याची कारवाई
* परीक्षेत अव्वल विद्यार्थी आपल्याच सेंटरमध्ये शिकल्याचे फलक लावण्यास मज्जाव
* गुणवत्ता यादीत स्थानाचे आश्वासन देण्यास बंदी
* तशा आशयाच्या जाहिराती थेट किंवा आडवळणाने करण्यास मनाई
* आठवडयाची सुट्टी, तसेच सण, उत्सवांच्या कालावधीत सुट्टी देणे आवश्यक

# शाळकरी विद्यार्थ्यांनी भरलेली बोट उलटली

## दोन शिक्षकांसह १२ मुलांचा मृत्यू




**गुजरात :** गुजरातमध्ये मोठी दुर्घटना घडली आहे. वडोदऱ्यातील हणी तलावात शाळकरी विद्यार्थ्यांनी भरलेली बोट उलटली आहे. या घटनेत दोन शिक्षक, १२ विद्यार्थ्यांसह १४ जणांचा मृत्यू झाला आहे. या घटनेनंतर अग्निशमन दलाकडून तलावात शोधमोहीम सुरू आहे.

२७ विद्यार्थ्यांची सहल हणी तलावात बोटिंगसाठी आली होती. बोटवरील एकाही जणानं सुरक्षेसाठी लाइफ जॅकेट घातलं नव्हतं. तलावात गेल्यानंतर विद्यार्थ्यांसह बोट उलटली. यात बोटमधील २७ जण तलावात पडले. यामध्ये दोन शिक्षक, १२ विद्यार्थ्यांसह १४ जणांचा मृत्यू झाला आहे.

याची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे कमर्चारी घटनास्थळी तातडीनं दाखल झाले. अग्निशमन दलाकडून तलावात शोधमोहीम सुरू करण्यात आली आहे. काही विद्यार्थ्यांना वाचवण्यात अग्निशमन दलाला यश मिळालं आहे.

वडोदरा अग्निशमन दलाचे अधिकारी पार्थ ब्रह्मभट्ट पीटीआयला संवाद साधताना म्हणाले, ह्लशालेय विद्यार्थींची सहल बोटींगसाठी दुपारी हणी तलावात आली होती. पण, विद्यार्थ्यांसह ही बोट तलावात उलटली. अग्निशमन दलानं सात विद्यार्थ्यांना वाचवलं आहे. बेपत्ता विद्यार्थ्यांची शोधमोहीम सुरू आहे.

गुजरातचे आरोग्यमंत्री ऋषिकेश पटेल यांनी दोषींवर कडक कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. ह्नही घटना अत्यंत दुःखद आहे. मृत्यूमुखी पडलेल्यांच्या कुटुंबाला हे दुःख सहन शक्ती मिळो. या घटनेला जबाबदार असणाऱ्या दोषींवर कडक कारवाई केली जाईल, असं ऋषिकेश पटेल यांनी सांगितलं.

# राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२२ ची सवर्साधारण गुणवत्ता यादी जाहीर

**पुणे :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२२ ची सवर्साधारण गुणवत्ता यादी गुरुवारी जाहीर करण्यात आली. त्यात विनायक पाटील यांनी राज्यात पहिला क्रमांक मिळवला. एमपीएससीने सवर्साधारण गुणवत्ता यादी आणि संबंधित माहिती संकेतस्थळावर प्रसिद्ध केली. राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२२ विविध २३ संवर्गातील ६३३ पदांसाठी घेण्यात आली होती. राज्यसेवेची आतापर्यंतची सर्वाधिक पदांची भरती प्रक्रिया असल्याने राज्यभरातील उमेदवारांचे या निकालाकडे लक्ष लागले होते. एमपीएससीने जाहीर केलेल्या सवर्साधारण गुणवत्ता यादीमध्ये धनंजय बांगर यांनी राज्यात द्वितीय, तर सौरभ गावंडे यांनी तृतीय क्रमांक मिळवला. एकूण १८३० उमेदवारांचा समावेश आहे.




सवर्साधारण गुणवत्ता यादी तात्पुरत्या स्वरुपाची आहे. अर्जामधील विविध दाव्यांच्या अनुषंगाने अंतिम निकालापूवी प्रमाणपत्रे, कागदपत्रे पडताळणी करताना काही उमेदवारांच्या दाव्यामध्ये बदल होऊ शकतो. तसेच उमेदवाराचा गुणवत्ताक्रम बदलू शकतो. न्यायालयात, न्यायाधिकरणात दाखल न्यायिक प्रकरणांतील अंतिम न्यायनिणर्याच्या अधीन राहुन सवर्साधारण गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आली आहे. परीक्षेतील पदांसाठी पसंतीक्रमाचे पर्याय सादर करण्यासाठीची प्रक्रिया २२ जानेवारीपासून सुरू करण्यात येणार आहे. अधिसूचित संवर्ग-पदांसाठी १ ते २३ यातील पसंतीक्रम निवडणाऱ्या उमेदवारांचा त्यांनी दिलेल्या पसंतीक्रमानुसार सर्व पदांवरील निवडीसाठी विचार होईल. २३ संवर्गांपैकी ज्या पदावरील निवडीसाठी इच्छुक आहे, केवळ त्याच पदासाठी पसंतीक्रम सादर करावेत. निवडीसाठी इच्छुक नसलेल्या पदासाठी नो प्रेफरन्स हा पर्याय निवडावा. पसंतीक्रम सादर केल्यानंतर त्याची पीडीएफ उमेदवाराला डाऊनलोड करून जतन करता येणार आहे. पसंतीक्रमाचे पर्याय केवळ ऑनलाइन पद्धतीनेच सादर करणे आवश्यक असून, त्यासाठीची अंतिम मुदत २९ जानेवारी आहे. या मुदतीनंतर संवर्ग, पदांचे पसंतीक्रम सादर करण्याची किंवा बदलण्याची विनंती मान्य केली जाणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले.

### राज्यात पहिल्या आल्याचा आनंद

मी मूळचा कोल्हापूर जिल्ह्यातील भुदरगरड येथील आहे. आई-वडील शेती करतात. राज्यसेवेचा माझा दुसरा प्रयत्न होता. पहिल्या प्रयत्नातून उपशिक्षणाधिकारी पदासाठी निवड झाली आहे. मी संख्याशास्त्र विषयात फर्ग्युसन महाविद्यालयातून पदवी प्राप्त केली आहे.

**- विनायक पाटील,**
राज्यात पहिला

# आमदार शिवेंद्रसिंह राजेंसह ४८ जणांची निर्दोष मुक्तता

**वाई:** जिल्हाधिकाऱ्यांच्या जमावबंदी आदेशाचे उल्लघंन केल्या प्रकरणी आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्यासह ४८ जणांची जिल्हा न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली.सातारा शहरात ६ ऑक्टोबर २०१७ रोजी आनेवाडी टोल नाक्यावरून वाद झाला होता.शासकीय विश्रामगृह येथे आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या कार्यकर्त्यांकडून याप्रकरणावरून गोंधळ झाला होता. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांच्या जमावबंदी आदेशाचे उल्लघंन केल्याच्या कारणातून सातारा शहर पोलीस ठाण्यात कमर्चारी झोपाळे यांनी गुन्हा दाखल केला होता.

दि. ६ ऑक्टोबर २०१७ रोजी सायंकाळच्या सुमारास शासकीय विश्रामगृहावर जमलेल्या आमदार शिवेंद्रसिंहराजे यांच्यासह जिल्हा परिषदेचे माजी सदस्य राजू भोसले, सातारा कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी अध्यक्ष ॲड विक्रम पवार, माजी उपनगराध्यक्ष अमोल मोहिते, जयेंद्र चव्हाण, सामाजिक कार्यकर्ते रवी पवार, फिरोज पठाण यांच्यासह ४८ जणांच्या विरोधात दि. ११ ऑक्टोबर २०१७ पुन्हा नोंदविण्यात आला होता. पोलिसांनी दोषारोप पत्र सादर केले होते. यावर न्यायालयात दुसरे तदर्थ जिल्हा सत्र न्यायाधिश साळवे यांच्यासमोर सुनावणी सुरु होती.सरकार पक्षाच्यावतीने पाच साक्षीदार तपासण्यात



आले. हे पाचही साक्षीदार पोलीस कमर्चारी होते. शिवेंद्रसिंहराजे यांच्यासह इतरांच्या वतीने ॲड वसंत नारकर आणि शिवराज धनावडे यांनी हा गुन्हा आमच्या आशिलांना मान्य नाही, चुकीच्या पद्धतीने फिर्याद दाखल करण्यात आली आहे, असे म्हणणे न्यायालयात मांडले.

या प्रकरणात न्यायालयाने दोन्ही बाजूकडून म्हणणे ऐकून घेतले. सरकार पक्षाचा युक्तीवाद फेटाळून लावत बचाव पक्षाचा युक्तीवाद ग्राह्य मानून आमदार शिवेंद्रसिंहराजे यांच्यासह ४८ जणांची निर्दोष मुक्तता केली.या निकालाने कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण होते.आमदार शिवेंद्रसिंहराजे निकाल ऐकण्यासाठी न्यायालयात हजर होते. निकालामुळे त्यांच्या कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.याच दिवशी कोजागिरीच्या पोणिर्मेच्या रात्री शक्रवार पेठेत गोळीबारही झाला होता.त्याचा वेगळा गुन्हा दाखल होता.

# राजन साळवी यांच्यासह पत्नी, मुलावर गुन्हा

**रत्नागिरी :** शिवसेनेचे (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आमदार राजन साळवी यांच्या घरी आणि हॉटेलवर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी गुरुवारी छापा टाकून त्यांच्यासह त्यांच्या पत्नी अनुजा आणि मुलगा शुभम यांच्याविरुद्ध बेहिशेबी मालमत्ता जमा केल्याचा गुन्हा दाखल केला. रत्नागिरी विभागाचे उपअधीक्षक सुशांत चव्हाण यांच्यासह सुमारे २० अधिकारी-कमर्चारी या कारवाईत सहभागी झाले. त्याचबरोबर रायगडच्या लाचलुचपत विभागाचेही काही अधिकारी येथे दाखल झाले आहेत. गुरुवारी सकाळी ८ वाजल्यानंतर लाचलुचपत विभागाचे पथक आमदार साळवी यांच्या बंगल्यासह सात विविध ठिकाणी दाखल झाले. सायंकाळी उशिरापर्यंत कागदपत्रे आणि इतर वस्तूंची तपासणी चालू होती.

आमदार साळवी यांनी ऑक्टोबर २००९ ते २ डिसेंबर २०२२ या कालावधीत रत्नागिरी शहर हद्दीत आणि जिल्ह्यात वेगवेगळ्या ठिकाणी सुमारे तीन कोटी ५३ लाख ८९ हजार ७५२ रुपयांची बेहिशेबी मालमत्ता जमा केल्याचे स्पष्ट झाले आहे. त्याबाबतचे समाधानकारक स्पष्टीकरण त्यांनी सादर केले नाही. त्यामुळे त्यांच्यासह पत्नी आणि मुलगा यांच्या विरुद्ध गुन्हे दाखल केले असल्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या निवेदनात म्हटले आहे.

# राममंदिर लोकार्पण सोहळा

## भाजपकडून जल्लोषाची जोरदार तयारी

**मुंबई :** अयोध्येत २२ जानेवारी रोजी होत असलेल्या राम मंदिर लोकार्पण आणि श्रीराममूतीच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्ताने भाजपने राज्यभरात जल्लोषासाठी जोरदार तयारी केली आहे. प्रत्येक शहरात आणि ग्रामीण भागातही मंदिरांमध्ये त्याचबरोबर अन्यत्रही विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून त्यात महायज्ञ, प्रवचने, गीतरामायण, भजन, अयोध्येतील राम मंदिराच्या प्रतिकृतीचे सादरीकरण असे विविध कार्यक्रम होत आहेत.

राम मंदिरात दशर्नासाठी जाण्याकरिता घरोघरी आमंत्रण देण्याचा उपक्रम गेले काही दिवस सुरू असून अयोध्येहून आलेल्या अक्षतांचे वाटप भाजप, विश्व हिंदू परिषद, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व अन्य कार्यकर्त्यांकडून सुरू आहे. मुंबई, कल्याण-डोंबिवली, ठाणे आदी ठिकाणी श्रीरामाचे कटआऊट असलेले रथ सजविण्यात आले असून ते शहरांमध्ये फिरून कार्यक्रमाचे आमंत्रण देत वातावरणनिमिती करीत आहेत.

गिरगाव येथील लोकमान्य टिळक उद्यान नामकरण सोहळा गुरुवारी आयोजित करण्यात आला होता आणि येथे श्रीरामाच्या जीवनावर आधारित ध्वनिप्रकाश शो प्रदर्शित करण्यात आला आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपनगर पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, शहर पालकमंत्री दीपक केसरकर, आमदार प्रवीण दरेकर आदींच्या उपस्थितीत त्याचे उद्घाटन करण्यात आले. मुंबई भाजप आमदार ॲड. आशीष शेलार यांच्या पुढाकाराने दादर येथील छत्रपती शिवाजी महाराज उद्यान गणेश मंदिराजवळ ४५ फूट भव्य श्रीरामाची मूती आणि मंदिराची उभारणी करण्यात आली असून तेथे नेत्रदीपक रोषणाई करण्यात आली आहे.

राज्यात २२ जानेवारीला सार्वजनिक सुट्टी जाहीर करावी, अशी मागणी भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, आमदार अतुल भातखळकर व इतरांनी केली असून त्याबाबत एक-दोन दिवसांत निर्णय अपेक्षित आहे.



दीपोत्सव, रोषणाई, संगीत..

* भाजपच्या प्रदेश कार्यालयापुढे श्रीरामाचा भव्य कटआऊट आणि अयोध्येतील राम मंदिराची प्रतिकृती उभारण्यात आली आहे.

* मुंबई भाजपने लक्षावधी दिवे लावून दीपोत्सव साजरा करण्याचे आवाहन केले आहे.

* भाजप नेते अतुल शहा यांच्या पुढाकाराने प्रभू रामचंद्रांवरील दोन मराठी व हिंदी गाण्यांचे प्रसारण फडणवीस यांच्या हस्ते गुरुवारी करण्यात आले. कवी मोहन कामत असून संगीतकार दत्ता थिटे व गायक डॉ. राहुल जोशी, मोना कामत, रिंकू गिरी हे या वेळी उपस्थित होते.

* भाजपचे राष्ट्रीय संयोजक डॉ. राजेंद्र फडके यांनी राम मंदिर लोकापर्णानिमित्ताने छोटया डायऱ्यांचे वाटप सुरू केले आहे.

* भाजप आमदार, खासदार आणि अन्य पदाधिकाऱ्यांच्या पुढाकाराने बहुसंख्य विभागात मिरवणुका, रामनाम जप, रांगोळ्या, दीपोत्सव आदी विविध कार्यक्रमांचे आयोजन राज्यभरात करण्यात आले आहे.

२२ जानेवारीला राज्यभरात दिवाळीप्रमाणे जल्लोष, दीपोत्सव, रोषणाई, फटाके, मिठाईवाटप आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यासाठी विभागस्तरावर कार्यकर्त्यांच्या बैठका होत आहेत. * मूतिर्कारांकडे श्रीराममूती आणि दुकानांमधून रामाच्या छायाचित्रांची मागणी प्रचंड वाढली आहे.

# उदयनराजेंकडून वाईच्या गणपती घाटावर स्वच्छता मोहीम

**वाई:**वाईच्या गणपती घाटावर खासदार उदयनराजे भोसले यांनी गुरुवारी आपल्या समथर्कांसह स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतला.यावेळी माजी आमदार मदन भोसले व भाजपा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. अयोध्येत प्रभू श्रीरामचंद्रांच्या मंदिरात मूती प्राणप्रतिष्ठा महासोहळा साजरा होत आहेत. यावेळी देशाच्या विविध भागांत व मंदिरात स्वच्छता अभियान राबवावे, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे.त्याप्रमाणे वाईच्या गणपती घाटावर खासदार उदयनराजे भोसले यांनी गुरुवारी आपल्या समथर्कांसह स्वच्छता मोहिम केली.

यावेळी सुनील काटकर काका धुमाळ गीतांजली कदम रंजना रावत विनीत पाटील पंकज चव्हाण भारतीय जनता पाटी महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा सुरभीताई भोसले, जिल्हा उपाध्यक्ष अजय मांढरे, तालुकाध्यक्ष दीपक ननावरे, शहराध्यक्ष विजय ढेकणे, महाबळेश्वर तालुकाध्यक्ष अनिल भिलारे, प्रतापगड उत्सव समितीच्या विजयाताई भोसले, बाजार समितीचे संचालक विवेक भोसले, ग्रामोद्योग आघाडीचे सचिन घाटगे, ज्येष्ठ कार्यकर्ते काशिनाथ शेलार आदी मान्यवर व भाजपा कार्यकर्ते सहभागी झाले होते. त्यानंतर खासदार उदयनराजे भोसले यांनी भाजपाचे वाई शहराध्यक्ष विजय ढेकाने यांच्या घराच्या भिंतीवर कमळाचे चित्र रेखाटले यावेळी ही शहरातील अनेक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# उन्नत युवक आणि विकसित भारतासाठी...

युवक हीच देशाची खरी संपत्ती असून देशाचे भवितव्य घडवण्यात युवकांची भूमिका महत्त्वाची ठरते. स्वामी विवेकानंदांनी दिलेला “उठा, जागे व्हा आपले ध्येय प्राप्त होईपर्यंत थांबू नका हा संदेश प्रत्येक तरुणासाठी प्रेरणादायक आहे. विवेकानंदांनी भारतीय संस्कृतीचा जगभर प्रचार आणि प्रसार केला. मानवतेचा विचार अनेक माध्यमांतून मांडला. स्वामी विवेकानंदांनी १८९७ मध्ये पाहिलेले स्वप्न प्रत्यक्षात उतरण्याच्या प्रक्रियेत आणि त्यातून समृद्ध व संपन्न देश घडवण्यात युवकच महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. त्याच उद्देशाने १९८५ पासून १२ जानेवारी हा “राष्ट्रीय युवक दिन” साजरा केला जाऊ लागला.

जानेवारी २०२४ मध्ये २७ वा राष्ट्रीय युवा दिन महाराष्ट्रात नाशिक मध्ये १२ ते १६ जानेवारी या कालावधीत आयोजित केला गेला. १६ वर्षानंतर राष्ट्रीय युवा दिन महाराष्ट्रात साजरा करण्याची संधी आपल्याला मिळाली आहे. २८ राज्ये व ८ केंद्रशासित प्रदेश यांतील विविध शिक्षणक्रमांचे आठ हजार युवक- युवती या राष्ट्रीय युवा दिनाच्या कार्यक्रमात सहभागी झाले होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते १२ जानेवारी रोजी राष्ट्रीय युवा दिनाचे उद्घाटन झाले. “विकसित भारत- २०४७” या संकल्पनेतून “सर्व काही तुमच्या मनात” ही यावषीच्या राष्ट्रीय युवा दिनाची संकल्पना आहे. “सक्षम युवक” समर्थ भारत” हे घोषवाक्य आहे. पाच दिवस चाललेल्या या महोत्सवात विविध स्पर्धा झाल्या. नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आले.

व्यक्ती, समाज, राष्ट्र घडवण्यामध्ये व्यक्तिच्या मानसिक व भावनिक विकासाला महत्त्व दिले आहे. नव्या युवा पिढीला योग्य वेळी योग्य त्या गोष्टींची जाणीव करून देणे ही वडीलधाऱ्यांची भूमिका आहे आणि स्व- विकासाबरोबरच राष्ट्र विकासात योगदान देताना कोणकोणत्या गोष्टींकडे विशेष लक्ष दिले पाहिजे, याचा विचार युवा वर्गाने करायला हवा. “स्वत”ची ओळख- मी कोण आहे? हे जोपर्यंत नीट पारखले जात नाही, तोपर्यंत माझ्यातील गुण-दोषांचा परिचय मला होणार नाही. आत्मनिर्भरता येण्यासाठी त्याची आधी जाणीव व्हावी लागेल.

यशाची जिद्दआत्मविश्वासासारखा दुसरा जवळचा मित्र नाही, याची ठाम जाणीव आपल्याला झाली की कुठलीही गोष्ट सहज करता येते. आपला स्वतःवर विश्वास नसेल तर मग साऱ्या जगाचा आपल्यावर विश्वास असून काय उपयोग? मनाशी पक्की खूणगाठ बांधली पाहिजे की कितीही संकटे आली, अडथळे आले तरी आता माघार नाही. युद्ध आधी मनात जिंकले जाते आणि नंतर मैदानात. क्षेत्र कोणतेही असले तरी कष्ट करावे लागतातच. दे रे हरि पलंगा वरी असे म्हणून चालणार नाही. जे करायचे, जे मिळवायचे त्यासाठी काबाडकष्ट करावे लागतील.

अशक्य ते शक्य करिता सायास, कारण अभ्यास तुका म्हणे” हे सूत्र कायम डोक्यात ठेवले पाहिजे. आज आपल्यासमोर अनेक माध्यमे सहज उपलब्ध आहेत. या सर्व माध्यमांचा सकारात्मक वापर केला पाहिजे. त्यातून स्वतःचा विकास साधला पाहिजे. आयुष्याच्या या रणसंग्रमात विजयी योद्धा होण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागेल. कितीही संकटे आली तरी आत्मविश्वासाची ढाल तुटता कामा नये तर आणि तरच आपण आकाशात उंच भरारी घेऊ शकू.

जगभरात जी जी माणसे घडत गेली, मोठी झाली त्यांनी भरपूर वाचले आणि ऐकले. या दोन्ही गोष्टींपासून आता आपण थोडेसे दूर चाललो आहोत. आपल्या हातात माध्यमे आहेत, पण त्यांचा योग्य वापर कसा करावा याची समज मात्र नाही. त्यामुळे वेळ वाया जात राहतो. अनावश्यक गोष्टींच्या मागे आपण धावतो आहोत. संभ्रमावस्था वाढते. आदर्श श्रोता जोपर्यंत होता येणार नाही, तोपर्यंत व्यक्तही होता येणार नाही. आपण ग्रंथांच्या सहवासात जाऊन ज्ञान, माहितीचे धडे गिरवत नाही तोपर्यंत आपल्याला लिहिता तरी कसे येईल? ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे आपल्या हाताशी असतानाही आपले त्याकडे दुर्लक्ष होते. पुस्तक वाचता वाचता आपल्याला माणसंही वाचता येतील आणि त्यातून मनाचं भरण पोषण होईल.

दृष्टिकोन बदला, जग बदलेल

सकारात्मक दृष्टिकोन आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर आपली साथ देतो. आपण आपला दृष्टिकोन बदलत नाही, तोपर्यंत आपले लक्ष्य गाठू शकणार नाही. “ध्येय प्राप्त करेपर्यंत थांबायचे नाही” हा स्वामी विवेकानंदांचा विचार सकारात्मक दृष्टीने घेऊन रोजच आपल्याला “जागे” राहावे लागेल. आयुष्याचे योग्य नियोजन आणि त्याचे व्यवस्थापन करण्यासाठी एकाग्रता हवीच म्हणूनच यावषीच्या युवा दिनाची संकल्पना आहे, “सर्व काही तुमच्या मनात” हे नीट समजून घेतले की मग केवळ दिवास्वप्ने न पाहता मन एकाग्र करत आयुष्याचे नियोजन करता येईल.

स्पर्धेच्या आजच्या युगात टिकून राहायचे असेल तर उपयोजितेला महत्त्व आहे, हे विसरता कामा नये. केवळ पाठ केले आणि परीक्षेत लिहिले एवढेच न करता, प्रत्येक गोष्टीचा जीवनाच्या विकासासाठी कसा उपयोग करून घेता येईल, याबद्दलचा व्यापक विचार करावा लागेल. ती क्षमता आपल्यामध्ये आहेच हा ठाम विश्वासही हवा. आव्हाने आणि संघर्ष हा तर आजचा परवलीचा शब्द आहे. या प्रत्येक ठिकाणी ताणतणाव येणार आहेत. महान शास्त्रज्ञ, उद्योगपती, साहित्यिक लेखक, राजकारणी सर्वांनीच ते अनुभवले आणि अडचणींतून मार्ग काढला व जीवनाची यशस्वी वाटचाल केली. त्यामुळे प्रत्येक गोष्टीचा स्वीकार करून समस्यांशी दोन हात करण्याची तयारी ठेवणे महत्त्वाचे ठरते.

अंतरीचा ज्ञानदीप मालवू न देता विवेकाची ओल कायम जपत जीवनात वाटचाल करत राहणे गरजेचे आहे. तसे केले, तरच राष्ट्रीय युवा महोत्सव साजरा करण्याचा हेतू साध्य होईल.

**- डॉ. भाऊसाहेब नन्नवरे**

# म्हणावी तशी थंडी नाही



यंदा म्हणावी तशी थंडी नाही, असे म्हणताना किमान थंडी जाणवू लागली आहे, याविषयी समाधान मानावे, अशी जागतिक हवामानाची स्थिती आहे. पंजाब, हरियाणातील वेगाने वाहणारे वारे वक्राकार होत महाराष्ट्रात शिरले, तरच महाराष्ट्रातील तापमानात लक्षणीय घट संभवते. अन्यथा महाराष्ट्रात थंडीच्या कडाक्याऐवजी साधारण थंडी जाणवेल.

दक्षिण भारतातील केरळ, तमिळनाडू, आंध्र प्रदेश, कर्नाटक, तसेच पुदुच्चेरी, काराईकलमध्ये जवळपास गेले ७५ ते ८० दिवस सुरू असलेल्या ईशान्य मान्सूनचा जोर संक्रांतीदरम्यान ओसरला. तेथील हिवाळी पावसाचा हंगाम या वर्षी १४ जानेवारीला आटोपला आहे. तसा हा मान्सून डिसेंबरमध्येच निघून जावयास हवा. पण या वर्षी उशीर होत आहे. तेथील मान्सून बाहेर पडला रे पडला, की महाराष्ट्रातही थंडीसाठी पूरक वातावरण निर्माण होते. १४ जानेवारीला, ईशान्य मान्सूनच्या निर्गमनातून, विषुववृत्त समांतर पूर्वेकडून येणाऱ्या हंगामी पुरवी वाराझोताचा प्रभावही त्यामुळे कमी होईल. आणि विषुववृत्तादरम्यान पूर्व-पश्चिम हवेचा कमी दाब असलेले “आंतरकटिबंधीय अभिसरणीय परिक्षेत्र” (इंटर ट्रॉपिकल कॉनव्हर्जिग झोन) विषुववृत्तावरील (शून्य डिग्री अक्षवृत्त) त्याच्या सरासरी जागेपासून काहीसे दक्षिणेकडे म्हणजे १० अंश दक्षिण अक्षवृत्तापर्यंत (दक्षिण गोलार्धात) सरकेल. त्यामुळे महाराष्ट्रातही हवेच्या उच्च दाबाच्या टेकडयांना छेदून जाणारी काल्पनिक उंचावरील रेषा म्हणजे पोळही (रिज) दक्षिण भारताकडे सरकेल.

काश्मीरमध्ये “चालाई कलान” बफर्वृष्टीविना

सरकलेल्या “पोळ”मुळेच उत्तरेकडून महाराष्ट्रात घुसणाऱ्या थंड वाऱ्यांसाठी हवेच्या उच्च दाबरूपी काल्पनिक भिंतीचा अडथळा दूर होऊन महाराष्ट्रात काहीशी थंडी वाढत आहे. येथे “काहीशी थंडी” असा उल्लेख केला, कारण सध्या अस्तित्त्वात असलेल्या “एल-निनो”च्या प्रभावामुळे, एकापाठोपाठ वाहणारे झंझावात हे कमी तीव्रतेनेच वाहत आहेत. त्यांचा कमकुवतपणा, तसेच दक्षिण अक्षवृत्ताकडे म्हणजे देशात जम्मू, काश्मीर, हिमाचल प्रदेश, उत्तराखंडमध्ये शिरणाऱ्या “सैबेरिअन अतिथंड हवेच्या लोटाअभावी काश्मीरमध्ये सध्या सुरू असलेला ४० दिवसांचा (२१ डिसेंबर ते ३१ जानेवारी) चालाई कलानचा उच्च थंडी व बर्फ पडण्याचा हंगामी कालावधीही बफर्वृष्टीविना कोरडा जाताना दिसत आहे. एकूणच उत्तर भारतातही सध्या थंडीची तीव्रता कमीच आहे. म्हणूनच महाराष्ट्रातही कडाक्याच्या ऐवजी साधारण थंडी जाणवेल, असा अंदाज आहे.

निसर्ग कालक्रमणाप्रमाणे २२ डिसेंबर या दिवशी पृथ्वीच्या दक्षिण टोकाकडील साडेतेवीस दक्षिण अक्षवृत्ताचा म्हणजे पृथ्वीचा मकरवृत्ताचा जास्तीत जास्त भाग हा सूर्यासमोर असतो आणि दक्षिण गोलार्धातील टोकाकडचा हा भाग १५ जानेवारीपर्यंतच्या (२२ डिसेंबर ते १५ जानेवारी) २५ दिवसांच्या संक्रमण कालावधीत मकरवृत्तावरच म्हणजे साडेतेवीस दक्षिण अक्षवृत्तावरच जाणवतो. या महिनाभराच्या कालावधीला झुंझुरमास, धनुर्मास, धुंधुर्मास किंवा शून्यमासही म्हणतात. म्हणूनच थंडीसाठी पोषक अशा शाकाहारी खाद्याचा आहारात समावेश करून वेगळ्या पद्धतीने हा कालावधी साजरा केला जातो. सूर्याचा धनू राशीत प्रवेश होतो म्हणून “झुंझुरमासा”बरोबर धनुर्मासही म्हणतात. मात्र संक्रांतीच्या दिवशी सूर्याचा मकर राशीत प्रवेश होतो. म्हणून या दिवसाला मकर संक्रांत म्हणून संबोधले जाते.

भौगोलिक रचनेमुळे पंजाब, हरियाणा या राज्यांतील रहिवासी तेथील अतिथंड हवामानाला व एकंदरीत जनजीवनाला कंटाळलेले असतात. तिथे संक्रांतीदरम्यान शेकोटी किंवा आगटी लावतात, तिला तेथील स्थानिक “लोहोरी” म्हणतात. या लोहोरीभोवती सारे एकत्र येतात. थंडीचा त्रास टाळून तिचा उपभोग घ्यावा, हा यामागचा उद्देश असतो. अशा थंडीला सुरुवात होते म्हणून लोहोरी साजरी करतात. महाराष्ट्रात शेतकऱ्यांची शेतात साजरी होणारी येळ (वेळ) अमावस्या याच कालावधीत येते. शास्त्रीयदृष्ट्या या कालावधीतील सकाळच्या वेळेस हवेत प्राणवायूचे प्रमाण अधिक असते. ओझोनचा थर उत्तम असतो. म्हणून तर आहारविहार जाणीवपूर्वक केला जातो. त्या दिवसानंतर म्हणजे मकरसंक्रांतीनंतर पृथ्वीचा कल हळूहळू विषुववृत्ताकडे वाढून आणि तो ओलांडून पुन्हा उत्तर गोलार्धातील भाग सूर्यासमोर अधिक येणे (उत्तरायण) वाढत जाते.

आता या नेहमीच्या कालचक्रानुसार वर स्पष्ट केल्याप्रमाणे, निसर्गनिर्मित घडामोडींबरोबरच, उत्तर ध्रुवावरील बर्फाळ, आर्क्टिक, अतिथंड हवेचे उच्च दाब अक्षवृत्त वर्तुळीय पट्टाही त्यामुळे दक्षिणेकडे म्हणजे रशियन अक्षवृत्ताकडे सरकतो. त्यामुळे थंड हवा ही भारताकडे लोटली जाते. परिणामी आपल्याकडे जम्मू, काश्मीरमध्ये हवामान अतिथंड होते. त्या भागात बफर्वृष्टी होते. पश्चिम झंझावाताबरोबरच या “सैबेरिअन चिल”चे स्थलांतर हे उत्तरेकडे थंडी वाढण्याचे एक प्रमुख कारण असते. म्हणून तर पंजाब, हरियाणा आणि राजस्थानच्या काही भागांत सध्या सकाळच्या वेळी धुक्याची चादर, तर काही भागात अति नव्हे, पण थंडीची लाट जाणवत आहे.

सध्या या भागात पहाटेचे किमान तापमान २ ते ५ अंशांदरम्यान आहे. पहाटेचे हे किमान तापमान सरासरीपेक्षा १ ते ४ अंशांनी कमी झाले आहे. याच पंजाब, हरियाणा, राजस्थान भागात पश्चिम दिशेकडून पूर्वेकडे ताशी २५० ते २८० किमी वेगाने वाऱ्याचे झोत वाहत आहेत. त्यातील काही वारे वक्राकार होऊन महाराष्ट्रात शिरले, तर पुढील काही दिवसांत येथील तापमानातही लक्षणीय घट होईल, अशी अपेक्षा आहे.

एल-निनोचा विसर?

सकाळी, संध्याकाळी राज्य धुक्याच्या दाट चादरीत लपेटले जात आहे. त्यामुळे दृश्यमानता २५ ते ५० मीटरवर येऊन ठेपली आहे, तर पुढील पाच दिवसांत काही भागांत भू-स्फटीकरणाचीही शक्यता नाकारता येत नाही. प्रसारमाध्यमांद्वारे सध्या महाराष्ट्रातील थंडीबाबतचा ओरडा कानी येत आहे. सध्या थंडी जाणवते आहे असे जरी वाचनात किंवा कानावर येत असले, तरी सध्या पहाटेचे व दुपारचे, असे दोन्हीही किमान व कमाल तापमान हे अजूनही सरासरी तापमानाच्या पातळीत नसून, अधिकच आहे. खरे तर थंडी चाचपण्याच्या नादात आपणही चालू कालावधी हा एल-निनोचा आहे, हे विसरत आहोत. आणि म्हणून तर आपण सहज म्हणतो, “यंदा म्हणावी तशी थंडी नाही! कशी असेल? जागतिक पातळीवरील सध्या सुरू असलेल्या वातावरणीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर जशी थंडी असावी तशीच आहे. थंडीविषयी चर्चा होत आहे, हेच खूप आहे, हेही ध्यानात घ्यावे, असे वाटते.

त्यातही आता, उद्या आणि परवा म्हणजे बुधवार-गुरुवारी (१७-१८ जानेवारी) विदर्भातील गोंदिया आणि गडचिरोली या दोन जिल्ह्यांत पुन्हा काहीसे ढगाळ वातावरण असण्याची शक्यता निर्माण झाली आहे. म्हणून तेथील थंडी दोन दिवसांकरिता जाईल. संक्रांतीदरम्यानच्या या काळात थंडी जाणवत असली, तरी सध्या १७ ते २१ जानेवारीपर्यंतच्या पुढील पाच दिवसांत महाराष्ट्रात पहाटेचे किमान तापमान हे १२ अंश (सरासरीइतके तर काही भागात सरासरीपेक्षा एखाद्या अंशाने अधिक), तर दुपारचे कमाल तापमान २८-३० अंश (म्हणजे सरासरीपेक्षा एखाद्या अंशाने अधिक) दरम्यान असू शकते, असे वाटते.

महाराष्ट्रात रब्बी हंगामातील भरड धान्ये, शेतपिके ही या कालावधीत फलधारणेच्या म्हणजे दाणा भरण्याच्या अवस्थेत, तर काही हुरडा अवस्थेत असतात. या कालावधीत पिकांच्या मुळांना वाढीसाठी जमिनीखाली मोकळी हवा व जमिनीच्या वर निरभ्र आकाशातून प्रकाशसंश्लेषण प्रक्रियेतून अन्नद्रव्य निमितीसाठी स्वच्छ सूर्यप्रकाश मिळणे गरजेचे असते. म्हणून इतर प्रणालीतून वातावरणीय अडथळ्याविना नेहमी असतो तसा स्वच्छ थंडीचा काळ शेतीसाठी महत्त्वाचा मानला जातो.

**माणिकराव खुळे**
(निवृत्त शास्त्रज्ञ, भारतीय हवामान विभाग)

## लग्नानंतरही अभ्यास
## सांगलीची पूजा वंजारी मुलींमध्ये राज्यसेवेत राज्यात पहिली



**पुणे** : महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे (एमपीएससी) घेण्यात आलेल्या राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२२ चा निकाल गुरुवारी जाहीर झाला असून, त्यात कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकरी कुटुंबातील विनायक पाटील यांनी ६२२ गुण मिळवत राज्यात पहिला क्रमांक मिळवला. पाटील यांनी हे यश तेविसाव्या वषी मिळवले असून, दुसऱ्याच प्रयत्नात ते यशस्वी झाले आहे. या निकालात धनंजय बांगर यांनी राज्यात द्वितीय, तर सौरभ गावंडे यांनी तृतीय क्रमांक मिळवला. त्याचप्रमाणे मुलींमधून सांगलीच्या वाळवा तालुक्यातील पूजा वंजारी यांनी प्रथम क्रमांक पटकाविला आहे.

एमपीएससीने परीक्षेबाबतची सवर्साधारण गुणवत्ता यादी आणि संबंधित माहिती वेबसाइटवर प्रसिद्ध केली. राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२२ विविध २३ संवर्गातील ६२३ पदांसाठी घेण्यात आली होती. राज्यसेवेची आतापर्यंतची सर्वाधिक पदांची भरती प्रक्रिया असल्याने राज्यभरातील उमेदवारांचे या निकालाकडे लक्ष लागले होते. मात्र, एमपीएससीच्या प्रशासनाने नवी मुंबई, नागपूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर केंद्रावरील मुलाखती संपल्यानंतर, एका तासानंतर निकाल जाहीर केला आहे. त्यामुळे उमेदवारांना सुखद धक्का मिळाला आहे. या निकालाच्या अनुषंगाने प्रसिद्ध केलेल्या गुणवत्ता यादीत १८३० उमेदवारांचा समावेश आहे. सवर्साधारण गुणवत्ता यादी तात्पुरत्या स्वरुपाची आहे. अर्जामधील विविध दाव्यांच्या अनुषंगाने अंतिम निकालापूवी प्रमाणपत्रे, कागदपत्रे पडताळणी करताना काही उमेदवारांच्या दाव्यामध्ये बदल होऊ शकतो. त्याचप्रमाणे उमेदवाराचा गुणवत्ताक्रम बदलू शकतो. न्यायालयात, न्यायाधिकरणात दाखल न्यायिक प्रकरणांतील अंतिम न्यायनिणर्याच्या अधीन राहुन सवर्साधारण गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आली आहे, असे एमपीएससीने स्पष्ट केले आहे.

विनायक पाटील यांचे आई-वडिल शेतकरी असून, घरी दोन एकर जमीन आहे. त्यांनी बीएस्सी स्टॅटीस्टिकचे शिक्षण फर्ग्युसनमधून पूर्ण केले आहे. राज्यसेवा मुख्य परीक्षेत प्रथम आलेल्या विनायक यांनी कोणत्याही प्रकारचा कोचिंग क्लास आणि टेस्ट सिरीज न लावता स्वअध्ययनावर भर दिला होता. त्यामुळेच राज्यसेवेच्या पहिल्या प्रयत्नात यशस्वी होत, त्यांची उपशिक्षणाधिकारी पदावर नियुक्ती झाली होती. सध्या ते नागपूर येथे कार्यरत आहेत. त्यांनी काम सांभाळत, दुसऱ्या प्रयत्नात राज्यात प्रथम येण्याचा बहुमान पटकाविला आहे. परीक्षेवर लक्ष केंद्रीत करून, स्वअध्ययनावर भर दिल्यामुळे यश मिळाल्याचे पाटील यांनी सांगितले.

साधारण २०१५ पासून मी परीक्षेची तयारी करीत होते. २०२० मध्ये यश मिळाल्यानंतर, सहाय्यक निबंधक म्हणून काम करण्याची संधी मिळाली. मात्र, लग्नानंतरही मी राज्यसेवेची तयारी सुरू ठेवली आणि अभ्यासात सातत्य ठेवले. त्याचे यश मिळाले आहे. कुटुंबाचा भक्कम पाठिंबा मिळाल्याने, नोकरी सांभाळत यश मिळवले आहे, असं मुलींमधून पहिली आलेल्या पूजा वंजारी हिनं सांगितलं.

# मराठा समाजाचे 23 जानेवारीपासून सर्वेक्षण, शनिवारपासून प्रशिक्षण, 31 जानेवारीची डेडलाईन



**पुणे:** मराठा समाजाचे मागासलेपण तपासण्यासाठी आता येत्या २३ जानेवारीपासून प्रत्यक्ष सर्वेक्षणाला सुरूवात होणार असल्याचे राज्य मागासवर्ग आयोगाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे या सर्वेक्षणासाठी राज्यातील सर्व जिल्ह्यासंह महानगरपालिका, नगरपालिकांतील कर्मचाऱ्यांना शनिवारपासून दोन दिवसांचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. प्रशिक्षणानंतर थेट सर्वेक्षणाला सुरूवात होणार असून हे सर्वेक्षण येत्या ३१ जानेवारीपर्यंत पूर्ण करण्याच्या सूचनाही आयोगाने दिल्या आहेत.

मराठा समाजाचे आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक आधारावरील विविध निकषांच्या आधारे मागासलेपण तपासण्यात येणार आहे. त्यासाठी राज्यातील सरकारी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्याकरिता स्वतंत्र सॉफ्टवेअर तयार करण्यात आले असून त्याचे प्रशिक्षण हे गोखले इन्स्टिट्यूटकडील मास्टर ट्रेनर अर्थात प्रशिक्षक २० जानेवारीपासून जिल्ह्याच्या अथवा महानगरपालिकेच्या मुख्यालयाच्या ठिकाणी प्रशिक्षण देण्यासाठी उपस्थित राहतील. हे प्रशिक्षक तालुकापातळीवरील प्रशिक्षणास मदत करतील.

जिल्ह्याच्या अथवा महानगरपालिकेच्या मुख्यालयात तालुक्याच्या व वॉर्डस्तरीय सर्व प्रशिक्षकांना सॉफ्टवेअर वापराचे शनिवारपासून प्रशिक्षक प्रशिक्षण देतील. वॉर्ड व तालुक्याचे प्रशिक्षक २१ आणि २२ जानेवारीला संबंधित तालुक्याच्या किंवा वॉर्डाच्या ठिकाणी नियुक्त कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देतील. तसेच २३ जानेवारीपासून प्रत्यक्ष सर्वेक्षणाला सुरूवात करण्यात येणार असून येत्या ३१ जानेवारीपूवी सर्वेक्षण पूर्ण करायचे आहे, असे राज्य मागासवर्ग आयोगाच्या सदस्य सचिव आशा पाटील यांनी सांगितले. या कामासाठी नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना आयोगामार्फत ओळखपत्र उपलब्ध करून देण्यात येणार आहे, असेही सांगण्यात आले. तीनशे कर्मचाऱ्यांना एक प्रशिक्षक जिल्हास्तरीय महानगरपालिकास्तरीय प्रशिक्षणांतर्गत प्रत्येक तालुक्यातून ३०० प्रगणकासाठी एक प्रशिक्षकाची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच ३०० ते ६०० साठी दोन प्रशिक्षक तसेच सहाशेपेक्षा जास्त प्रगणकासाठी तीन प्रशिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. या प्रमाणानुसार, तालुका प्रशिक्षक नियुक्त करण्याच्या सूचना महानगरपालिका आयुक्तांसह जिल्हाधिकाऱ्यांना करण्यात आल्या आहेत. तालुका प्रशिक्षकांना तसेच जिल्हा स्तरारवरील व तालुका स्तरावरील नोडल ऑफिसर व सहायक नोडल ऑफिसर यांना प्रशिक्षण देण्यात येईल. सर्वेक्षणाचे काम पूर्ण होईपर्यंत जिल्ह्याच्या अथवा महानगरपालिकेच्या मुख्यालयात प्रशिक्षक उपस्थित राहतील.

सर्वेक्षणाच्या कामासह प्रशिक्षणासाठी विभाग, जिल्हा तसेच तालुका पातळीवरील नोडल ऑफिसर तसेच सहायक नोडल ऑफिसर यांना विभाग, जिल्हा तसेच तालुका स्तरावर एका लिपिकाची सुविधा उपलब्ध करून घेता येईल. या लिपिकांना एका महिन्याच्या मूळ वेतनाच्या ५० टक्के रक्कम मानधन म्हणून देण्यात येईल. तालुका स्तरावरील प्रशिक्षकांना दहा हजार रुपयांचे मानधन देण्यात येईल. मराठा व खुल्या प्रवर्गातील १०० कुटुंबाच्या सर्वेक्षणासाठी १० हजार रुपये इतके मानधन देण्याचे ठरले आहे. तसेच मागासवगीय कुटुंबांच्या सर्वेक्षणासाठी प्रतिकुटुंब दहा रुपये मानधन देण्यात येणार आहे, असेही आयोगाने स्पष्ट केले आहे.

दैनिक राजदंड

प्रशिक्षणार्थी बातमीदार, उपसंपादक नियुक्त करण्याबाबत TRAINEE REPORTERS, SUB-EDITORS पाहिजेत

पत्रकारितेतील **मानदंड ठरणाऱ्या दै. राजदंडची (MARATHI) पुणे आवृत्ती आणि THEDEMOCRAT.LIVE (ENGLISH)** नुकतीच सुरू झाली आहे. शहर व जिल्ह्यातील राजकीय घडामोडी, सामाजिक समस्या, शिक्षण, साहित्य, कला, क्रीडा, सांस्कृतिक, उद्योग विश्वातील बदलाची माहिती वाचकांपर्यंत पोहचविण्याचा या वृत्तपत्राचा मानस आहे. प्रिंट, ऑनलाईन, युट्यब या माध्यमात राजदंड मीडिया समूहाचे काम चालणार आहे.

पत्रकारितेत करिअर करू पाहणाऱ्या युवक-युवतीसाठी **दै. राजदंडचे** व्यासपीठ दिशादर्शक ठरणार आहे. नवोदित पत्रकारांना हा महत्वाचा प्लॅटफार्म आहे. प्रशिक्षणार्थी बातमीदार, उपसंपादक म्हणून काम करण्याची इच्छा असणाऱ्या आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना **दै. राजदंडमध्ये** संधी उपलब्ध करून देत आहे. तरी याची माहिती महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना द्यावी, ही विनंती.

कल्पना सुर्वे,
**संचालक,** (HR) दै. राजदंड, पुणे
email: rajdand.pune@gmail.com

मुख्य *संपादक : नरेश विठ्ठल देसाई हे दैनिक राजदंड मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा. लि., सर्व्हे नं. १२९, हिस्सा नं. ११ / २ आणि १ / १३, वारजे पुणे - ४११ ०५८ येथे मुद्रित करून न्याती ग्रँडीयर, १०२ ग्रीनविच, कडनगर, उंड्री, पुणे -४११ ०६० येथून प्रकाशित केले. दैनिक राजदंडमधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. (*पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी) दूरध्वनी : पुणे (०२०)२६९०९०३१, इमेल-rajdand.pune@gmail.com
या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या लेख, बातम्या, जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील.

# रामटेकडीत विविध मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन



**हडपसर :** रामटेकडी येथे भाजप हडपसर विधानसभा सरचिटणीस शक्तीसिंग कल्याणी यांच्या वाढदिवसानिमित्त विविध मोफत आरोग्य तपासणी शिबिरचे आयोजन करण्यात आले होते. आरोग्य तपासणी भारत माता छत्रपती शिवाजी महाराजा रणजित सिंह बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस माजी नगरसेवक मारुती तुपे व भाजपा हडपसर अध्यक्ष संदीप दळवी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून शिबिराला सुरवात करण्यात आली यां शिबिरात मध्ये 750 पेक्षा जास्त नागरिकांची तपासणी करण्यात आली प्रति व्यक्ती 10000 रुपयांच्या आरोग्य तपासण्या मोफत करण्यात आल्या त्या मध्ये प्रामुख्याने रक्त तपासणी, (रक्तातील सर्व घटक), स्तन ककरोग तपासणी, गर्भाशय ककरोग तपासणी, तोंडाचा कॅन्सर तपासणी, छातीच्या क्ष किरण ( एक्सरा ) तपासणी, साखर तपासणी, रक्तदाब तपासणी, डोळे तपासणी, करण्यात आले .नेत्र तपासणीत ३५ जेष्ठ नागरिकांची मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे असे भाजप हडपसर सरचिटणीस शक्तीसिंग कल्याणी यांनी सांगितले.

सर्व नागरिकांची तपासणी समर्थ युवा फाउंडेशनचा एच व्ही देसाई हॉस्पिटलच्या टीमने केली . शिबिराचे आयोजन मानव सेवा चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष भगतसिंग कल्याणी कार्याध्यक्ष फतेहसिंग शक्तीसंग कल्याणी तसेच सचिव कन्हैया सिंग कल्याणी राजेश जाधव युवराज कुशेकर चंद्रकांत वाघमारे त्यांनी केले होते .

कार्यक्रमाला गणेश वाघ, चांदसिंग कल्याणी ,गणेश घुले, खन्ना सिंग कल्याणी ,राम कांबळे, आनंद शेलार, मुस्तफा शेख ,व कार्यकर्ते , नागरिक उपस्थित होते

## लग्नानंतरही अभ्यास
# सांगलीची पूजा वंजारी मुलींमध्ये राज्यसेवेत राज्यात पहिली



**पुणे :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे (एमपीएससी) घेण्यात आलेल्या राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२२ चा निकाल गुरुवारी जाहीर झाला असून, त्यात कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकरी कुटुंबातील विनायक पाटील यांनी ६२२ गुण मिळवत राज्यात पहिला क्रमांक मिळवला. पाटील यांनी हे यश तेविसाव्या वर्षी मिळवले असून, दुसऱ्याच प्रयत्नात ते यशस्वी झाले आहे. या निकालात धनंजय बांगर यांनी राज्यात द्वितीय, तर सौरभ गावंडे यांनी तृतीय क्रमांक मिळवला. त्याचप्रमाणे मुलींमधून सांगलीच्या वाळवा तालुक्यातील पूजा वंजारी यांनी प्रथम क्रमांक पटकाविला आहे.

एमपीएससीने परीक्षेबाबतची सवर्साधारण गुणवत्ता यादी आणि संबंधित माहिती वेबसाइटवर प्रसिद्ध केली. राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२२ विविध २३ संवर्गातील ६२३ पदांसाठी घेण्यात आली होती. राज्यसेवेची आतापर्यंतची सर्वाधिक पदांची भरती प्रक्रिया असल्याने राज्यभरातील उमेदवारांचे या निकालाकडे लक्ष लागले होते. मात्र, एमपीएससीच्या प्रशासनाने नवी मुंबई, नागपूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर केंद्रावरील मुलाखती संपल्यानंतर, एका तासानंतर निकाल जाहीर केला आहे. त्यामुळे उमेदवारांना सुखद धक्का मिळाला आहे. या निकालाच्या अनुषंगाने प्रसिद्ध केलेल्या गुणवत्ता यादीत १८३० उमेदवारांचा समावेश आहे. सवर्साधारण गुणवत्ता यादी तात्पुरत्या स्वरुपाची आहे. अर्जामधील विविध दाव्यांच्या अनुषंगाने अंतिम निकालापूवी प्रमाणपत्रे, कागदपत्रे पडताळणी करताना काही उमेदवारांच्या दाव्यामध्ये बदल होऊ शकतो. त्याचप्रमाणे उमेदवाराचा गुणवत्ताक्रम बदलू शकतो. न्यायालयात, न्यायाधिकरणात दाखल न्यायिक प्रकरणांतील अंतिम न्यायनिणर्याच्या अधीन राहुन सवर्साधारण गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आली आहे, असे एमपीएससीने स्पष्ट केले आहे.

विनायक पाटील यांचे आई-वडिल शेतकरी असून, घरी दोन एकर जमीन आहे. त्यांनी बीएस्सी स्टॅटीस्टिकचे शिक्षण फर्ग्युसनमधून पूर्ण केले आहे. राज्यसेवा मुख्य परीक्षेत प्रथम आलेल्या विनायक यांनी कोणत्याही प्रकारचा कोचिंग क्लास आणि टेस्ट सिरीज न लावता स्वअध्ययनावर भर दिला होता. त्यामुळेच राज्यसेवेच्या पहिल्या प्रयत्नात यशस्वी होत, त्यांची उपशिक्षणाधिकारी पदावर नियुक्ती झाली होती. सध्या ते नागपूर येथे कार्यरत आहेत. त्यांनी काम सांभाळत, दुसऱ्या प्रयत्नात राज्यात प्रथम येण्याचा बहुमान पटकाविला आहे. परीक्षेवर लक्ष केंद्रीत करून, स्वअध्ययनावर भर दिल्यामुळे यश मिळाल्याचे पाटील यांनी सांगितले. साधारण २०१५ पासून मी परीक्षेची तयारी करीत होते. २०२० मध्ये यश मिळाल्यानंतर, सहाय्यक निबंधक म्हणून काम करण्याची संधी मिळाली. मात्र, लग्नानंतरही मी राज्यसेवेची तयारी सुरू ठेवली आणि अभ्यासात सातत्य ठेवले. त्याचे यश मिळाले आहे. कुटुंबाचा भक्कम पाठिंबा मिळाल्याने, नोकरी सांभाळत यश मिळवले आहे, असं मुलींमधून पहिली आलेल्या पूजा वंजारी हिनं सांगितलं.

## सचिन चिखले यांच्या वाढदिवसानिमित्त
# आरोग्य शिबिर संपन्न



**देहुगांव :** -महाराष्ट नवनिर्माण सेनेचे शहराध्यक्ष तसेच मा.नगरसेवक सचिन चिखले यांच्या वाढदिवसानिमित्त कार्यकर्त्यांच्या संकल्पनेतून मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला होता.

दरम्यान,सचिन चिखले यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या विविध शिबिरांमध्ये मोफत आरोग्य तपासणी शिबिर, नेत्र तपासणी शिबिर तसेच रक्तदान शिबिर याचा समावेश होता. यावेळी विशेष तज्ज्ञांच्या उपस्थितीत योग्य सल्ला व मार्गदर्शन करण्यात आले. या शिबिराला नागरिकांचा मोठा प्रतिसाद लाभला. या प्रक्रियेमध्ये तब्बल ६५० नागरिकांनी सहभाग घेतला तसेच त्यांच्या तपासण्या यशस्वी रीतीने पार पाडण्यात आल्या. तसेच मनविसेचे महाराष्ट्र राज्याचे सचिव आशिष साबळे-पाटील,उपाध्यक्ष हेमंत डांगे, मनसे शहराध्यक्ष सचिन चिखले व मनसे विद्यार्थी सेनेचे शहराध्यक्ष अनिकेत प्रभू यांच्या हस्ते मॉर्डन महाविद्यालय,यमुनानगर-निगडी येथे महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना शाखेचे उद्धाटन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे आयोजन प्रतीक शिंदे (उपशराध्यक्ष मनविसे), रोहित काळभोर (उपविभाग अध्यक्ष मनविसे), स्वप्निल महांगरे (प्रभाग अध्यक्ष), विपुल काळभोर, सोमनाथ काळभोर, निलेश पवार, रुपेश पाटील, नगरसेवक सचिन भाऊ चिखले युवा मंच,गणाध्यक्ष मित्र मंडळ निगडी गावठाण यांनी केले होते. यावेळी उत्कृष्ट कार्यक्रमांच्या आयोजन करून ते पार पाडणा ्या सर्वांचे आभार सचिन चिखले यांनी मानले.

# डिसीएम सोसायटी मध्ये एम. डी.शेवाळे सर यांना अभिवादन



**हडपसर/पुणे :** रिपब्लिकन पाटी ऑफ इंडिया ( आठवले) पक्षाचे राष्टीय कोषाध्यक्ष व डिसिएम सोसायटी ऑफ इंडियाचे स्व.एम.डी.शेवाळेसर यांच्या द्वितीय पुण्यनिमित्त नानापेठ येथील डिसीएम सोसायटी कॉलेज आवारातील एम.डी.शेवाळे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अपर्ण डिसीएम सोसायटी ऑफ इंडियाचे जनरल सेक्रेटरी रिपब्लिकन पक्ष महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष विशाल शेवाळे व शिल्पा शेवाळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी काजल शेवाळे, डिसीएम सोसायटी कॉलेज च्या प्राचार्य सुनिता कारोसकर शिक्षक, कमर्चारी उपस्थित होते.डिसीएम सोसायटी ऑफ च्या वतीने कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. स्व.एम.डी.शेवाळेसर यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांनी समाजासाठी केलेल्या विविध कार्याचा आढावा घेण्यात आला.

# आंबेगाव तालुक्यात गौणखनिजाचे अवैध उत्खनन

**रांजणी / रमेश जाधव**

आंबेगाव तालुक्यात अवैध गौण खनिज माफियांनी धुमाकूळ घातला .असून वनवास भोगून आलेल्या महसूल मधील अधिकाऱ्याच्या आशीर्वादाने अवैध गौण खनिज उत्खनन आणि गौण खनिजाचे उत्खनन व अवैध वाहतूक जोरात सुरू आहे.

तालुक्यात अवैध गौण खनिज माफियांचा सुळसुळाट झाला असून खुलेआम अवैध गौण खनिज उत्खनन आणि वाहतूक सुरू आहे. राजरोसपणे सुरू असलेला हा प्रकार पाहूनही महसुलचे अधिकारी कुठलीही कारवाई करताना दिसत नाहीत. अधिकाऱ्यांच्या या अथर्पूर्ण संबंधामुळे शासनाचा लाखोंचा आर्थिक महसूल बुडत आहे.

तालुक्यात पेठ, अवसरी, मंचर, शेवाळवाडी, पारगाव अशा अनेक ठिकाणी बेकायदा आणि वीनापरवानगी उत्खनन सुरू असून, त्याची अवैध उत्खनन व वाहतूक देखील होत आहे. राज्य शासनाने दिलेल्या सूचनांनुसार गौण खनिज उत्खनन व वाहतुकीसाठी महाखनिज नियम व अटींचा वापर करणे अपेक्षित आहे, मात्र महसूल विभागाकडून कागदोपत्री प्रक्रिया राबविल्याचे चित्र रंगवून महसुल अधिकाऱ्यांकडुन या माफियांना अथर्पूर्ण सहकार्य दिले जात आहे. यातून लाखो, करोडो रुपयांचा महसूल बुडवत असून हे अधिकारी आर्थिक धनाचे लाभ घेत असल्याचे दिसत आहे.

अवैध गौण खनिजावर नियंत्रण ठेवण्यासाठी तलाठी, मंडलाधिकारी, तहसीलदार आदी महसुलचे अधिकारी काम पाहत असतात. तालुक्यात अनेक ठिकाणी नावाला रॉयल्टी भरली जात आहे, मात्र रॉयल्टीच्या अनेक पटीत उत्खनन केले जाते. रॉयल्टी भरून परवानगी घेतलेल्या गौण खनिजाचे परवाण्यानुसार तसेच निर्धारित प्रमाणात आणि वेळेत उत्खनन होत आहे किंवा नाही यावर देखरेख ठेवणे अपेक्षित असताना महसुलचे अधिकारी आणि कमर्चारी याकडे जाणिवपुर्वक दुर्लक्ष करताना दिसत आहेत . अनेक ठिकाणचे खानपट्टे समाप्त झालेले असताना, अनेक ठिकाणावरून चोरून दगड , मरूम आणून क्रश करून जिल्हा प्रशासन दखल घेणार का ? असा सवाल उपस्थित होत आहे .

शासनाचे होणारे नुकसान टाळण्यासाठी जिल्हा प्रशासनाने आंबेगाव तालुक्यात सुरू असणाऱ्या या अवैध उत्खनन आणि वाहतुकीची सखोल चौकशी करून संबंधित माफियांना अभय देणाऱ्या लाचखोर अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी अशी मागणी सवर्सामान्य नागरिकांमधून होत आहे.

तालुक्यातील महसूल विभागात असणाऱ्या शासकीय अधिकार्याच्या वाहनावरील खाजगी चालक तालुक्यातील खनिज आणि वाळू माफियांकडून बिनधास्त आणि बेधडक वसुली करत असल्याचे दिसत आहे. या तालुक्यातील महसुल विभाग या विषयात लक्ष घालणार आहे की नाही हा खरा चिंतनाचा विषय आहे .

## बार्टी सारथी व महाज्योती पीएचडीची फेलोशिप
# केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांचे चंद्रकांत पाटील यांना पुन्हा पत्र

**पुणे :** महाराष्ट्रातील महाज्योती सारथी व बाटी या संस्थांच्या संशोधक विद्यार्थ्यांची फेलोशिप पात्रता रद्द करून सर्वांना फेलोशिप देण्यासंबंधीच्या सूचनेच्या अनुषंगाने मी आपणास प्रस्तुत पत्र लिहीत आहे असुन महाज्योती, सारथी व बार्टी या संस्थांचे संशोधक विद्यार्थी मुंबई, कोल्हापूर, पुणे, नागपूर व छत्रपती संभाजीनगर येथे २०२३ या वर्षी अर्ज करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना फेलोशिप मिळाली पाहिजे. या मागणीसाठी उपोषण करीत आहेत याची आपणास कल्पना आहे. या पाश्र्वभूमीवर या संशोधक विद्यार्थ्यांनी मला एक निवेदन दिलेले आहे. त्याची प्रत सोबत जोडली आहे. या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, २०२३ मध्ये फेलोशिप करिता पहिल्यांदाच पात्रता परीक्षा घेण्यात आली व २४ डिसेंबर २०२३ रोजी पेपर फुटल्याचा आरोप झाला. तो पेपर २०१९ साली आलेला सेट परीक्षेचाच असल्याने रद्द केला गेला. १० जानेवारी रोजी पुन्हा हा पेपर विद्यार्थ्यांना देण्यात आला. परंतु यावेळी 4 सेट पैकी अ व इ सेट हे सोल बंद होते, तर उ व ऊ सेटवर कोणत्याही स्वरूपाचे सील नव्हते. प्रश्नपत्रिकेवर नियम क्रमांक ३ नुसार सील नसलेली प्रश्नपत्रिका स्वीकारू नये, असे स्पष्ट शब्दांत लिहिलेले असल्यामुळे विद्यार्थ्यांनी परीक्षा देण्यास नकार दिला. विद्यार्थ्यांना होणारा शारीरिक, मानसिक, आर्थिक त्रास विचारात घेता पात्रता परीक्षा रद्द करून सर्व पात्र विद्यार्थ्यांना नोंदणी दिनांकापासून फेलोशिप देण्याचा निर्णय घ्यावा, अशी या विद्यार्थ्यांची मागणी आहे.

> मला असे वाटते की, अशा कारणांमुळे परीक्षा वारंवार रद्द होणे योग्य नाही. अशा घटनांमुळे राज्य शासनाची प्रतिमा मलीन होते. त्यामुळे आपण या विषयावर तातडीने योग्य निर्णय घेऊन तोडगा काढावा
>
> **-केंद्रीय मंत्री, नितीन गडकरी, भारत सरकार**

# बौद्ध भारताचे पुनर्निर्माण करणे हेच राष्ट्रीय कार्यः-प्रबुद्ध साठे



**हडपसर/पुणे :** बौद्ध भारताचे पुनर्निर्माण करणे हेच राष्टीय कार्य असून बौद्ध आणि मातंग समाज यांना जोडणारा एकमेव दुवा म्हणजे बौद्ध धम्म आहे, बौद्ध धर्म हा अहिंसेचा,शांततेचा मार्ग असे प्रतिपादन चला आपल्या बुध्दाच्या घरी अभियानाचे प्रमुख प्रबुद्ध साठे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या देहूरोड धम्म भूमी पुणे येथे मातंग कुटुंब व इतर समाज बांधवांच्या बौद्ध धम्म दीक्षा सोहळ्यात प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते, मातंग समाजातील लक्ष्मण साळवे, त्यांच्या पत्नी प्रीती लक्ष्मण साळवे यांच्या बरोबरच अविनाश मिलिंद जोगदंड, स्वप्नील प्रकाश साळवे , कस्तुराबाई बमणाकुल या पाच लोकांना प्रबुद्ध साठे यांच्या हस्ते ऐतिहासिक धम्मभूमी येथे बौद्ध धम्माची दीक्षा देण्यात आली, बौद्ध धम्मच भारताचा खरा चेहरा असून, हिंदू हा बहुजन समाजाचा धर्म नसून मानसिक गुलामी आहे, या गुलामीतून बाहेर पडून मातंग समाज बरोबरच चमर्कार, मेहतर, भंगी, होलार, माळी, धनगर, मराठा आदिवासी भटका इत्यादी बहुजनांनी बौद्ध धम्म स्वीकारुन जगाला शांततेचा मार्ग ससांगणारे महात्मा गौतम बुद्ध यांचा धर्म स्विकारुन आपले ध्येय साध्य करावे असे मत प्रबुद्ध साठे यांनी मातंग बांधवांना बौद्ध धम्म दिक्षा देताना ते आवाहन केले , याप्रसंगी बुध्द विहार कृती समिती देहूरोड संस्थापक अध्यक्ष भीम पुत्र टेक्सास गायकवाड अशोक गायकवाड, सुदाम कांबळे, निलेश चव्हाण बहुजन संघटनेचे खांडेकर, भीमसंदेशचे जिजाभाऊ लोणके,आदी मान्यवर व बहुसंख्य समाज बांधव उपस्थित होते

## मावळ फेस्टीवलसाठी मंच पूजन संपन्न
# वडगावात होणार मावळ फेस्टिवल




**वडगाव मावळ :** कला, क्रीडा आणि संस्कृतीचा खजिना असलेल्या मावळ फेस्टीवलसाठी मंच पूजन ग्रामदैवत श्री पोटोबा जोगेश्वरी मंदिर प्रांगणात संपन्न झाले. मावळ फेस्टीवल संस्थेचे यंदा 16 वे वर्ष आहे. 26 ते 28 जानेवारी या कालावधीत ग्रामदैवत श्री पोटोबा जोगेश्वरी मंदिर प्रांगणात मावळ फेस्टीवल दररोज सायंकाळी संपन्न होणार आहे. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी वडगाव मावळ आणि परिसरातील नागरिकांना मनोरंजनाची मेजवानी मिळणार आहे.

पुणे जिल्हा नियोजन समितीचे मा.सदस्य अविनाश बवरे,मा.जिल्हा परिषद सदस्य चंद्रशेखर भोसले,मा. नगरसेवक सुनील ढोरे यांच्या हस्ते आणि उद्योजक सोमनाथ ढोरे,ज्येष्ठ मार्गदर्शक वसंतराव भिलारे,उद्योजक खंडूशेठ भिलारे आणि मावळ फेस्टीवलचे संस्थापक प्रवीण चव्हाण, कार्याध्यक्ष गुलाबराव म्हाळसकर, अध्यक्ष सुरेश जांभूळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत मंच पूजन संपन्न झाले.

उपाध्यक्ष विनायक भेगडे,सचिव विवेक धर्माधिकारी, खजिनदार महेंद्र म्हाळसकर,सह.सचिव ॲड.पवन भंडारी,सह.खजिनदार सागर जाधव,संचालक नामदेवराव ढोरे,बाळासाहेब भालेकर,नितीन कुडे,अरुण वाघमारे, शैलेन्द्र ढोरे,शामराव ढोरे,जितेंद्र कुडे, रवींद्र काकडे,किरण म्हाळसकर, शंकरराव भोंडवे,भूषण मुथा आदी मान्यवर आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# 'हेडाम' कादंबरीच्या तिसऱ्या आवृत्तीचे महाबळेश्वर येथे होणार प्रकाशन




**वावरहिरेः-** नागू वीरकर लिखित हेडाम हया बहुचचीत कादंबरी च्या तिसऱ्या अवृतीचे प्रकाशन २१ जानेवरी २०२४ ला प्रसिद्ध लेखक कादंबरीकार साहित्य आकदमी सदस मा. डॉ.विश्वास पाटील यांच्या हस्ते महाबळेशर येथे प्रकाशन होणार आहे. हेडाम हया कादंबारीस प्रकाशन होऊन पुरते वर्ष झाले नाही. तो पर्यंतच तिसरी आवृत्ती प्रकाशित होत आहे. गत वषतील सर्वाधिक खपाची पुस्तका पैकी एक साहित्य कृती म्हणून चचीत आहे.

हेडाम हया कादंबारीस ग्रामीण साहित्यात मनाचा मानला जाणारा भी. ग. रोहमारे, मुक्त सृजन पत्रिका, कादवा शिवार, व इतर मिळून एकूण आठ राज्यस्तरीय पुरस्कार एकच वर्षात भेटले आहेत.

हेडाम कादंबरी जपान, अमेरिका, कॅनडा, परदेशात पोहचली असून.विदेशात वाचक वर्ग दिवसान दिवस वाढत आहे.

हेडाम इंग्रजी व इतर भाषेत अनुवादीत करण्याचे काम युद्ध पातळीवर सुरु असुन त्या त्या भाषेतील प्रभूत्व असणारे दिग्ज साहित्यिक करत आहेत. लवकरच हेडाम इतर भाषेत अनुवादीत होईल असे लेखक नागू वीरकर यांनी सांगितले.

दुष्काळ ग्रस्त माणदेशी माणसांच्या व्यथा वेदना, सवेदना मांडणारी साहित्य कृतीस माणदेशी उच्च पदस्त आयकर आयुक्त डॉ. नितीन वाघमोडे साहेब. मा. अपर. जिल्हाधिकारी डॉ. जगन्नाथ वीरकर, जेष्ठ समीक्षक, साहित्यिक, बुरगाठ कादंबरीचे लेखक डॉ. प्रा. महेश खरात, युवा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त फेसाठी कादंबरीचे लेखक नवनाथ गोरे, दलित साहित्य लेखक, समीक्षक बी. अनील,प्रसाद मोरे प्राध्यपक महा.संघाचे अध्यक्ष विजय शिरसाठ,यांच्या शुभेच्छा पर लेखी प्रतिक्रिया आपणास तिसऱ्या आवृत्तीच्या शेवटी वाचायला भेटतील.

हेडाम साहित्य कृती वाचून पुण्य श्लोक अहिल्यबाई होळकर विद्यापीठ कुलगुरू डॉ. प्रकाश महावर यांनी विद्यापीठात खास बोलून अभिनंदन करत शुभेच्या दिल्या. हा माझा मोठा बहुमान आहे असे लेखक सांगतात.

महाबळेश्वर येथे होणाऱ्या दुसऱ्या साहित्य संमेलनात खासदार श्रीनिवास पाटील,डॉ.विश्वास पाटील साहेब , राजा दिक्षित, डॉ रवींद्र शोभने, डॉ. नागनाथ पाटील यांच्या हस्ते मुक्त सृजन साहित्य पत्रिकेचा विशेष पुरस्कार देऊन 'हेडाम' या कादंबरीस सन्मानित करण्यात येणार आहे.

# बॅनर, होर्डिंग्जसाठी मोजावे लागणार शुल्क
## देहू नगरपंचायत ठराव - नगराध्यक्षा सौ.पुजा दिवटे

**देहूगाव :** देहू नगरपंचायत हद्दीत अनेक ठिकाणी बॅनर, होर्डिंग्ज दुकानासमोर जाहिराती लावल्या जात होत्या. परंतु, यापुढे अशा जाहिरातींवर देहू नगरपंचायतीने ठरवून दिलेल्या ठिकाणी आणि नगरपंचायतीने जे दर दिले आहेत, त्यानुसार दर आकारणी होणार आहे.

नगरपंचायतीने ठरवून दिल्यानुसार बॅनर, होर्डिंग्ज लावावे लागणार आहेत. त्यावर क्यूआर कोड असणार आहे.

जाहिरातदाराचे नाव, मुदत, प्रिंटिंग प्रेसचे नाव यांचा यामध्ये समावेश असणार आहे. महापुरुषांच्या जयंती, दशक्रिया विधी जाहिरात बॅनरसाठी जाहिरात फलकाची मर्यादा असणार आहे. अशा ठरावासह वीस ते बावीस ठरावांना




बुधवारी (ता.१७) देहूगाव नगरपंचायतीच्या झालेल्या सवर्साधारण सभेस मंजुरी देण्यात आली. देहूगाव नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी निवेदिता घार्गे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक संपन्न झाली. यामध्ये एकूण २६ विषय ठेवण्यात आले होते. त्यापैकी २० ते २२ विषयांना मंजुरी देण्यात आली.

देहू, माळीनगर, विठ्ठलनगरमधील मालमत्तांचे चतुर्थ वार्षिक सुधारित भांडवली मूल्याप्रमाणे करआकारणी करणे. चतुर्थ वार्षिकीशाठी मालमत्ता वार्षिक करामध्ये शासन निणर्यानुसार शिक्षण व रोजगार हमी उपकराचा दर ठरविणे, अनधिकृत बांधकामांना दंड आकारून त्यांची नोंद करणे, लोकसेवा अधिनिमानुसार देण्यात येणा ्या विविध सुविधांचे व इतर दाखल्यांचे दर निश्चित करून ते मंजूर करण्यात आले. देहूनगर पंचायत विभागाअंतर्गत देण्यात येणाऱ्या परवानग्यांसाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्कामध्ये सुधारणा करून त्यास मान्यता देण्यात आली. पंचायतीकडून विविध अनुज्ञप्ती, व्यवसाय, ना हरकत प्रमाणपत्र, व्यवसाय नूतनीकरण करण्याबाबत व्यवसायाच्या अनुषंगाने शुल्क आकारणी करणे. महिला व बाल कल्याण समितीमार्फत हळदी कुंकू समारंभाचे आयोजन करणे आदी विषयासह मंजुरी देण्यात आली. या बैठकीस देहच्या नगराध्यक्षा पूजा दिवटे, उपाध्यक्ष सुधीर काळोखे, तसेच सर्व नगरसेवक, नगरसेविका उपस्थित होते.

# ढगाळ हवामानामुळे कांदा पिकाला फटका

## ढगाळ वातावरणाने शेतकरी चिंतेत! कांदा, ऊस, मका, हरभरा, गहू पिकावर रोगराईचा प्रादुर्भाव...

**मनोहर हिंगणे**

**ओतूर :** जुन्नर तालुक्यातील उत्तर भागात असलेल्या ओतूर,रोहोकडी, फापाळेशिवार, आंबेगव्हान,पाचघर, उदापुर,डिंगोरे, अहिनवेवाडी व परिसरात सध्या ढगाळ हवामानामुळे कांदा पिकावर मावा,करपा रोगांचा प्रादूर्भाव वाढला असल्याने महागडी औषधाची फवारणी करण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. लहरी हवामानामुळे कांद्याची प्रतवारी ढासळली असून, ढगाळ वातावरण निर्माण झाल्याने शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसत आहे.



सध्या महागाईत भरमसाठ वाढ झाली असल्याने रासायनिक खते कीडनाशके, शेती औषधाची महागाई भरमसाठ वाढ झालेली आहे . त्यात निसर्गाच्या हवामान बदलामुळे शेतकरी वर्ग मोठ्या प्रमाणात संकटात सापडले आहेत .

सध्या कांदा जगविण्यासाठी शेतकरी वर्ग मोठ्या प्रमाणात महागडी औषधांची फवारणी करतानाचे चित्र अणे-माळशेज पट्ट्यात सध्या पाहायला मिळत आहे. निसर्गाचा हवामान बदलामुळे शेतकऱ्यांना फटका बसतो आहे.मागील पंधरा दिवसांपासून ढगाळ वातावरण,व दाट धुके निर्माण झाले असल्याने शेतकऱ्यांना कीटकनाशके, बुरशीनाशक यांचा कांदा पीक वाचविण्यासाठी खर्च होत आहे. कांद्याला कसा बाजारभाव मिळतो, हे माहीत नसले तरी सध्या शेतकरी आशावादी राहून आपल्या शेतामध्ये राबराब कष्ट करताना दिसत आहेत. ढगाळ वातावरणामुळे पिकांवर किडीचे आणि रोगराईचे प्रमाण वाढताना दिसत आहे. मका पिकावर अळीचा प्रादुर्भाव वाढल्याने शेतकऱ्याला वारंवार औषध फवारणी करावी लागत आहे. ढगाळ वातावरणामुळे गहू पिकावर तांबेरा पडला आहे, हरभरा पिकांवर अळी व ऊस पिकांवरती लोकरी मावा, कांदा पिकांवर रसशोषित किडीचा प्रादुर्भाव झाल्याने पातीवर पांढरे ठिपके पडले आहेत.

*शेतकऱ्याला आशावादी राहून आपल्या शेतामध्ये काबाडकष्ट करून शेती कामात व्यस्त राहावे लागते; पण निसर्ग व हवामान बदलामुळे कांदा पीक वाचविण्यासाठी धडपड सुरू आहे. सध्या ढगाळ वातावरण निर्माण झाले असल्याने कांद्यावर मावा,करप आदी रोगांचा प्रादुर्भाव वाढला आहे. शेतकऱ्यांच्या मागे संकटांची मालिका सुरूच असते; परंतु शासन त्यावर ठोस मार्ग काढत नाही.*

**- श्री.रोहिदास दशरथ शिंदे, शेतकरी, उदापुर**

बदलत्या वातावरणामुळे शेतकरी हैराण झाला आहे. अगदी हिवाळ्यात सुद्धा पावसाचे वातावरण तयार होताना दिसत आहे. कधी अचानक गारठा वाढत आहे. तर दाट धुके पडत आहे. वातावरणात बदल होत असल्यामुळे पिकांवर रोग पडण्याचे प्रमाण वाढत आहे. सततचे ढगाळ वातावरण व अवकाळी पावसाने हवेत आर्द्रतेचे प्रमाण जास्त आहे. याचा कांद्यासह ऊस, मका, हरभरा आणि गहू पिकाला फटका बसण्याची शक्यता आहे.

**- श्री, रविंद्र अर्जुन घोलप.**
प्रगतशील शेतकरी रोहोकडी( महालक्ष्मी नगर ).

पीक उत्पादन खर्च यात ताळमेळ बसेल की नाही, याचीही शाश्वती नसते, तरीही शेतकरी आपल्या कुटुंबाची जबाबदारी संपूर्णपणे शेतीवरच पार पाडीत असतो. शेतीत लागणारी रासायनिक खते, मजुरी, फवारणी असा एक एकरासाठी साठ ते सत्तर हजार रुपयांचा खर्च शेतकऱ्यांचा झालेला आहे. तरीदेखील आज ना उद्या योग्य भाव मिळेल, या अपेक्षेने पीक जगविण्यासाठी शेतकऱ्यांची धडपड सुरू असल्याचे दिसून येत आहे.

ढगाळ वातावरणामुळे कांदा उत्पादक शेतकरी अधिक चिंतेत आहे. या वातावरणामुळे कांदा पिकाच्या पाती पिवळ्या पडून वाकत असल्याचे दिसून येत आहे. किडीमुळे पातीवर पांढरे ठिपके पडल्याचेही दिसत आहे. एका बाजूला निर्यातबंदीचा फटका आणि त्याच वेळी बदलते हवामान यामुळे जुन्नर तालुक्यातील अणे माळशेज पट्ट्यातील शेतकरी राजा धास्तावला आहे.

# महाळुंगे येथे ३४ केवी सब स्टेशन सुरू करा

## तक्रार निवारण शिबिरात ग्रामस्थांची मागणी महाळुंगे



**पडवळ :** आंबेगाव तालुक्यातील राजकीय दृष्ट्या महत्त्वाच्या असलेल्या महाळुंगे पडवळ या गावात वीज वितरण कंपनीतर्फे घेण्यात आलेल्या तक्रार निवारण शिबिरात शेकडो नागरिकांनी वीज महामंडळाच्या गलथान कारभाराबाबत अधिकाऱ्यांसमोर तक्रारी मांडल्या कमी दाबाने वारंवार खंडित होणारा वीज पुरवठा त्वरित सुरळीत करावा महाळुंगे पडवळ गायरानात मंजूर करण्यात आलेले 34 केवी वीज सबस्टेशन त्वरित कार्यान्वित व्हावे अशी मागणी यावेळी करण्यात आली महाळुंगे पडवळ येथील हुतात्मा बाबू गेनू स्मारकात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने तक्रार निवारण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी आंबेगाव तालुक्याचे कार्यकारी अभियंता शांताराम बांगर उपअभियंता निलेश रासकर शाखा अभियंता मनोहर मुंडे शरद सहकारी बँकेचे संचालक किसनराव सैद उपसरपंच विकासराव पडवळ माजी जिल्हा परिषद सदस्य डि के चासकर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक अशोक डोके भीमाशंकर कारखान्याचे माजी संचालक दीपक चासकर वि का सोसायटीचे माजी चेअरमन माणिक सैद हुतात्मा बाबू गेनू युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाबाजी चासकर आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी शेतकऱ्यांनी केलेल्या मुख्य तक्रारीत नवीन डीपी बसवण्यात यावी सर्वत्र विजेच्या तारा लोंबत आहेत अनेक पोल वर काटेरीवेली चढलेल्या आहेत झाडाझुडपांमधून गेलेल्या वीज वाहकतारांमुळे वारंवार वीज पुरवठा खंडित होतो कमी दाबाने वीज पुरवठा केल्याने कांदा लागवड करताना मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांना अडचणींना तोंड द्यावे लागले पाणीपुरवठा बंद झाल्याने मजुरी अंगावर द्यावी लागली यामुळे मोठा आर्थिक तोटा शेतकऱ्यांना सहन करावा लागला असे ज्येष्ठ समाजसेवक नवनाथ जम्बुकर यांनी सांगितले ग्रामस्थांच्या तक्रारींना उत्तर देताना कार्यकारी अभियंता बांगर म्हणाले पुढील सहा महिन्यात निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यावर 34 केवी महाळुंगे पडवळ वीज वितरण चे सब स्टेशन सुरू करण्यात येईल ग्राहकांनी वीज बिले वेळेवर भरावीत चोरून वीज वापरण्याचा प्रयत्न करू नये नवीन वीज जोड देण्यात येतील मीटर बसून वीज वापर करावा कार्यक्रमाचे नियोजन रामदास वळसे पाटील गणेश आवटे मुकुंद बारवे आदींनी केले होते चौकटीत राज्याचे सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्याकडे मागील महिन्यात ग्रामस्थांनी महाळुंगे साकोरे नांदूर टाकेवाडी विठ्ठलवाडी फुलेवाडी आदी परिसरातील शेतकऱ्यांनी विजेच्या बाबत अनेक तक्रारी केल्या होत्या यावर उपाय म्हणून वळसे पाटील यांचे सूचनेनुसार वीज वितरण कंपनीच्या वतीने तक्रार निवारण शिबिर घेण्यात आल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधान पसरले आहे महाळुंगे पडवळ येथे वीज वितरण कंपनीने घेतलेल्या तक्रार निवारण शिबिरात तक्रारी मांडताना शेतकरी छाया बी एस चिखले

# विधवा महिलांच्या सन्मानासाठी कार्यरत राहणार - सीमा तनपुरे

## उन्नती प्रतिष्ठान तर्फे गंगाभागीरथी महिलांसाठी हळदीकुंकू समारंभ संपन्न




**रुपेश जाधव**

**भोर :** महिलांचा उध्दार व्हावा समाजात मान सन्मान मिळावा यासाठी अनेक महामानवांनी, महान स्त्रीयांनी आपल्या जीवाचे रान केले व महिलांना समतेचा हक्क मिळवून दिला. समाजातील महीला शिकल्या पुरुषां च्या खांद्याला खांदा लावून काम करत समाजात वावरु लागल्या वैज्ञानिक युगात वावरत असताना आजही सुशिक्षित समजल्या जाणाऱ्या समाजात महिलांना जुन्या रुढी परंपराना बळी जावे लागत असताना दिसत आहे. पतीच्या निधनानंतर महिलेचे आयुष्य एकाकी करण्याच्या या प्रथेमुळे विधवा महिलांना सामाजिक, धार्मिक कार्यक्रमात सहभागी होता येत नाही. विधवा महिलांना हिन वागणूक दिली जाते याच प्रथेला मुठमाती देत या विरोधात आवाज उठवून अशा महिलांना समाजात सन्मानाने जगता यावे यासाठी गेल्या वर्षापासून विधवा सन्मानार्थ हळदीकुंकू समारंभ आयोजित करत असुन पुढे यासाठी काम करणार असल्याचे उन्नती प्रतिष्ठानच्या अध्यक्षा सिमा तनपुरे यांनी सांगितले.

उन्नती प्रतिष्ठान भोर तालुकाच्या वतीने संक्रांत निमित्त सोमवार (दि.१५) रोजी भोर येथील नागोबाआळीत आयोजित विधवा महिलांच्या सन्मानासाठी हळदीकुंकू समारंभ प्रसंगी त्या बोलत होत्या.

सीमा तनपुरे पुढे म्हणाल्या की, अशा महिलांना विधवा न संबोधता 'गंगाभागीरथी' या नावाने संबोधले जावे.या समारंभात अशा महिलांना हळदीकुंकू लावून संक्रांतीचे वाण देत तीळ गूळ देऊन आनंद साजरा करण्यात आला. विधवा महिलांना सामाजात सन्मानाने जगण्याचा अधिकार असून त्यासाठी उन्नती प्रतिष्ठान पुढाकाराने काम करणार असल्याचे संगीतले व प्रत्येक गावात देखील अशा कार्यक्रमांचे आयोजन व्हावे व या स्त्रीयांना सन्मान करावा असे आवाहन यावेळी केले. यावेळी उपस्थिती महिलांच्या चेहऱ्यावर वेगळाच आनंद दिसत होता. त्यापैकी काहीनी मनोगत व्यक्त करताना उन्नत्ती प्रतिष्ठान ने साजरा केलेल्या कार्यक्र माबद्दल आदर व्यक्त केला व आभार मानले.

यावेळी उन्नती प्रतिष्ठान च्या अध्यक्षा सीमा तनपुरे, भाग्यश्री वरटे, स्मिता सुर्वे, वैशाली बांदल, अश्विनी धोंडे, सुषमा कंक, संध्या झगडे, मनीषा पडवळ, यांच्यासह गंगा भागीरथी महीला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# शिरूर लोकसभेचा गड कोण राखणार?

**पुणे / रमेश जाधव**

आगामी 2024 च्या लोकसभेचे बिगुल वाजायला सुरुवात झाली आहे . प्रामुख्याने शिरूर लोकसभा मतदार संघावर सध्या सर्वच राजकीय पक्षांचे नेते आपल्याच विचाराचा उमेदवार विजयी होणार असे सांगत आहेत . मात्र आगामी काळात शिरूर लोकसभेचा विजेता उमेदवार कोण असणार आहे हे येणारा काळ ठरवेल . मात्र शिरूर लोकसभेतील होणाऱ्या निवडणुकीत विद्यमान खासदार डॉ.अमोल कोल्हे यांच्या विरोधात शिवसेना एकनाथ शिंदे गटाचे माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील निवडणूक लढण्याची दाट शक्यता आहे . दरम्यान या मतदार संघात स्वतः पै.मंगलदास बांदल हे देखील शिरूर लोकसभा निवडणूक लढविणार असल्याचे स्वतः बांदलांनी सदर प्रतिनिधीशी बोलताना सांगितले . त्यामुळे शिरूर लोकसभा मतदार संघात होणारी निवडणूक ही तिरंगी होण्याचे दाट संकेत मिळत आहेत . जर मंगलदास बांदल यांनी शिरूर लोकसभेची निवडणूक लढवली तर होणारी शिरूर लोकसभेची निवडणूक आढळराव पाटील आणि कोल्हे यांच्या दृष्टीने त्रासदायक असणार हे मात्र तितकेच खरे . होणारी निवडणूक कोणत्याही उमेदवाराला सोपी नसून निवडणूक जिंकण्यासाठी उमेदवारांचा कस या मतदारसंघात लागणार हे मात्र तितकेच खरे आहे . 2019 साली शिरूर मतदार संघात लोकसभेच्या झालेल्या निवडणुकीत तीन वेळा विजयाची हॅट्रिक केलेले शिवसेनेचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांना डॉ. अमोल कोल्हे यांनी पराभूत केले . त्यावेळी मालिका मधील चेहरा आणि जातीचे कार्ड चालवून कोल्हे विजयी झाले . मात्र आढळरावांना डॅमेज करण्याचे काम खऱ्या अर्थाने वक्तृत्वात माहिर असलेले पै.मंगलदास बांदल यांनी केले. त्यावेळी ते कोल्हेंच्या विजयाचे शिल्पकार ठरले . पुणे जिल्हा परिषदेच्या बांधकाम समितीचे माजी सभापती पै.मंगलदास बांदल यांच्यामुळे आढळराव पराभूत झाले असे त्या वेळी सवर्सामान्य मतदारांमध्ये बोलले जात होते. डॉ.अमोल कोल्हे यांच्या प्रचारार्थ झालेल्या अनेक सभांमध्ये मंगलदास बांदल यांनी आढळराव यांच्या विरोधात भाषणांमधून कडवट टीका करून शिरूर लोकसभा मतदारसंघाचे वास्तव लोकांसमोर आणले आणि साहजिकच बांदल यांच्या वकृत्व शैलीमुळे आढळराव पाटलांना पराभूत व्हावे लागले असे बोलले गेले . दरम्यान शिवसेना शिंदे गटाचे उपनेते तथा माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्यासोबत सध्या मंगलदास बांदलांची मैत्री असल्याकारणाने यावेळच्या लोकसभा निवडणुकीत बांदल हे आढळराव पाटलांबरोबरच न राहता ते स्वतः लोकसभेची निवडणुक लढविणार असल्याचे त्यांनी स्वतः सांगितले . काही दिवसांपूर्वीच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शरद पवार गटाचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शिरूरचे खासदार डॉ.अमोल कोल्हे यांना पराभूत करण्याचे चॅलेंज दिले आहे . सध्याच्या राजकीय बदलांमुळे शिवाजीराव आढळराव पाटील हे आगामी काळात कोणत्या पक्षाकडून उमेदवारी घेणार हे अद्याप गुलदस्त्यात आहे . मात्र डॉ. अमोल कोल्हे यांच्या विरोधात अजित दादा गटाकडून आढळराव पाटील पुन्हा शिरूर लोकसभेच्या आखाड्यात उतरतील अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे . त्यामध्ये आता शिरूर लोकसभेच्या रिंगणात पै.मंगलदास बांदल उतरण्याचे जवळजवळ निश्चित झाले आहे . गेल्या काही महिन्यापूवी राज्यातील सत्ता संघर्षात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि शिवसेना पक्ष विभागले गेले . डॉ. अमोल कोल्हे यांनी शेतकरी आक्रोश मोर्चा काढून महायुती सरकारच्या मनसुब्यात काटे टाकण्याचे काम केले .त्यामुळे संतापलेल्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कोल्हेंचा वारू रोखण्याचा आता चंग बांधला आहे . आगामी लोकसभेच्या घाटात कोल्हे यांची पुन्हा बारी करून द्यायची नाही असे खुले आव्हान अजित पवार यांनी कोल्हेंना दिले आहे . त्यामुळे साहजिकच शिरूर लोकसभेची होणारी निवडणूक ही कोणत्याच पक्षाच्या उमेदवारासाठी सोपी नसणार हे तितकेच खरे .

# डॉ. जाधव यांना महाराष्ट्र शासनाचा 'ज्ञानोबा-तुकाराम' पुरस्कार



**देहुगांव :** महाराष्ट्र शासनाचा २०२३ चा 'ज्ञानोबा- तुकाराम' पुरस्कार आळंदी येथील वारकरी संप्रदायातील अभ्यासू, विद्वान गुरुवर्य हभप डॉ. नारायण महाराज जाधव यांना जाहीर झाला आहे. डॉ. नारायण महाराज जाधव हे वेदांत सत्संग समितीचे प्रमुख आहेत, तसेच वारकरी साधकांचे आदर्श अध्यापक आहेत. त्यांना हा महाराष्ट्र शासनाचा २०२३ चा 'ज्ञानोबा-तुकाराम' पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल वारकरी संप्रदाय व आळंदीकर ग्रामस्थांना आनंद झाला आहे.

संत साहित्यावर उत्कृष्ट लेखन करणाऱ्या किंवा संतांना अभिप्रेत असलेल्या मानवतावादी कार्य करणाऱ्या महनीय व्यक्तीला महाराष्ट्र शासनाच्यावतीने प्रतिवर्षी ज्ञानोबा तुकाराम पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. रुपये ५ लक्ष रोख, मानपत्र तसेच मानचिन्ह असे या पुरस्कारांचे स्वरूप आहे. ज्यांनी आपले सारे आयुष्य संत साहित्याचा अभ्यास करण्यात घालवले अशा व्यक्तीला हा पुरस्कार मिळतो. या प्रकारच्या पुरस्कारांत हा सर्वात मानाचा सन्मान समजला जातो. यापुवी आळंदीतील शांतीब्रम्ह मारुती महाराज कुन्हेकर व डॉ. किसन महाराज साखरे यांना यापूवी महाराष्ट्र शासनाचा ज्ञानोबा-तुकाराम पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

# मनोरुग्णास मेंटल हॉस्पीटला पाठवा

**हडपसर :** गेले दोन-तीन महिन्यापासून वैदवाडी भागातील मनोरुग्ण माथेफिरुने उछांद मांडला असून त्याने आतापर्यंत रस्त्याने जाणा-या येणा-या दहा महिलांवर दगड मारून गंभीर जखमी केलेले आहे.वैदवाडी पूलावर एका महिलेच्या डोक्यात गठ्ठू मारल्याने महिला गंभीर जखमी झाली .त्या महिलेचा डोळा कायमचा जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे.महिलांवर दगड मारत तो बसेसवर , दुचाकी गाड्या फोडल्या आहेत , दिसेल त्यास दगड मारत सुटल्यांने या भागातील नागरीक भयभीत झाले आहेत.



बुधवारी माथेफिरूस ताब्यात घेतले असून त्यांच्यावर कारवाई करुन त्याला वेड्याच्या दवाखान्यात पाठवण्यात यावे अशी मागणी शिससेना जिल्हा प्रमुख उल्हास तुपे यांनी केली आहे.

अनेक दिवस झाले वेडा मनोरुग्ण माणसाकडून नागरीकांना त्रास होत आहे.चाललेला हा प्रकार कुठेतरी थांबणं गरजेचं आहे त्या मेंटल माणसाला अगोदर गुन्हा दाखल झाला होता,पोलीस त्यास सोडल्यानंतर वारंवार वेडसर असे प्रकार करून निष्पाप माता भगिनींना व नवीन गाड्यांना टारगेट करत आहे अशा माणसाला मेंटल हॉस्पिटलमध्ये पाठवणे गरजेचे आहे त्याच्यामुळे आज तागायत दहा महिला गंभीररीत्या जखमी झाल्या आहेत कुणाचा जीव गेल्यानंतर या मेंटल वरती कारवाई करून उपयोग होणार नाही , त्याचा पोलीसांनी बंदोबस्त करावा , असे पुणे जिल्हा प्रमुख उल्हास तुपे सांगितले.

वैदवाडी ब्रिज वरती कितीतरी दिवस झाले टू व्हीलर फोर व्हीलर मध्ये असलेल्या महिलांना सिमेंटचा गट्टू डोक्यात मारणारा व फोर व्हीलर फोडणारा सायको आज आवटे वस्तीतील युवकांनी पाठलाग करून पकडला व पोलिसांच्या ताब्यात देऊन त्याच्यावरती गुन्हा दाखल करण्यात येत होते.आज सकाळी एक स्कूल बसची काच फोडली तसेच एका ट्रकची काच फोडली एका महिलेला मारलेला गट्टू हुकल्यामुळे महिलेचा जीव वाचला असल्या मनोरुग्णाला मेंटल हॉस्पिटल ला टाकने गरजेचे आहे हडपसर मध्ये ह्या माथे फिरूमुळे दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे या मनोरुग्णाला कार्यकर्त्यांनी तकडून पोलिसाच्या ताब्यात देण्यात आले आहे.

# आईच्या स्मरणार्थ वृक्ष लागवड करत दिला सामाजिक संदेश

**रांजणी / रमेश जाधव**

आईच्या मृत्यूनंतर तिच्या आठवणी सदैव अबाधित राहाव्यात व त्यातून गावासमोर एक आदर्श निर्माण व्हावा,या उद्देशाने आईच्या दशक्रिया विधीच्या निमित्ताने वृक्ष लागवड करून वळसे पाटील कुटुंबियांनी समाजासमोर एक नवीन आदर्श निर्माण केला आहे. निरगुडसर ता.आंबेगाव येथील दोन पत्रकार बंधु जेष्ठ पत्रकार दिलीप वळसे पाटील, व आंबेगाव तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष वळसे पाटील यांनी मातोश्री चंद्रभागा वळसे पाटील यांच्या



दशक्रिया विधीच्या निमित्ताने वळसे पाटील कुटुंबियांकडून आईच्या स्मरणार्थ आईच्या वयाप्रमाणे म्हणजेच ८२ झाडे लावून आईच्या स्मृती जपण्याचा प्रयत्न केला व समाजापुढे एक पर्यावरण संतुलनाचा आदर्श निर्माण केला आहे. त्याचप्रमाणे आईच्या मिळालेल्या अस्थी व राख हि त्याच झाडांना खत म्हणून वापरण्याचा निर्णय घेतला.त्यामुळे नदीचे होणारे प्रदुषण टळणार आहे.तसेच वृक्षारुपाने आईच्या स्मृती जिवंत ठेवण्याचा एक आदर्श या कुटुंबाने समाजासमोर ठेवला आहे.त्याचप्रमाणे या कुटुंबाने गावामध्ये ग्रामपंचायतने पाच एकर जागा उपलब्ध करून दिल्यास त्या ठिकाणी फळझाडे लावून ती फळझाडे ठिबक सिंचन संच बसवून जगवण्याचा निर्धार केला आहे. वृक्षसंर्वधन हि काळाची गरज कशी आहे.असा सामाजिक संदेश देत येणार्या काळात पृथ्वीचे वाढणारे तापमान लक्षात घेता शुद्ध हवा मिळणे खुप अवघड होणार आहे, असे यावेळी डि.के.वळसे पाटील यांनी सांगितले. यावेळी उपस्थित शरद सहकारी बँकेचे अध्यक्ष देवेंद्र शहा यांच्या हस्ते प्राथमिक स्वरूपात झाडे लावून वृक्ष लागवडीची सुरवात करण्यात आली.यावेळी उपस्थित शिरूर-हवेलीचे आमदार अशोक बापु पवार, माजी आमदार विलास लांडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक देवदत्त निकम, भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष बाळासाहेब बेंडे, उपाध्यक्ष प्रदीप वळसे पाटील, पै.मंगलदास बांदल, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे पक्षाचे सुरेश भोर, निरगुडसर गावचे सरपंच रवींद्र पाटील, ॲड.निलेश शेळके, निवेदक निलेश पडवळ यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

# आळंदी देवस्थानच्या प्रमुख विश्वस्तपदी ॲड. राजेंद्र उमाप



**देहुगांव :** महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमेटीच्या प्रमुख विश्वस्तपदी ॲड. राजेंद्र बाबुराव उमाप यांची निवड झाल्याची माहिती आळंदी देवस्थानचे व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर यांनी दिली आहे.

श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीची सभा पुणे येथील कार्यालयात मावळते प्रमुख विश्वस्त योगेश देसाई यांचे अध्यक्षतेखाली झाली. या सभेस विश्वस्त ॲड. विकास ढगे पाटील, योगी निरंजननाथ, डॉ. भावार्थ देखणे उपस्थित होते. विश्वस्त लक्ष्मीकांत देशमुख हे अनुपस्थित होते. राज्यातील वकिलांची शिखर संघटना असलेल्या बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवाच्या उपाध्यक्ष तसेच चिंचवड देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त म्हणून ॲड. राजेंद्र उमाप हे काम पाहत आहेत. नुकतीच त्यांची संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीच्या विश्वस्तपदी निवड झाली आहे. त्यांच्या बरोबर योगी निरंजननाथ, डॉ. भावार्थ देखणे यांची सुध्दा निवड करण्यात आली आहे. उर्वरित तीन जागांवर तत्कालीन विश्वस्त योगेश देसाई, विकास ढगे पाटील, लक्ष्मीकांत देशमुख यांना मार्च महिन्यापर्यंत मुदत वाढवून देण्यात आली आहे. मार्च महिन्यानंतर उर्वरित तीन जागा भरण्यात येणार असून त्यात स्थानिक आळंदीकर ग्रामस्थांची नेमणुक करण्यात येईल का नाही हे पाहणे महत्त्वाचे आहे.

# वडगावातील मांस व मद्य विक्री २२ जानेवारी रोजी बंद ठेवा



**वडगाव मावळ :** आयोध्या येथे निर्माणाधीन राम मंदिरात प्रभू श्रीराम यांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा २२ जानेवारी रोजी होत आहे. या पार्श्वभूमीवर २२ जानेवारी रोजी वडगाव नगरपंचायत हद्दीतील मांस व मद्य विक्री बंद ठेवावी, अशी मागणी वडगाव शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने करण्यात आली आहे.याबाबत वडगाव मावळ पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक कुमार कदम यांना निवेदन देण्यात आले आहे

निवेदनात म्हटले आहे की. अखंड भारतीयांचे आराध्य दैवत तीर्थक्षेत्र आयोध्या येथे ५०० वर्षानंतर सुवर्णक्षण प्रभू श्रीराम मूर्तीची प्रतिष्ठापना सोहळा संपन्न होणार आहे, मोठ्या भक्ती भावाने प्रभू रामांची प्रतिष्ठापना होत

### वडगाव शहर राष्ट्रवादी काँग्रेसची मागणी

असताना याची देही याची डोळा हा सुखद सोहळा स्वर्गी कुठे नाही दरम्यान वडगाव शहरातील व परिसरातील भागात प्रतिष्ठापनेच्या दिवशी कोणत्याही प्रकारचे मांसाहार विक्री व मद्य विक्री होऊ नये सदर दुकानदार बंधूंना नगरपंचायत मार्फत व पोलीस स्टेशन मार्फत बंद ठेवण्यास विनंती करावी अशी मागणी वडगाव शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने नगरपंचायत व पोलीस प्रशासनाला निवेदनाद्वारे करण्यात आली आहे ब सय्यद, सोमनाथ धोंगडे, अनिल ओव्हाळ, बाळासाहेब शिंदे, पंकज भामरे, विशाल सुराणा, पप्पू सोळंकी, राहील तांबोळी आदी उपस्थित होते.

# म्हैसाळ सिंचन योजनेच्या पूर्ततेसाठी माजी आमदारांचा निवडणुकीवर बहिष्कार

**जत :** जत तालुक्यातील ६५ गावांतील विस्तारित म्हैशाळ योजनेच्या पाइपलाइनचे सर्वेक्षण करण्यात येत आहे. ते लवकर पूर्ण करून विस्तारित म्हैसाळ सिंचन योजनेच्या उर्वरित कामाची तत्काळ निविदा काढावी, योजनेच्या कामास सुरवात करावी आदी विषयांवर सर्वपक्षीय बैठक झाली. सरकारने लोकसभा निवडणुकीपूर्वी घोषणा न केल्यास रास्ता रोको आंदोलन व मोर्चा काढू. शासनाला जागे करण्यासाठी वंचित गावात येणाऱ्या लोकसभेच्या निवडणुकीवर प्रसंगी बहिष्कार टाकण्याचा इशारा माजी आमदार विलासराव जगताप यांनी दिला.

येथील राजमाता जिजाऊ सभागृहात विस्तारित म्हैसाळ योजनेसाठी माजी आमदार विलासराव जगताप यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली.



राष्ट्रवादीचे नेते सुरेश शिंदे, काँग्रेस तालुकाध्यक्ष बाबासाहेब कोडग, आकाराम मासाळ, रवींद्र सावंत, विष्णू चव्हाण, प्रमोद सावंत, दिग्विजय चव्हाण, अभिजित चव्हाण, उपअभियंता पाटील, शाखा अभियंता माळी, महादेव अंकलगी, यांच्यासह ६५ गावांतील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जगताप म्हणाले, म्हैसाळ योजनेची वाट पाहण्यात येथील दोन पिढ्यांचे आयुष्य गेले. अद्यापही काम पूर्ण नाही. मात्र, विस्तारित म्हैसाळ योजनेच्या पहिल्या टप्प्यातील कामाला सुरवात झाली आहे. आता उर्वरित जत तालुक्यातील मुख्य, उपवितरिका टाकण्यासाठी सर्वेक्षण करत आहेत. हे सर्वेक्षण तातडीने पूर्ण करून या कामाला सुरवात करावी. शिवाय २५ तलाव व २२५ पाझर तलाव भरण्यात येणार आहेत. ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी गेल्या आहेत, त्यांना शासनाकडून मोबदला मिळाला नाही. त्याबदल्यात त्यांना गाळपेर करण्यासाठी त्या दिल्या होत्या. मात्र, ते आता मिळणार नाही, त्या शेतकऱ्यांना मोबदला द्यावा. राष्ट्रवादीचे नेते सुरेशराव शिंदे म्हणाले, विस्तारित म्हैसाळ योजनेला सहा टीएमसी पाणी उपलब्ध करून त्याचा अंतिम नकाशा हे प्रदेशाध्यक्ष, नेते जयंत पाटोल यांनी मंजूर केला होता. आता खासदार संजय पाटील व माजी आमदार जगताप यांनी पाठपुरावा केला. योजनेचे जनक जयंत पाटील हेच आहेत. वेळोवेळी आम्ही जत तालुक्यातील पाण्यासाठी पक्षपात न करता एकत्र आलो. यापुढे पाण्यासाठी माजी आमदार जगताप यांच्या सोबत राहू.

काँग्रेसचे तालुकाध्यक्ष बाबासाहेब कोडग म्हणाले, जतचा दुष्काळ दुर करण्यासाठी वेळोवेळी काँग्रेसने आवाज उठवला आहे. आमदार विक्रम सावंत यांनी सतत पाठपुरावा केला. अधिवेशनातही मुद्दा उचलून धरला. काळ कसोटीचा आहे. सर्वांनी सोबत लढा देऊ.

प्रत्येक गावातील पदाधिकाऱ्यांनी विस्तारित म्हैसाळ योजना लवकर मार्गी लागावी, यासाठी ६५ गावांतून लढा उभारण्यासाठी सर्वांनी एकत्रित यावे, असा सर्वानुमते ठराव व निश्चय करण्यात आला. यावेळी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. माजी उपसभापती विष्णू चव्हाण यांनी आभार मानले.

# ६ हजार सेविकांना जि.प.ने बजावल्या नोटीसा : ६०४ मदतनीसच कामावर रुजू

**जळगाव :** विविध प्रलंबित मागण्यांसाठी राज्यभरातील अंगणवाडीसेविका, मदतनिस, मिनी अंगणवाडी सेविकांनी ३ डिसेंबरपासून संप पुकारला आहे. त्यात जळगाव जिल्ह्यातील ६ हजारहून अधिक सेविकांनी सहभाग घेतला आहे. जि.प.प्रशासनाने सर्व सेविकांना कामावर हजर राहण्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र, जि.प.च्या नोटीसला केराची टोपली दाखवत, अंगणवाडी सेविकांनी आपला संप सुरुच ठेवला आहे. तर बुधवारी शेकडो अंगणवाडी सेविका, मदतनिसांनी जि.प.समोर येऊन, जि.प.च्या नोटीसांची होळी केली होती. तर जि.प.च्या नोटीसनंतर



४४ अंगणवाडीसेविका, ६०४ मदतनीसच कामावर रुजू झाल्याची माहिती जि.प.कडून देण्यात आली आहे. तसेच आगामी काही दिवसात ही संख्या वाढेल असाही दावा जि.प.प्रशासनाकडून करण्यात येत आहे. ३ डिसेंबरपासून पुकारण्यात आलेल्या या संपामुळे जिल्ह्यातील ३ हजार अंगणवाड्या बंद आहेत. त्यामुळे शालेय पोषण आहाराच्या वाटपावर देखील मोठा परिणाम झाला आहे.


**५७४ अंगणवाड्या सुरु...**

जिल्ह्यात एकूण ३ हजार ४३५ अंगणवाड्यात आहेत. त्यापैकी सध्यस्थितीत ५७४ अंगणवाड्या सुरु आहेत. तर ३ हजार अंगणवाड्या बंदच आहेत. सुरु असलेल्या अंगणवाड्या देखील ग्रामपंचायत प्रशासनामुळे सुरु आहेत.

अंगणवाडीसेविकांच्या संपामुळे पोषण आहार वितरणासह अनेक कामं रखडली आहेत. त्यात कुपोषणाचा आढावा जो प्रत्येक महिन्याला घेतला जातो, तो आढावा घेण्याचेही काम दीड महिन्यांपासून थांबले आहे.

# सोलापूर जिल्ह्याला मिळाले नवे पर्यटनस्थळ

**सोलापूर :** जिल्ह्यासाठी वन उद्यानच्या रूपाने एक नवे पर्यटन स्थळ मिळाले आहे. पक्षी- प्राण्यांचे पुतळे, अँफी थिएटर आदी एकाच ठिकाणी साकारण्यात आले आहे. नांदनी येथील वन उद्यानाचे गुरुवार १८ जानेवारी रोजी उद्घाटन झाले.नांदणी हे गाव सोलापूर जिल्हयाच्या ठिकाणापासून २५ किलोमीटर अंतरावर असून सोलापूर- विजापूर महामार्ग क्रमांक ५२ लगत वसलेले आहे. कर्नाटक राज्याच्या सिमेपासून १० किलोमीटर अंतरावर आहे. तसेच विजापूर-कुडल संगम-सोलापूर या पर्यटन मार्गावर नांदणी वनउद्यान हा पर्यटकांचा महत्वाचा विसावा असल्याने या ठिकाणी वनक्षेत्रात गट क्रमांक ०३ मध्ये २.०० हे.



क्षेत्रावर नांदणी वनउदयान ची निर्मिती करण्यात आली आहे. उद्यानात आहेत या सुविधालहान मुलांसाठी बालोद्यान, ट्री लाईन, हवामानस्थानक, बंजी जंम्पिग, टेहळणी मनोरा तसेच हिरकणी कक्ष, वन्यप्राण्याविषयी माहिती देणाऱ्या बोलक्या भिंती, वन्यप्राण्यांचे पुतळे, ग्रीन टनेल, स्थानिक वृक्षलागवड, वाहतुक नियम संकेतचिन्ह, म्पिथिएटर, अशा बाबींचा समावेश आहे.

# अयोध्या येथून आलेल्या पवित्र अक्षतांचे म्हसवड येथे घरोघरी वाटप

**म्हसवड :** अयोध्या येथुन आलेल्या पवित्र अक्षतांचे म्हसवड शहरांतील प्रत्येक हिंदु महिलांनी व पुरुषांनी प्रत्येक हिंदु बांधवांच्या घरोघरी जाऊन वाटप केले आहे. आतापर्यंत जवळपास शहर व परिसरातील छोट्या मोठ्या गावातील २० ते २५ हजार नागरीकांना या अक्षतांचे वाटप करण्यात आले आहे. अजुनही अक्षता वाटपाचा कार्यक्रम सुरू आहे. २२ जानेवारी २०२४ रोजी अयोध्या येथे उभारण्यात आलेल्या राम मंदिरात मर्यादा पुरुषोत्तम प्रभु श्री रामचंद्रांच्या मुर्तीची प्रतिष्ठापना होणार आहे. यासाठी श्री रामांच्या चरणी अर्पण करण्यात येणाऱ्या अक्षतांचे २७ डिसेंबर रोजी ऐतिहासिक म्हसवड शहरात आगमन झाले होते. या पवित्र अक्षतांचे शहरांतील प्रत्येक हिंदु बांधवाला वाटप व्हावे यासाठी संपुर्ण हिंदु बांधवांच्या वतीने अतिशय चांगले नियोजन करण्यात आले असुन या अक्षता वाटप कार्यक्रमात शहरांतील १०० ते १५० महिलांनी सहभाग घेतला आहे. या महिलांनी शहरांतील प्रत्येक हिंदु बांधवांच्या घरापर्यंत जाऊन त्या घरातील महिलेला हळदी-कुंकु लावुन या अक्षता २२ जानेवारी रोजी आपल्या घरातील मुर्तीवर टाकण्याबरोबरच त्या दिवशी घरासमोर मोठी रांगोळी काढुन तसेच सायंकाळी आपल्या घरासमोर दिवे लावावे असे सांगितले आहे. शहरांतील व परिसरातील सर्व भागात अयोध्या येथुन आलेल्या या पवित्र अक्षतांचे वाटप करण्यात आले आहे.

**म्हसवड शहरात २२ रोजी होणारी दिवाळी साजरी**

**२२ जानेवारी रोजी प्रभु श्रीरामाच्या मुर्तीची प्राणप्रतिष्ठा अयोध्या येथील राम मंदिरात होत आहे, हा दिवस सर्व हिंदु समाजासाठी एक उत्सव असुन हा दिवस सर्वांसाठी आनंद देणारा ठरावा यासाठी यादिवशी म्हसवड शहरात दिवाळी सण साजरा केला जाणार आहे. या दिवशी घरोघरी दिवाळी सणाप्रमाणेच दिवे लावुन फटाके फोडुन घरोघरी गोड पदार्थ करावेत असे आवाहन रामभक्तांनी केले आहे.**

**शहरात ठिकठिकाणी होणार अन्नदान**

**२२ जानेवारी रोजी आपल्या रामलल्लाचे आगमन होत असल्याने या दिवशी म्हसवड शहरातील श्रीराम मंदिरात भव्य अशा धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, तर ठिकठिकाणी मोठ्या अन्नदानाचेही नियोजन करण्यात आले आहे.**

# गेल्या वर्षभरात संभाजीनगरमध्ये खुनाच्या प्रकारात घट

**छत्रपती संभाजीनगर :** कोणाचाही जीव हा लाखमोलाचा असतो. मात्र, रागाच्या भरात व्यक्ती आपले भान हरवतो, क्षणिक राग हा आयुष्य उद्ध्वस्त करतो. वर्ष २०२२ मध्ये ४३ तर वर्ष २०२३ मध्ये ३० खुनाच्या घटना घडल्या. यात कौटुंबिक वाद, किरकोळ, क्षुल्लक कारणेच बहुतांशी जीव घेण्याचे कारण ठरली आहेत. पोलिस आयुक्त मनोज लोहिया यांनी केलेल्या सोशल पोलिसिंगमुळे खुनाच्या प्रकारात घट झाल्याचे दिसून येत आहे.

मारेकरी शोधण्यात पोलिसांना जरी अडचणी येत असल्या तरी खून झालेला प्रकार मात्र उघडकीस येतोच. खून करताना किंवा एखाद्याचा जीव घेताना माणूस टोकाची भूमिका घेतो. काही खून हे थंड डोक्याने केलेले असतात तर काही खुनाला तत्कालिक कारण असते. नशा, अनैतिक संबध तसेच मालमत्तेचे वाद ही खुनाची प्रमुख कारणे पूर्वी होती. आता मात्र या कारणासोबतच कौटुंबिक वाद, किरकोळ वाद ही एखाद्याचा जीव घेण्याचे कारण ठरत आहे. गेल्या दोन वर्षांच्या पोलिसांच्या रेकॉर्डवरून ही बाब समोर आली आहे.

**पोलिसांची यंत्रणा ठरली परिणामकारक**

किरकोळ वाद आणि इतर कारणांनी ज्या खुनाच्या घटना घडल्या त्यामध्ये आरोपींनी वेगवेगळ्या प्रकारच्या नशेमध्ये हे प्रकार केल्याचेही तपासात समोर आले आहे. यामध्ये गांजा, दारू, बटण आदी नशेचा समावेश आहे. याकरिता वर्ष २०२३ मध्ये पोलिस आयुक्त मनोज लोहिया यांनी सोशल पोलिसिंगची संकल्पना राबवली. यामध्ये नशामुक्ती अभियान, तसेच मोहल्ला मीटिंगवर भर देण्यात आला. याचा परिणाम देखील पोलिसांना चांगलाच जाणवला. २०२३ मध्ये किरकोळ तसेच इतर कारणाच्या खुनात लक्षणीय घट झाली असल्याचे दिसून आले.

# अयोध्येतील राममंदिर सोहळ्याच्या पार्श्व'भूमीवर नाशकात स्वच्छता मोहिमेस प्रारंभ



**नाशिक :** अयोध्या येथे २२ जानेवारी रोजी होणाऱ्या राममंदिर सोहळ्याच्या पार्श्व'भूमीवर महानगरपालिकेच्या वतीने विशेष स्वच्छता अभियानाला प्रारंभ करण्यात आला. मनपाच्या कार्यक्षेत्रात विभागनिहाय विविध प्रभागांत सार्वजनिक ठिकाणे, रस्ते, रस्ते दुभाजक, नदीपात्र, नदीकिनारे, बाजारपेठा, व्यावसायिक ठिकाणे, सुलभ शौचालये, मनपा उद्याने, मोकळी भुखंडे, धार्मिक स्थळ परिसर, गोदाघाट, पूल इ.सर्व ठिकाणी वरील मोहीम राबविण्याचे नियोजन करण्यात आले आहे.त्यानुसार दि.१६ जानेवारी रोजी शहरातील प्रभाग क्रमांक १३ येथील जिल्हा परिषद ऑफिससमोरील परिसर व प्रभागात क्रमांक १४ येथील अमरधाम येथे विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. मोहिमेसनाशिकपश्चिम व नाशिक पूर्व विभागास नेमून दिलेले संनियंत्रण अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली विभागीय अधिकारी नाशिक पश्चिम व पूर्व, तसेच घनकचरा व्यवस्थापन विभाग व इतर सर्व विभागांचे कर्मचारी सहभागी झाले होते.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे दिलेल्या आदेशास अनुसरून मनपा आयुक्त डॉ. अशोक करंजकर यांच्या मान्यतेने ३१ जानेवारीपर्यंत स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे.

# शहरातील विकास कामाची पाहणी करण्याची कोरेगाव नगरपंचायतीची मागणी

**कोरेगाव :** पंढरपूर रस्त्यावरील महत्त्वाचे ठिकाण असलेल्या कोरेगाव नगरपंचायतीच्या काही नगरसेवकांनी आज सातारा जिल्हाधिकारी कार्यालयात येऊन कोरेगाव शहरात सध्या सुरू असलेल्या विकास कामाची स्वतः पाहणी करून त्यात काही चुकीचे आढळल्यास योग्य ती कारवाई करावी. अशा मागणीचे निवेदन सातारचे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांना दिले आहे.

याबाबत माहिती अशी की, कोरेगाव नगरपंचायतीच्या काही कामाबाबत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष रमेश उबाळे यांनी काही कामांबाबत शंका उपस्थित करून या कामाची चौकशी व्हावी. यासाठी कोरेगाव तहसील कार्यालयासमोर आंदोलन सुरू केलेले आहे. या आंदोलनामुळे काही व्यक्तींना कोरेगाव शहराची बदनामी होत असल्याचा साक्षात्कार झालेला आहे. आंदोलनाला वाढता पाठींबा मिळत असल्याने हे आंदोलन थांबवण्यासाठी विविध प्रयोग केले जात आहे पण लोकशाही मार्गाने आंदोलन थांबवण्यास आंदोलकांनी



नकार दिला आहे त्यामुळे आज सातारा जिल्हाधिकारी कार्यालयाकडे धाव घेण्यात आली.

लोकशाही मार्गाने प्रत्युत्तर देण्यासाठी आंदोलन करणे. हा मार्ग न निवडता आंदोलकाची व शासकीय पातळीवर कार्यरत असणाऱ्या त्यांच्या पत्नीचा उल्लेख करून निवेदन दिलेले आहे .मुळातच एका शासकीय महिला अधिकाऱ्यांच्या विरोधात त्यांचा कोणताही सहभाग नसताना त्यांचा उल्लेख करून कोरेगाव नगरपंचायतीने लेटर पॅड चा गैरवापर केलेला आहे. महिला वर्गाला पुढे न करता एका मागासवर्गीयाला पुढे करून जातीय सलोखा करण्याऐवजी दबाव तंत्र वापरले असल्याचा आरोप आता सर्वत्र होऊ लागलेला आहे.

मुळातच शासकीय पातळीवर अधिकाऱ्यांना ब्लॅकमेल करून कंट्रक्शन व्यवसाय जर कोणी करत असेल त्याबाबत शासकीय पातळीवरील सक्षम यंत्रणा कारवाईस करण्यासाठी कोणत्याही मुलाहिजा ठेवत नाही. परंतु काही ठराविक व्यक्तींना टार्गेट करून कोरेगाव नगरपंचायतीमधील सत्ताधारी प्रमुखांनी आमदार महेश शिंदे यांचे नाव घेऊन जावक क्रमांक विकास कामे / २०१/ २०२३-२४ दिनांक १८/०१/२०२४ गुरुवार नुसार निवेदन दिलेले आहे. या निवेदनावर पोहोच असून आमदार विकास कामे करत असून त्यांचे महत्त्व वाढवलेले आहे .त्यांच्या नावलौकिक होईल म्हणून त्यांची बदनामी केली जात आहे. असा शोध लावलेला आहे.

मुळातच लोकशाही मार्गाने आंदोलन करते रमेश उबाळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी जे प्रश्न उपस्थित केलेले आहेत. त्याबाबत कोणताही खुलासा न करता व्यक्तिगत पातळीवर बदनामी करून मानसिक खच्चीकरण करण्याचा प्रकार सुरू झालेले आहे. कोणत्याही मार्गाने केलेला भ्रष्टाचार हा भ्रष्टाचार असतो. परंतु संबंधित शासकीय यंत्रणेकडे दाद मागणी ऐवजी काही ठराविक व विशिष्ट हेतूने लोकांना एकत्र करून षडयंत्र सुरू केलेले आहे. याला कोरेगावातील करदाते नागरिक भिक घालणार नाही. मुळातच हे निवेदन देण्यासाठी काही नगरसेवक गैरहजर असतानाही त्यांचा निवेदनावर उल्लेख केलेला आढळून आलेला आहे .

दरम्यान,याबाबत सातारचे जिल्हाधिकारी यांनी स्वातंत्र्य यंत्रणेमार्फत चौकशी करून आंदोलकांनी केलेल्या मागणीची शहनिशा करून दोषीवर कारवाई करावी. यामध्ये दोषी आढळल्यास हरित कारवाई करावी. दोन्ही बाजू समजून घेऊन योग्य ते निकष काढून ही कारवाई झाली पाहिजे कोणाच्याही दबावाला बळी न पडता कारवाई झाल्यास खऱ्या अर्थाने जिल्हा प्रशासन व लोकशाही याबद्दल लोकांना आदर वाटेल. कोरेगावातील करदात्यांना नागरी सुविधा न देता त्यांना वेठीस धरणारी कोरेगाव नगरपंचायत बरखास्त करावी. अशी भविष्यात मागणी पुढे येऊ शकते . याबाबत कोरेगाव नगरपंचायतीच्या संबंधित निवेदन दात्यांकडे संपर्क साधला असता त्यांनी कोरेगाव नगरपंचायत विकास अडथळा आणून कोरेगाव शहराचे बदनामी करणाऱ्यांवर कारवाई करावी. असे निवेदन दिल्याचे सांगितले . कोरेगाव शहरांमध्ये सार्वजनिक व खाजगी बँका सुरक्षित असून दारूच्या दुकानाची दरोडा व चोऱ्यामाऱ्या होत आहे. त्याची कोरेगाव पोलीस ठाण्यात नोंद सुद्धा झालेली आहे. याकडे कोरेगाव नगरपंचायतीने लक्ष देऊन सुरक्षितता वाढवावी व कोरेगाव शहराची होणारी बदनामी थांबवावी. अशी मागणी नागरिकांनी केलेली आहे .

**राजकारणामध्ये दल बदलूपणा केल्यानंतर विचार बदलतात ज्यांच्या वरती आरोप केले जातात ते सोबत असले तिथे चांगले व ते विरोधात गेले की वाईट हे सर्वत्र घडत आहे त्याला कोरेगाव अपवाद नाही वास्तविक पाहता कोणत्याही विकास कामाला कुणीही अडथळा आणू नये कारण सध्या शासकीय निधीचा योग्य वापर झाला पाहिजे जर योग्य वापर झाला नाही तर पैशाची भांडण पैशाने मिटवण्याची प्रवृत्ती वाढेल. हे सुद्धा अधोरेखित झालेले आहे.**

# अभयसिंह जगताप यांचा विरोधकांना धसका

**म्हसवड :** माण - खटावचे युवा व डँशींग नेतृत्व, युवकांचे आयडॉल ठरलेल्या अभयसिंह जगताप यांच्या सामाजिक कामाचा संपूर्ण माढा लोकसभा मतदार संघात धुराळा उडत असुन या धुरळ्यात त्यांचे राजकिय विरोधकही हरवले असल्याचे चित्र आहे, तर त्यांच्या कार्याचा धसका घेतलेल्यांनीच त्यांचे कार्यक्रम आता पोलीसांच्या मदतीने हाणुन पाडण्याचा प्रयत्न सुरु असल्याच्या प्रतिक्रिया मोठ्या प्रमाणावर महिलावर्गातुन व युवा वर्गातुन उमटु लागल्या आहेत.

माण तालुक्यातील वरकुटे - मलवडी या छोट्याशा गावात जन्मलेल्या या युवकाने राजकारणात अपघाताने उडी घेत अल्पावधीतच अनेकांची अक्षरशा झोप उडवली आहे. राजकारणाच्या पहिल्याच टप्प्यात या युवकाने कोणताच राजकिय अनुभव नसताना केवळ युवकांच्या साथीने गावची ग्रामपंचायत एकहाती जिंकत राजकिय मात्तबरांना इशारा दिला आहे. राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा असलेल्या पवार साहेबांच्या खास मर्जीतील युवा कार्यकर्ता अशी ओळख असलेल्या या तरुणाने पवार यांच्या सांगण्यावरुनच माण - खटावमधील राजकारणात लक्ष घालण्यास सुरुवात केली आहे. पुढे राष्ट्रवादीचे दोन गट निर्माण झालेवरही या युवकाने पवार साहेबांची साथ सोडली नाही, त्याचेच फळ म्हणुन त्यांचेकडे माढा लोकसभेचे संभाव्य उमेदवार म्हणुन पाहीले जावु लागले आहे. मात्र उमेदवारी मिळे अथवा न मिळो माझ्यासाठी उमेदवारी महत्वाची नाही तर पवारसाहेबांचे आशीर्वाद महत्वाचे आहे असे म्हणत या युवकाने संपूर्ण माढा लोकसभा मतदार संघ पिंजुन काढण्यास सुरुवात केली असुन यानिमीत्ताने जगताप यांनी मतदार संघात शरद क्रिडा महोत्सवाचे



आयोजन करीत ठिकठिकाणी विविध क्रिडा स्पर्धांचे आयोजन केले आहे. त्यांच्या या क्रिडा महोत्सवामध्ये गावोगावातील हजारोंच्या संख्येने युवक सहभागी होत असल्याने अभयसिंह जगताप हे युवकांचे आयडॉल ठरले आहेत.

युवावर्गाची ताकत त्यांच्या पाठीशी वाढु लागल्याचे चित्र आता संपूर्ण माढा लोकसभा मतदार संघात दिसु लागली असल्यानेच त्यांच्या विरोधकांमध्ये धडकी भरली आहे, कालपर्यंत जगताप यांना एक बच्चा आहे असे संभोधनारे त्यांचे विरोधक आता त्यांच्या प्रत्येक हालचालींवर बारकाईने लक्ष देवु लागले आहेत, त्याचा प्रत्यय नुकत्याच करमाळा येथे अभयसिंह जगताप यांनी खास महिलांसाठी मकरसंक्रातीनिमीत्त आयोजीत केलेल्या होम मिनिस्टर च्या कार्यक्रमात सर्वांना आला या कार्यक्रमासाठी सुमारे ५ हजारांहुन अधिक महिलांनी सहभागी होत जगताप यांच्या पाठीशी आपण यापुढे राहणार असल्याचे दोन्ही हात उंचावुन सांगितले. युवा वर्गासोबतच महिला वर्गाचाही या युवकाला पाठींबा ठिकठिकाणी वाढतोय म्हटल्यावर सौरभैर झालेल्या जगताप यांच्या विरोधकांनी पोलीसांच्या मदतीने वेळेचे बंधन घालत हा कार्यक्रम १० वा. बंद पाडला त्यामुळे हजारो महिलांच्या उत्साहावर विरजन पडले, ही बाब लक्षात येताच त्याचक्षणी समयसुचकता दाखवत जगताप यांनी कोणत्याही माता - भगिणींनी नाराज होवु नये आज जरी हा कार्यक्रम बंद करावा लागला असला तरी आपण याच ठिकाणी उद्या हा कार्यक्रम पुर्ण करु असे जाहीर करताच हजारोंच्या संख्येने आलेल्या महिलांनी अभयसिंह जगताप तुम आगे बडो हम तुम्हारे साथ है च्या घोषणा देत संपूर्ण करमाळा शहर दणाणुन सोडले. तर आनंदीत झालेल्या महिलावर्गाने जगताप यांच्या पाठीशी आपण यापुढे राहणार असल्याचे जणु अभिवचनच दिले.

यानंतर त्याच रात्री त्यांनी करमाळा राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष संतोष वारे, जिल्हा उपाध्यक्ष अरुण काका जगताप, युवक शहर अध्यक्ष अमीर तांबोळी, युवक तालुका अध्यक्ष केशव चोपडे, समाधान शिंगटे, सचिन नलवडे, किसान सेल तालुका अध्यक्ष रवी घाडगे, तालुका उपाध्यक्ष इरशाद पठाण यांच्यासह जिल्हा परिषद सदस्या राणीताई वारे, जयमाला चौरे, महिला आघाडी शहर अध्यक्षा राजश्री कांबळे, तालुका अध्यक्षा नलिनी जाधव आदींशी चर्चा करून रविवारी पुन्हा एकदा हा कार्यक्रम घेण्याचे नियोजन केले.

रविवारी झालेल्या या कार्यक्रमाचे पहिले बक्षीस होंडा एक्टिवा केतुर नं.१(ता. करमाळा) येथील सुषमा महेंद्र कोकणे, दुसरे बक्षीस फ्रीज देवीचा माळ (ता.करमाळा) येथील शीतल श्रीकांत चव्हाण, तिसरे बक्षीस एलईडी टीव्ही चिकलठाण (ता.करमाळा) येथील माधवी गणेश बारकुंड तर आटा चक्कीचे चौथे बक्षीस करमाळा येथील कृष्णाजी नगरच्या तृप्ती रणजीत सुकळे यांनी पटकावले. अनपेक्षितपणे रविवारी सायंकाळी पाच वाजता पुन्हा घेतलेल्या या कार्यक्रमाला महीलावर्गाने शनिवार इतकीच उपस्थिती दर्शविली आणि रात्री दहा वाजेपर्यंत या कार्यक्रमाचा मनमुराद आनंद लुटला. याशिवाय सोमवारी असलेल्या संक्रांतीच्या सणाला लाडक्या अभयदादांकडून मिळालेली पैठणी आवर्जून परिधान करून खासदार म्हणून अभयसिंह जगताप यांनाच पसंती असल्याची जणू पोचपावतीच दिल्याचे दाखवून दिले.

नावातच सिंह असलेल्या अभयसिंह जगताप यांनी सध्या अशा प्रकारच्या कार्यक्रमांचा माढ्यात धडाका उडवुन दिला असुन त्यांच्यासोबत येथील युवावर्गही मोठ्या प्रमाणावर काम करीत असलेला दिसुन येत आहे.



## निमसोडमध्ये भैय्यासाहेब केसरी बैलगाडा धुरळा उडणार...

### शनिवार भव्य खुले बैलगाडी मैदान

**मायणी :** निमसोड तालुका खटाव येथील अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सदस्य, हरणाई उद्योग समुहाचे संस्थापक व खटाव- माणचे नेते रणजितसिंह देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त आणि खंडोबा देवाच्या यात्रेनिमित्त शनिवार २० रोजी भैय्यासाहेब केसरी बैलगाडा शर्यतीचा धुरळा उडणार असल्याची माहिती संयोजकांनी दिली.

शनिवार २० जानेवारी रोजी खंडोबा देवाच्या यात्रेनिमित्त आणि खटाव - माण राष्ट्रीय काँग्रेसचे नेते रणजितसिंह देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेल्या भैय्यासाहेब केसरी बैलगाडी शर्यतीमध्ये प्रथम क्रमांक १ लाख ११ हजार ७७७ रुपये (तात्यासो हरिबा चव्हाण व महेश तात्यासो चव्हाण), द्वितीय क्रमांक ७१ हजार ७७७ रुपये (विजयशेठ आप्पासो शितोळे व प्लँन डी फाईन डाईन फँमिली रेस्टॉरंट आणि बार, कांजूर रोड मुंबई), तृतीय क्रमांक ५१ हजार ७७७ रूपये (धनाजीराव बु. देशमुख (सचिव) व अमर जगन्नाथ देशमुख, चतुर्थ क्रमांक ३१ हजार ७७७ रूपये (अँड. सुभाषराव मुगुटराव देशमुख व कुशिखराव शंकर शितोळे), पंचम क्रमांक २१ हजार ७७७ (बाबासो मधुकर कुंभार, पिंटू), सहावा क्रमांक ११ हजार ७७७ (प्रशांत सयाजीराव देशमुख) सातवा क्रमांक ७ हजार ७७७ (अशोकराव शिदोबा घाडगे), आठवा क्रमांक ५ हजार ७७७ (ज. हुमायुन अब्बास तांबोळी) सदर शर्यतीसाठी ट्राफी सौजन्य प्रतापशेठ नारायण घार्गे - देशमुख, संजय शिवाजी घार्गे - देशमुख, मेडल्स सौजन्य अमित बाळासाहेब देशमुख, रोहित बापुराव माने. मैदानावरील मंडप आणि स्पीकर सौजन्य ग्रामपंचायत सदस्य दिंगबर सयाजीराव देशमुख यांचे तर स्पर्धेत सहभागी होणार्या सर्व गाडी मालकांना मेडल्स देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. शासनाच्या नियमानुसार बैलगाडी शर्यत होतील.तर मैदान सकाळी सात वाजता सुरू होईल तर गाड्यांची नोंदणी ११ वाजेपर्यंत राहील.

सदर मैदानात शर्यतीचे समालोचक सुनील मोरे (पेडगावकर) व विकास जगदाळे करणार आहेत तर शर्यतीसाठी झेंडा पंच म्हणून धनावडे बापू (कोरेगाव) हे असतील.या दरम्यान शनिवार दि.२० रोजी रात्री ठिक ९ वाजता वैभव र्केस्ट्रा हा कार्यक्रम निमसोड येथील मराठी शाळेच्या भव्य पटांगणांवर होईल. सदर भैय्यासाहेब केसरी बैलगाडी शर्यत आणि मनोरंजनाच्या कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन समस्त बैलगाडा शर्यत प्रेमी व सर्व ग्रामस्थ निमसोडकर यांनी केले आहे.

## निरा देवघर उजव्या मुख्य कालव्याच्या बंदिस्त नलिका कालव्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते भूमिपूजन

**सातारा :** निरा देवघर प्रकल्प ता. भोर जि. पुणे अंतर्गत निरा देवघर उजवा मुख्य कालवा किमी ६६ ते ८७ मधील बंदिस्त नलिका कालवा आणि निरा देवघर प्रकल्पामधून ०.९३ टी.एम.सी. पाणी धोम बलकवडी प्रकल्पामध्ये टाकण्याच्या कामाचा शुभारंभ व भूमिपूजन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते झाले.

काळज ता. फलटण येथे झालेल्या कार्यक्रमास खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर, आमदार सर्वश्री रामराजे नाईक निंबाळकर, रणजितसिंह मोहिते पाटील, श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले, जयकुमार गोरे, दीपक चव्हाण, शहाजीबापू पाटील,जलसंपदा विभागाचे अप्पर मुख्य सचिव दीपक कपूर आदी उपस्थित होते.

निरा देवघर धरण हे नीरा नदीवर असून याची पाणी साठवण क्षमता ११.९१ टि.एम.सी. इतकी आहे. निरा देवघर उजवा कालव्याच्या एकूण १५८ किमी लांबी पैकी ६५ किमी पर्यंतचे कालव्याचे काम पारंपरिक पद्धतीने पूर्ण झाले आहे. उर्वरित काम बंदिस्त नलिका प्रणालीद्वारे किमी ६६ ते ८७ व शाखा कालव्याच्या निविदेची कार्यवाही पूर्ण झालेली आहे.

प्रकल्पावर माहे डिसेंबर २०२३ अखेर ९१७.८१ कोटी खर्च झालेला आहे. सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पामध्ये १०० कोटी निधीची तरतूद करण्यात आली आहे.

या कामाच्या शुभारंभ व भूमिपूजन कार्यक्रमाप्रसंगी कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक अतुल कपोले, मुख्य अभियंता ह.वि. गुणाले, पुणे पाटबंधारे प्र

## शेंदूर लावण्यासाठी 'दगड' निवडायचा कोणता?

### भाजपपुढे माढाच्या उमेदवारीचा तिढा..!

**सातारा :** नरेंद्र मोदी यांना पुन्हा एकदा पंतप्रधान करण्यासाठी भारतीय जनता पार्टीने रणनीती आखली असून त्यानुसार देशभरात व्ह्यूवरचना सुरु करण्यात आली आहे. महाराष्ट्रातही जास्तीत जास्त खासदार निवडून आणण्याचा पार्टीचा 'अजेंडा' ठरलेला आहे पण, माशी शिंकली आहे ती माढा मतदारसंघात! 'जागा एक अन उमेदवार अनेक' अशी परिस्थी असेलल्या माढा मध्ये उमेदवार निवडीचा तिढा निर्माण झाला आहे. पक्ष जो उमेदवार देईल त्याला 'गणपती' म्हणायला सगळेच तयार असले तरी, जनमताचा 'शेंदूर' लावण्यासाठी 'दगड' निवडायचा कोणता? हा यक्षप्रश्न निर्माण झाला आहे.

फलटण येथे माढ्याचे विद्यमान खासदार रणजितसिंह नाईक- निंबाळकर यांच्यावतीने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत 'वचनपूर्ती' मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या व्यासपीठावर विद्यमान खासदारांसह माढ्यासाठी इच्छुक असणारे काही 'खासदार'ही आवर्जून उपस्थित होते. लोकसभेची निवडणूक जाहीर व्हायच्या आधीच माढाचे 'रणांगण' तापायला लागले आहे. गेल्या पाच वर्षात केलेल्या विकासकामांच्या जोरावर पुन्हा एकदा फलटणच्या रणजित निंबाळकरांनाच लोकसभेची उमेदवारी मिळेल अशी अटकळ बांधली जात असतानाच खुद्द रणजित निंबाळकरांनीच कोणताही 'दगड' द्या त्याला शेंदूर फासू, म्हणजेच कोणताही उमेदवार द्या त्याला निवडून आणू, असे वचनपूर्ती मेळाव्यात जाहीर करून टाकले. त्यामुळे उमेदवारीवरून सुरु असलेली पक्षांतर्गत धुसफूस पुन्हा एकदा समोर आली आहे.

सातारा जिल्ह्यातील फलटण, माण आणि खटाव तर, सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस, करमाळा, सांगोला, माढा अशा सहा विधानसभा मतदारसंघाचा माढा हा एक लोकसभा मतदारसंघ! गत लोकसभा निवडणुकीवेळीच खासदार माढा मतदारसंघातील म्हणजेच सोलापूर जिल्ह्यातील असावा, असा आग्रह धरला गेला होता पण, ना. देवेंद्र फडणवीस यांच्या आग्रही भूमिकेमुळे लोकसभेची उमेदवारी फलटणच्या रणजित निंबाळकरांना मिळाली. भाजपच्या सर्वच पदाधिकाऱ्यांनी आपसातील मतभेद विसरून पक्षाचे काम केल्याने ते निवडूनही आले मात्र, सध्याची परिस्थिती बिकट मानली जात आहे ती फक्त अंतर्गत कलहामुळे! तसं पाहिलं तर, माढा मतदारसंघावर मोहिते-पाटील घराण्याचे वर्चस्व मानले जाते. राष्ट्रवादीला रामराम करून भाजपमध्ये दाखल झालेले माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांनाच गत निवडणुकीवेळी दावेदार मानले जात होते. माण-खटावचे आमदार जयकुमार गोरे यांच्या स्नेहामुळे ना. फडणवीस यांच्या सहकार्याने भाजपकडून रणजितसिंह निंबाळकर यांना उमेदवारी मिळाली. त्याचवेळी अंतर्गत मतभेद चव्हाट्यावर आले होते.

या पाच वर्षात पुलाखालून बरेच 'पाणी' गेले आहे. रणजितसिंह नाईक- निंबाळकर यांनी मोहिते-पाटील यांचे विरोधक जवळ केल्याने मोहिते- पाटील गटामध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आणि त्याचाच परिपाक म्हणजे मोहिते-पाटील गटाकडून माढ्यात भावी खासदार म्हणून जाहीरपणे 'बॅनर' झळकले! अंतर्गत गटबाजीमुळे उमेदवारी कोणाला द्यायची हा प्रश्न भाजप पक्षश्रेष्टींपुढे उभा राहिला आहे. रणजितसिंह का धैर्यशील मोहिते- पाटील असा संघर्षही उमेदवारीसाठी पाहायला मिळण्याची शक्यता आगामी काळात आहे. असे असले तरी, विद्यमान खासदार रणजितसिंह यांनी ना. फडणवीस यांना जाहीर कार्यक्रमात 'तुम्ही सांगाल त्या 'दगडाला' शेंदूर फासण्यास तयार असल्याचे' जाहीर करून टाकले! मी आणि माझी जनता यासाठी तयार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यामुळे भाजपपुढे नवीन पेच निर्माण झाला आहे. आता लोकसभेसाठी उमेदवार निवडायचा आहे का 'दगड', याचीही जोरदार चर्चा रंगू लागली आहे. काहीही असले तरी, भाजपला लवकरच हा 'दगड' शोधून त्याची उमेदवारी जाहीर करावी लागणार आहे हे नक्की!.

## दुष्काळी स्थितीच्या उपाययोजनांचा जिल्हाधिकारी डुडी यांनी घेतला आढावा

सातारा : चालू वर्षी अत्यल्प पर्जन्यमान झाले असल्याने दि.११ नोव्हे. २०२३ च्या शासन निर्णयानुसार, ७५ टक्केपेक्षा कमी पर्जन्यमान झालेले असे सातारा जिल्हयामध्ये ६५ मंडलांचा समावेश आहे. याशिवाय नवीन १२ मंडलांचा प्रस्ताव केलेला आहे. या मंडलांमध्ये दुष्काळ घोषित झाल्यानंतर त्या अनुषंगाने सवलती, कर्जवसूली स्थगिती, शालेय विद्यार्थ्यांची परिक्षा फी माफी, रोजगार कामांमध्ये काही प्रमाणात शिथिलता, पिण्याच्या पाण्याचे टँकर्स पुरविणे इत्यादी सवलती देण्याचे नियोजन आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डुडी यांनी केले.

जिल्हाधिकारी डुडी यांच्या अध्यक्षतेखाली, सातारा जिल्हयातील दुष्काळी परिस्थितीच्या अनुषंगाने करण्यात येत असलेल्या उपाययोजनांबाबत आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ज्ञानेश्वर खिलारी, निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी भाग्यश्री फरांदे, जिल्हा पुरवठा अधिकारी वैशाली राजमाने, उपजिल्हाधिकारी (रो.ह.यो.) विजया यादव, तसेच विविध विभागांचे अधिकारी, नगरप्रशासन अधिकारी, सर्व उपविभागीय अधिकारी, सर्व तहसिलदार, सर्व गटविकास अधिकारी, सर्व तालुका कृषि अधिकारी, सर्व वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण इत्यादी अधिकारी उपस्थित होते.

चाराटंचाई / चारालागवड विषयाबाबत बोलतानाही डुडी म्हणाले, जिल्हयामध्ये ओल्या चा-याची आणि सुक्या चा-याची आवश्यकता आहे. चारा पिकाचे नियोजन केलेले आहे. मक्याचे आणि ज्वारीचे पेरणीसाठी क्षेत्र निश्चिती केलेली असून ही चारा लागवड २ टप्प्यात करण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात ६ हजार हेक्टर क्षेत्रामध्ये आणि दुस-या टप्प्यातही ६ हजार हेक्टर क्षेत्रामध्ये चारा लागवड करणेत येणार असून त्याद्वारे ३ लाख मेट्रिक टन चारा उपलब्ध होईल. मक्याचे पेरणीसाठी क्षेत्र निश्चित केलेले असून बियाणांसाठी जिल्हा नियोजन समितीमधून निधी उपलब्ध करुन देण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले.

पाणीटंचाई बाबत तहसिलदार, गटविकास अधिकारी, वरिष्ठ भूवैज्ञानिक, पाटबंधारे विभाग महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पाणीपुरवठा विभाग, जलसंधारण विभाग यांनी संबंधित क्षेत्रांच्या आमदारांसह तालुका स्तरावर संयुक्त आढावा बैठका घ्यावात. सन २०१३-१४ ची दुष्काळी गावे आणि नवीन गावे यांच्या जलजीवन मिशन बाबत आढावा घ्यावा. पाणीटंचाई क्षेत्र घोषीत करणे, पाण्याचे स्त्रोत घोषीत करणे अत्यंत आवश्यक असल्याचेही ते म्हणाले.

जलयुक्त शिवार अभियान - या अभियानांतर्गत सखोल आढावा होणे, आराखडयाप्रमाणे आढावा होणे आवश्यक आहे. किती कामांची प्रशासकीय मान्यता झालेली आहे हे जिल्हा परिषद आणि कृषि विभाग यांनी पाहावे, असेही निर्देश त्यांनी यावेळी दिले.

## वडगावमध्ये श्रीराम प्रतिष्ठापना सोहळ्यानिमित्त पाच हजार दिवे लावून दीपोत्सव

**वडगाव मावळ :** अयोध्या येथील श्रीराम मंदिर लोकार्पण व प्रभू श्रीराम मूर्ती प्रतिष्ठापना सोह)ळ्यानिमित्त येथील श्री पोटोबा देवस्थान संस्थान व ग्रामस्थांच्यावतीने सोमवारी (ता. २२ ) विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच श्री पोटोबा मंदिराच्या प्रांगणात पाच हजार दिवे लावून दीपोत्सव साजरा केला जाणार आहे.

पहाटे सहा वाजता हनुमान मंदिर व श्रीराम मंदिरात अभिषेक, सकाळी ९ ते ११ काकड आरती व भजन, सकाळी ११ वाजता मंदिराच्या प्रांगणात अयोध्या येथे होणाऱ्या कार्यक्रमाचे एलईडी स्क्रीनवर थेट प्रक्षेपण, दुपारी १२.३० वाजता प्रसाद वाटप, सायंकाळी ४ वाजता पंचमुखी मारुती मंदिर येथून भव्य मिरवणूक त्यानंतर अयोध्या येथे गेलेल्या कारसेवकांचा सत्कार व भव्य दीपोत्सव साजरा होईल. ७ वाजता श्री पोटोबा महाराज मंदिरात महाआरती व नंतर महाप्रसादाने या कार्यक्रमाची सांगता होणार आहे.

सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या आनंदी सोहळ्याचे साक्षीदार व्हावे. तसेच आपल्या घरासमोर पणती दिवे, रांगोळी, आकाश कंदील लावून व घरावर भगवा ध्वज उभारावा. गोड नैवेद्य तयार करून दिवाळी सारखा उत्सव साजरा करावा असे आवाहन श्री पोटोबा महाराज देवस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

## कमी दरात सोने देतो सांगत केली दहा लाखांची फसवणूक

**खंडाळा :** कमी दरात सोने देतो असे म्हणत दहा लाख रुपये घेऊन पलायन केल्याची घटना खंडाळा - असवली रस्त्यावरील खिंडीमध्ये घडली.

याबाबत खंडाळा पोलिसांकडून व घटनास्थळावरून मिळालेली अधिक माहिती अशी की, राहुल मारुती पाटील (रा.सातारा) यांचे पाचवड या ठिकाणी सोन्या-चांदीचे दागिने वितळवण्याचा आटणी व्यवसाय आहे. यावेळी राहुल यांना त्यांच्या एका मित्रामार्फत आलेले रमेश दिनकर दुदुस्कर (रा.सोनगाव ता.जावळी जि.सातारा) यांनी त्यांचे मेहुणे (नाव माहित नाही) यांना गरज असल्याने त्यांच्या जवळील सोने कमी किमतीत विकायचे आहे असे सांगत दहा लाख रुपये घेऊन पारगाव-खंडाळा या ठिकाणी बोलावले. यावेळी संबंधित दुदुस्कर व त्याच्यासोबत असलेल्या व्यक्तीने त्याचा मेहुना खंडाळ्यातून असवली रस्त्यावर थांबला आहे असं सांगत पाटील यांना खंडाळा असवली रस्त्यावरील असलेल्या खिंडीत निर्जनस्थळी नेत त्यांच्याजवळ असलेली रोख रक्कम दहा लाख रुपये असलेली बॅग हिसकावून घेत डोंगराच्या दिशेला पलायन केले.

याबाबत राहुल मारुती पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीवरून रमेश दिनकर दुदुस्कर व एक अनोळखी अशा दोघांवर खंडाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस अंमलदार दत्ताजी दिघे करत आहेत.

## निविदा भरण्याची मुदत संपण्यापूर्वीच कामाला सुरवात

### लोणंद नगरपंचायतचा अजब कारनामा

लोणंद : लोणंद नगरपंचायत मध्ये भ्रष्टाचाराचा कळस चालू आहे. लोणंदच्या सुजाण नागरिकांनी लोणंद नगर पंचायतच्या कारभारावर जाणीवपूर्वक लक्ष ठेवणे लोणंदच्या उज्वल भविष्यासाठी अत्यंत गरजेचे आहे. असे आवाहन लोणंद विकास मंच चे अध्यक्ष राजेंद्र डोईफोडे, नगरसेवक प्रवीण व्हावळ, निलेश शेळके पाटील, खंडाळा तालुका माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष म्हस्कु आण्णा शेळके पाटील, शकील भाई इनामदार, विशाल जाधव, नितीन धायगुडे पाटील यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

या प्रसिद्दी पत्रकात म्हटले आहे की लोणंद नगरपंचायत ने दिनांक १२ जानेवारी २०२४ रोजी गणपती मंदिरासमोरील मोकळ्या जागेत तारेचे कुंपण करण्यासाठीची १,६९,१०१/- रुपयाची जाहीर निविदा सुचना काढली होती. या सूचनेमध्ये सदर निविदा ही दिनांक १६ जानेवारी २०२४ रोजी दुपारी तीन वाजेपर्यंत भरावयाची मुदत दिली गेलेली आहे. परंतु सदर तारेच्या कुंपणाच्या कामाला दिनांक १४ जानेवारी २०२४ रोजी खड्डे काढणे व दिनांक १५ जानेवारी २०२४ रोजी लोखंडी खांब काँक्रीट ओतून उभे करणे, इत्यादी कामे निविदेची पूर्ण मुदत संपण्याआधी पूर्ण केलेली आहेत. याशिवाय या जागेमध्ये सॅन्ड क्रश व खडी दिसून येत आहे. या संदर्भामध्ये निविदेची मुदत संपण्याआधीच एका विशिष्ट कंत्राटदारास काम दिल्याचे निष्पन्न होत आहे. यामध्ये काही आर्थिक हेराफेरी झालेली आहे काय? याचा खुलासा संबंधित सन्माननीय लोकप्रतिनिधी व माननीय नगरपंचायत प्रशासन यांनी करावा. सदरची जागा जर सरकारची असल्यास माननीय प्रशासनाने सरकारी जागेमध्ये निविदा प्रक्रिया पूर्ण होण्याआधी कुंपण घालण्यास परवानगी कशी काय दिली? या गैर कायदेशीर कृत्यांमध्ये प्रशासनातील कोण कोण अधिकारी सामील आहेत याचा खुलासा लोणंदच्या जनतेसमोर करण्यात यावा. निविदा प्रक्रिया कायदेशीररित्या पूर्ण होण्याआधी सदर कुंपण करण्याची घाई का करण्यात आली? याचा खुलासा देखील संबंधित सन्माननीय लोकप्रतिनिधी व माननीय नगरपंचायत प्रशासन यांनी करावा. अंदाजे ३ गुंठे जागेमध्ये कुंपण करण्यासाठी १ लाख ६९ हजार रुपयांचा खर्च नगरपंचायत फंडातून केला जातोय, हे अनाकलनीय आहे.

# कराडला कृष्णा कृषी आंतरराष्ट्रीय महोत्सवाचे दिमाखात उद्‌घाटन

## कृषी आणि उद्योग हे हातात हात घालून चालू शकतात हे कृष्णा परिवाराने दाखवून दिले : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**कराड :** स्व. आप्पासाहेबांनी घालून दिलेला आदर्श जोपासण्याचे काम आप्पासाहेबांची तिसरी पिढी करत आहे. स्वर्गीय आप्पासाहेब यांच्या पश्चात डॉ. सुरेशबाबा यांनी त्यांच्या कार्याला एक आयाम दिला आणि त्याही पुढे जाऊन डॉ. अतुलबाबा भोसले हे आणखी एक नवा आयाम देत आहेत, हे या कृषी महोत्सवाच्या निमित्ताने दिसून येत आहे. शेतकऱ्यांनी नुसतं पिकवून चालणार नाही तर पिकवलेलं विकलं पाहिजे हे सूत्र लक्षात घेऊन कृषी आणि उद्योग हे हातात हात घालून चालू शकतात, हे कृष्णा परिवाराने यानिमित्ताने दाखवून दिले आहे. हेच या परिवाराचे वैशिष्ट्य आहे, असे गौरवोद्गार राज्याचे उपमुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांनी येथे व्यक्त केले. डॉ. अतुल भोसले हे राजकारणा पलीकडे जाऊन संवेदनशीलता जपणारे नेतृत्व आहे, असेही ना. फडणवीस यांनी सांगितले.

कराड येथील छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियमवर आंतरराष्ट्रीय कृष्णा कृषी व औद्योगिक महोत्सवाचे उद्घाटन महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते बुधवारी दिमाखात झाले. याप्रसंगी ते बोलत होते. राज्यसभेचे खा. श्री. उदयनराजे भोसले, आ. श्री. शिवेंद्रसिंहराजे भोसले, आ. जयकुमार गोरे, आ. नरेंद्र पाटील, ज्येष्ठ नेते मदनराव मोहिते , भाजपचे जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम, य. मो. कृष्णा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन डॉ. सुरेश भोसले व भाजपाचे सातारा लोकसभा प्रभारी डॉ. अतुलबाबा भोसले , विनायक भोसले, भाजपा किसान मोर्चाचे सरचिटणीस रामकृष्ण वेताळ, माजी आ. आनंदराव पाटील, विक्रम पावसकर, मनोज घोरपडे, चित्रलेखा माने, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ज्ञानेश्वर खिलारे आदी मान्यवर उपस्थित होते.

ही तर आयपीएलची टीम...

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी बोलताना उदयनराजे यांनी रणजीची टीम' असा केलेला उल्लेख अधोरेखित करत, ही रणजीची नव्हे आयपीएलचे टीम आहे आणि याचे मालक तुम्हीच आहात. तेंव्हा कोणाला आत ठेवायचे, कोणाला बाहेर ठेवायचे हे आता तुम्हीच ठरवायचे. फक्त आम्हाला बाहेर ठेवू नका म्हणजे झालं, असं म्हणत फडणवीस यांनी शाब्दिक कोटी केली. डॉ. अतुल भोसले यांनी केलेल्या छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियमच्या अद्यावतीकरणाच्या मागणीची दखल घेत व उदयन महाराज यांचीही तशी आज्ञा आली असल्याने आम्हाला तर ऐकावेच लागेल असे म्हणत, लवकरच या स्टेडियमचा पूर्ण आराखडा तयार करून आधुनिक पद्धतीचे दर्जेदार स्टेडियम कराडकरांना उपलब्ध करून देऊ, असे आश्वासन ना. फडणवीस यांनी यावेळी दिले.

ना. फडणवीस म्हणाले, डॉ. सुरेशबाबा यांनी सेंद्रिय शेतीचा महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला आहे. खरंतर या देशाचा पहिला वैज्ञानिक शेतकरीच होता. त्याने काळ्या मातीतून सोनं पिकवलं, शास्त्रशुद्ध पद्धतीने शेती केली, त्यामुळे पूर्वी शेतकरी समृद्ध होता, पण गेल्या काही शतकात आपण रासायनिक शेतीकडे वळलो. त्यामुळे सुरूवातीला उत्पादकता वाढलीही पण नंतर त्याचे दुष्परिणाम समोर येऊ लागले. नैसर्गिक असतं तेच टिकाऊ असतं. इंजेक्शन देऊन झालेला पैलवान फार काळ टिकत नाही, तो लाल मातीतच तयार व्हावा लागतो तसंच हे आहे. त्यामुळे त्यामुळे आपल्याला नव्याने शेतीतले प्रयोग उत्पादकता शेतीतले विज्ञान समजून घ्यावे लागेल आज शेतीमधील समृद्ध राज्य म्हणून पंजाब कडे बघितलं जातं मात्र तेथेही क्षारपड जमिनीची समस्या मोठ्या प्रमाणात निर्माण झाली आहे. इस्त्राईल सारख्या देशात तंत्रज्ञानाचा उपयोग करून आवश्यक तेवढेच पाणी पिकांना दिलं जातं. त्यामुळे पाणी नसलेला देशही शेतीमध्ये समृद्ध बनला आहे हे आपण लक्षात घेतलं पाहिजे. ऊस शेतीच्या क्षेत्रातील नवीन वाण कसे तयार होतील, जास्तीत जास्त अंतर पिके कशी घेता येतील, कमी खर्चात जास्त उत्पादन देणारी शेती कशी करता येईल याकडे आता लक्ष देणे आवश्यक आहे. तसेच नुसते उत्पादन वाढवून चालणार नाही त्याचे मार्केटिंग ही आपल्याला करावी लागेल. कृष्णा परिवाराने कराडमध्ये आयोजित केलेला कृषी महोत्सव हा त्यामुळेच महत्त्वाचा आहे.

मला सांगण्यात आलं की या प्रदर्शनात ४२ लाख रुपये किंमतीचा बैल आला आहे. इलेक्ट्रिक बैलही आहे, छोटी गाय ही आहे, तर दुसरीकडे आमच्या मुंबईमध्ये असे काही रेडे मोकाट सुटले आहेत ते टीव्हीवर इतके बोलत असतात की त्यांचा बंदोबस्त करण्याचे काही तंत्र असेल तर आम्हाला शिकवा, असे सांगत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी संजय राऊत व उद्धव ठाकरे यांचे नाव न घेता त्यांच्यावर निशाणा साधला.

खासदार उदयनराजे भोसले म्हणाले, डॉ. अतुल भोसले यांनी केलेली मागणी अतिशय योग्य आहे. कराडच्या छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियमचे आधुनिकीकरण झाले पाहिजे, येथे रणजीची मॅच झाली पाहिजे आणि त्या टीमचे कॅप्टनपद डॉ. अतुलबाबा यांनी घ्यावे. त्यांनी कोणाला आत घ्यायचं , कोणाला बाहेर ठेवायचं हे ठरवावं, फक्त आम्हाला बाहेर ठेवू नये एवढंच.

सातारा जिल्ह्यातील दुष्काळी भागात जलसिंचनांच्या योजनांसाठी स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांनी व त्यांच्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी तसेच स्वतः आपणही प्रयत्न केले त्यामुळे आज हा भाग हिरवागार झाल्याचे अनेक ठिकाणी पाहायला मिळत आहे. सातारा जिल्ह्यात पूर्वी दगडाला शेंदूर फसला तरी तो निवडून येईल असे म्हटले जात होते त्यामध्ये अहंकार दिसून येत होता, पूर्वी हा कोणाचातरी बालेकिल्ला समजला जात होता पण आता ती परिस्थिती राहिलेली नाही , असे खासदार उदयनराजे यांनी परखडपणे सांगितले.

### कृष्णा-कोयनेवरचे अर्धवट प्रकल्प पूर्ण केले

**आपल्या मागच्या सरकारच्या काळात ही आणि आत्ताच्या सरकारच्या काळात ही जलसिंचनाच्या योजनांना आपण मोठा निधी दिला असून कृष्णा आणि कोयनेचे अर्धवट राहिलेले जेवढे जेवढे प्रकल्प होते ते सर्व प्रकल्प आता पूर्ण केले आहेत. आमदार जयकुमार गोरे नेहमी जिहे-कटापूर योजनेवर बोलायचे, हा प्रकल्पही पूर्ण केला असून आता बंदिस्त पाईपलाईनद्वारे पाणी देण्याच्या योजना सरकारने अंमलात आणल्या आहेत. त्यामुळे पाण्याची बचत होत आहे. सरकार आता शेतीचे इलेक्ट्रिक फिडर सौरवर आणत आहे. या वर्षाअखेरपर्यंत ४ हजार फीडर सौरवर आणले जातील. त्यामध्ये शेतकऱ्यांच्या ५० टक्के पैशांची बचत होणार आहे. दुसऱ्या टप्प्यात उपसा जलसिंचन योजनाही सोलरवर घेतल्या जातील. पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारने साखर उद्योगाबाबत जेवढे काही निर्णय घेतले आहेत ते निर्णय सुवर्ण अक्षरांनी लिहून ठेवावेत असेच आहेत. डॉ. सुरेशबाबांनी हे त्यांच्या भाषणात सांगितले आहेच मग ते एमएसपी असो की इथेनॉल असो, किंवा इन्कम टॅक्स रद्द करण्याचा निर्णय असो हे शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन करणारे निर्णय आहेत. त्यामुळे केंद्रातील आणि राज्यातील सरकार हे खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांच्या पाठीशी ठाम असणारे सरकार आहे, असे नाव. फडणवीस यांनी सांगितले.**

### राज्यसरकारच्या योजनांचा शेतकऱ्यांना मोठा लाभ

**राज्य सरकारने एक रुपयात पिक विमा सुरू केला त्याचा लाभ खरीप हंगामात जिल्ह्यातल्या २ लाख ४५ हजार शेतकऱ्यांना आणि रब्बी हंगामात ४५ हजार शेतकऱ्यांना झाला आहे. त्याला मोठा प्रतिसाद मिळत आहे. विम्याचे उर्वरीत अग्रीम ही आपण लवकरच देणार आहोत. नमो शेतकरी , मागेल त्याला शेततळे, मागेल त्याला पेरणी यंत्र मागेल त्याला ड्रीप अशा योजना सरकारने आणल्या असून त्यासाठी वेबसाईटवर नोंदणी करावी लागते. त्यानुसार थेट लाभ दिला जातो. शेतकऱ्यांना आता त्यासाठी रांगेत उभा राहावे लागत नाही. आत्तापर्यंत आलेल्या अशा अर्जांची निर्गती करण्यात आली आहे. उर्वरित अर्ज येत्या आर्थिक वर्षापूर्वी निकालात काढले जातील.**

# औषधी वनस्पतींचे राज्यातील पहिलेच प्रदर्शन कोल्हापुरात

**कोल्हापूर :** जंगलात वाढणाऱ्या विविध रानकंदमुळांची ओळख, त्यांचा आहारातील वापर याची माहिती व्हावी आणि शेतकऱ्यांनी त्यांची लागवड त्यांच्या शेतात ... औषधी वनस्पतींचे राज्यातील पहिलेच प्रदर्शन कोल्हापुरात, कंदमुळेही पाहता येणारकोल्हापूर: जंगलात वाढणाऱ्या विविध रानकंदमुळांची ओळख, त्यांचा आहारातील वापर याची माहिती व्हावी आणि शेतकऱ्यांनी त्यांची लागवड त्यांच्या शेतात करावी या हेतूने उद्या, शनिवार, दि. २० आणि रविवार, दि. २१ जानेवारी रोजी ७० हून अधिक कंदमुळांचे राज्यातील दुसरे तसेच १६० हून अधिक औषधी वनस्पतींचे राज्यातील पहिलेच प्रदर्शन कोल्हापुरात दसरा चौकातील शहाजी कॉलेज येथे भरवण्यात आले आहे.



ही माहिती एनजीओ कॅम्पेशन २४,कोल्हापूरवुई केअरचे अध्यक्ष मिलिंद धोंड यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत दिली. निसर्ग अंकुर संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. मधुकर बाचुळकर आणि उपाध्यक्ष प्राचार्य डॉ. अशोक वाली यांनी विविध कंद आणि औषधी वनस्पतींची माहिती दिली.

निसर्गअंकुर संस्थेच्या मार्गदर्शनाखाली कोल्हापूर वुई केअर आणि एनजीओ कॅम्पेशन २४ ह्या संस्थेने, शाहू छत्रपती शिक्षण संस्था, गार्डन क्लब कोल्हापूर, यूथ ॲनेक्स, इनर व्हील क्लब ऑफ कोल्हापूर मिलेनिअल्स, रोटरॅक्ट- कोल्हापूर झोन ह्या संस्थांच्या सहकार्याने भरणाऱ्या या प्रदर्शनाचे उद्घाटन शनिवारी सकाळी ११ वाजता शहाजी कॉलेज येथे खासदार धनंजय महाडिक, शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी पोलिस अधीक्षक महेंद्र पंडित, अतिरिक्त जिल्हाधिकारी संजय शिंदे, गडहिंग्लजचे प्रांताधिकारी बाबासाहेब वाघमोडे, शिवाजी विद्यापीठाचे माजी प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे उपस्थित राहणार आहेत.

या प्रदर्शनात काही कंद विक्रीसाठी तसेच विविध कंदांच्या पाककृतीही दिली जाणार आहे. कंदांपासून तयार केलेल्या पदार्थांची चवही येथे चाखता येणार आहे. हे प्रदर्शन सर्वांसाठी खुले असून प्रवेश विनामूल्य आहे. यावेळी प्रोजेक्ट चेअरमन सुशांत टक्कळकी, कोचेअरमन अमृता वासुदेवन, गार्डन्स क्लबच्या अध्यक्षा पल्लवी कुलकर्णी, मंजिरी कपडेकर, सुशील रायगांधी, अभिजित पाटील, आरती रायगांधी उपस्थित होते.

# मोदी आवास योजनेत राज्यात सांगली जिल्हा पहिल्या क्रमांकावर

**सांगली :** राज्य शासन पुरस्कृत मोदी आवास योजनेत सांगली जिल्ह्याने राज्यात प्रथम क्रमांक पटकाविला आहे. जिल्हाभरात १९५८ लाभार्थ्यांच्या घरांच्या ... मोदी आवास योजनेत राज्यात सांगली जिल्हा पहिल्या क्रमांकावर, किती प्रस्तावांना दिली मंजुरी.. जाणून घ्यासांगली: राज्य शासन पुरस्कृत मोदी आवास योजनेतसांगलीजिल्ह्याने राज्यात प्रथम क्रमांक पटकाविला आहे. जिल्हाभरात १९५८ लाभार्थ्यांच्या घरांच्या प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली.जिल्हा परिषदेच्याग्रामीण विकास यंत्रणेतर्फे ही माहिती देण्यात आली.

ग्रामीण भागात ही योजना राबविण्यासाठी २०२३-२४ या वर्षांत १९५८ लाभार्थी इतके उद्दिष्टजिल्हा परिषदेलाप्राप्त झाले होते. यामध्ये १९०३ इतके लाभार्थी इतर मागास प्रवर्गातून (ओबीसी) व ५५ लाभार्थी विशेष मागास प्रवर्गातून पूर्ण करायचे होते. ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत यासाठी सर्व तालुक्यांतून प्रस्तावांची पूर्तता करुन घेण्यात आली. त्यांना मंजुरी देऊन १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण करण्यात आले. या लाभार्थ्यांनी घरांची बांधकामे लवकरात लवकर सुरु करावीत असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे यांनी केले.

तालुकानिहाय घरांना मंजुरी मिळालेल लाभार्थी असे: आटपाडी १६२, जत ५२०, कडेगाव ११४, कवठेमहांकाळ १५५, खानापूर ७१, मिरज २४९, पलूस १५०, शिराळा ९३, तासगाव १८९, वाळवा २५५. एकूण १९५८.

# पंढरपूर तालुक्यात ५१ गावांमध्ये २,९४५ मोडी लिपीतील कुणबी नोंदी

**सोलापूर :** पंढरपूर तालुक्यातील ५१ गावांमध्ये २ हजार ९४५ इतक्या मोडी लिपीतील कुणबी नोंदी आढळून आल्या आहेत. या अभिलेखांचे प्रथम स्कॅनींग करण्यात येणार असून, मराठी भाषेमध्ये रुपांतर करुन ते प्रमाणित केल्यानंतर स्कॅनींगच्या पी.डी.फ फाईल संबंधीत गांवच्या नागरीकांना उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. तसेच शासनाच्या अधिकृत संकेत स्थळावर प्रसिध्द करणेत येणार आहे. हे कामकाज प्रगतीपथावर असल्याचे तहसीलदार सुशील बेल्हेकर यांनी सांगितले.पंढरपूर तालुक्यातील सर्व गावांमध्ये मोडी लिपीतील कुणबी नोंदीचे सर्व अभिलेख ड. सुधीर रानडे, ड अशुतोष बडवे, ड संतोष घाडगे, या मोडी लिपी जाणाकारांमार्फत तपासलेल्या आहेत. त्यामध्ये पंढरपूर तालुक्यातील ५१ गावांमध्ये २,९४५ इतक्या मोडी लिपीतील कुणबी नोंदी आढळून आलेल्या आहेत.

या अभिलेखाचे कामकाज प्रगतीपथावर आहे. तालुक्यातील शोधमोहीमेबाबत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद व उपविभागीय अधिकारी गजानन गुरव यांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे विहीत कालावधीत शोधमोहीम राबविलेली आहे.५ लाख ३१ हजार नोंदी तपासल्या

या शोधमोहिमेमध्ये पंढरपूर तालुक्यातील सन १९६० पूर्वीची एकूण ८४ गावांमधील (सध्याची ९५ गावे) सर्व अभिलेखांतील नोंदीची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये एकूण ५, ३१, ०४१ इतक्या मराठी भाषा व मोडी लिपीतील नोंदी तपासण्यात आल्या. त्यापैकी भोसे, कासेगांव, भाळवणी, अजनसोंड, तावशी या गावांमध्ये मराठी भाषेतील ४७९ कुणबी नोंदी आढळून आल्या आहेत. आढळून आलेल्या नोंदींच्या अभिलेखांचे स्कॅनिंग करुन त्याची पी.डी.एफ. गावातील सर्व रहिवाशांना ऑनलाईन प्रणालीवर शासनाचे अधिकृत संकेत स्थळावर उपलब्ध करुन दिले असल्याचे तहसीलदार बेल्हेकर यांनी सांगितले

# महाबळेश्वर गारठले; साताऱ्याचा पारा १२ अंशावर

**सातारा :** जिल्ह्यातील वातावरणात पाच दिवसांपासून शीतलहर असून पारा खालावला आहे. सातारा शहरात तर १२ अंशापर्यंत किमान तापमान आले ... महाबळेश्वर गारठले; साताऱ्याचा पारा १२ अंशावरसातारा : जिल्ह्यातील वातावरणात पाच दिवसांपासून शीतलहर असून पारा खालावला आहे. सातारा शहरात तर १२ अंशापर्यंत किमानतापमानआले आहे. तर महाबळेश्वरही गारठले असून हुडहुडी वाढली आहे. त्यामुळे सध्या नागरिकांना कडाक्याच्या थंडीशी सामना करावा लागत असून जनजीवनावरही परिणाम होऊ लागला आहे.



जिल्ह्यात दरवर्षी नोव्हेंबर महिन्यापासून थंडीला सुरूवात होते. मात्र, यावर्षी थंडीला उशिरा सुरूवात झाली. संपूर्ण नोव्हेंबर महिना थंडीविना गेला. कारण, कायम किमानतापमान२० अंशापर्यंत होते. डिसेंबर महिना उजाडलातरी थंडी कमी होते. पण, डिसेंबरच्या मध्यानंतर थंडी जाणवू लागली. त्यावेळी १३ अंशापर्यंत खाली जिल्ह्याचा पारा आला होता. महाबळेश्वरलाही १२ अंशापर्यंत तापमान घसरले होते. पण, दोन दिवसांतच पारा वाढत गेला. त्यामुळे थंडीही गायब झाली होती.

परिणामी यंदा कडाक्याची थंडी पडणार नाही असा अंदाज बांधण्यात येत होता. मात्र, देशाच्या उत्तर भागात सध्या बर्फ पडत आहे. तसेच जम्मू, दिल्ली, पंजाबात पारा घसरल्याने जनजीवनावर परिणाम झाला आहे. तसाच प्रकार सातारा जिल्ह्यातही सुरू झाला आहे. पाच दिवसांपासून वातावरणात शीतलहर असल्याने अंगातून थंडी जाईना अशी स्थिती आहे. त्यामुळे एकप्रकारे थंडीची लाटच आल्याचे चित्र आहे.

सातारा शहरात तर गेल्या काही दिवसांपासून किमान तापमान १५ अंशाखाली आहे. गुरुवारी १२ अंश पारा नोंद झाला. तर महाबळेश्वचा पाराही ११.९ अंश नोंद झाला. शीतलहर आणि पारा घसरल्याने थंडीत वाढ झाली आहे. यामुळे दैनंदिन जीवनावर परिणाम झाला आहे. सकाळच्या सुमारास फिरणाऱ्यांची संख्याही कमी झाली आहे. तर शेतीच्या कामावर अधिक परिणाम झाला आहे. शेतकरी सकाळी दहानंतरच शेतातील कामे उरकत आहेत. तर शहरातील बाजारपेठेवरही परिणाम झाला आहे. या थंडीमुळे ग्रामीण भागही गारठला आहे. तर महाबळेश्वर हे थंड हवेचे ठिकाण आहे. तेथे तर गेल्या काही दिवसांपासून कडाक्याच्या थंडीशी नागरिक तसेच पर्यटकांना सामना करावा लागतोय. आणखी काही दिवस कडाक्याची थंडी राहील, असा अंदाज आहे.सातारा शहरात नोंद किमान तापमान..

दि. १ जानेवारी १३.७, २ जानेवारी १४.१, ३ जानेवारी १५.४, ४ जानेवारी १६.५, ५ जानेवारी १७.२. ६ जानेवारी १७.५, ७ जानेवारी १७.२. दि. ८ जानेवारी १६.६, ९ जानेवारी २०.२, १० जानेवारी १८.१, दि. ११ जानेवारी १७.४, १२ जानेवारी १६.१, १३ जानेवारी १५.५, १४ जानेवारी १५.८, दि. १५ जानेवारी १४.५, १६ जानेवारी १२.४, १७ जानेवारी १३, १८ जानेवारी

# खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी 'अमृत' योजना

**जळगाव :** खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना शासनाच्या इतर कोणत्याही विभाग, महामंडळ, संस्था यांच्याकडून लाभ मिळत नाही, अशा आर्थिक दुर्बल घटकांच्या सामाजिक व आर्थिक उन्नतीसाठी 'अमृत' (महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी, पुणे) या संस्थेची राज्य सरकारने स्थापना केली आहे. या संस्थेच्या अंतर्गत असलेल्या विविध योजनांची माहितीजळगावातदेण्यात आली.जळगाव येथे बुधवारी (दि.१७) समाजातील मान्यवर व लाभार्थ्यांसोबत बैठक, विविध प्रशासकीय अधिकार्यांशी चर्चा आदींचे आयोजन करण्यात आले होते.



'अमृत' हा राज्य सरकारचा महत्वकांक्षी प्रकल्प आहे, या संस्थेच्या लाभार्थ्यांनी संस्थेच्या विविध योजनांचा लाभ घेऊन आपले जीवनमान उंचवावे व आपली उन्नती करावी, विविध योजनांसाठी आवश्यक कागदपत्रांची माहिती घेऊन स्वतंत्र अर्ज दाखल करावेत, असे आवाहन 'अमृत' संस्थेचे अधिकारी व जळगाव, धुळे-नंदूरबार जिल्ह्यांचे पालक अधिकारी हरिष भामरे यांनी केले.माहितीसाठी संकेतस्थळ उपलब्धखुल्या प्रवर्गातील परंतु आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील ज्या लाभार्थ्यांना सरकारच्या इतर संस्था, महामंडळ अथवा योजनांचा लाभ मिळत नाही, अशा लाभार्थ्यांनी विविध योजनांचा लाभ घेत असताना अधिक माहितीसाठी ु.ारहरर्रािी.ेस.ळप या संकेतस्थळाला भेट द्यावी, या संकेतस्थळावर वेळोवेळी माहिती दिली जाणार आहे, असेही भामरे यांनी सांगितले.

याप्रसंगी द्वारकाधीश जोशी,विभागीय समन्वयक दीपक जोशी, जळगाव जिल्हा समन्वयक राजेंद्र कानडे, शामकात कलभंडे, कमलाकर फडणीस, नीलेश राव, उदय खेडकर, प्रविण कुलकर्णी, अशोकवाघ आदींसह जळगाव, भुसावळ, फैजपूर येथील लाभार्थ्यांची उपस्थिती होती.

'अमृत'मध्ये या आहेत योजनामहाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या राज्यसेवा पूर्व व मुख्य परीक्षेसाठी निवड झालेल्या उमेदवारांना अर्थसहाय्य देणे, संघ लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा पूर्व आणि मुख्य परीक्षेसाठी निवड झालेल्या उमेदवारांना अर्थसहाय्य देणे, आर्थिक विकासाकरिता प्रोत्साहन व प्रशिक्षण कार्यक्रम राबवून स्वावलंबी बनविणे, स्वयंरोजगारासाठी या घटकाला प्रोत्साहन देणे व लघुउद्योग निर्मितीस चालना देणे, कृषी उत्पन्न आधारित लघुउद्योग सुरू करण्यासाठी प्रशिक्षण देऊन स्वावलंबी बनविणे, कौशल्यविकास प्रशिक्षण व नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी समन्वय साधणे आदी 'अमृत'च्या योजना आहेत.

# रमेश उबाळे यांच्यावर कारवाई करा

## नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष यांच्यासह नगरसेवकांची जिल्हा प्रशासनाकडे मागणी...

**कोरेगाव :** कोरेगाव शहरात कधी नव्हे एवढ्या प्रमाणात सर्वसामान्य लोकांना अभिप्रेत असलेली विकास कामे सुरू आहेत. सर्वसामान्य जनता हीच विकास कामांबद्दलची क्वालिटी कंट्रोलरची भूमिका बजावत असताना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष रमेश उबाळे हे विशिष्ट हेतूने आणि व्यक्ती देशातून कोरेगाव नगरपंचायतीची बदनामी करण्याचा प्रयत्न करत आहेत. कोरेगाव शहराची नाहक बदनामी करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नगराध्यक्षा दिपाली महेश बर्गे व उपनगराध्यक्ष सुनीलदादा बर्गे यांच्यासह १३ नगरसेवक व नगरसेविकांनी जिल्हा प्रशासनाकडे केली आहे.

गुरुवारी दुपारी एक वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील यांची जिल्हा नियोजन समितीचे सदस्य राहुल प्रकाश बर्गे, कोरेगाव विकास आघाडीचे अध्यक्ष तथा प्रथम नगराध्यक्ष प्रशांत उर्फ राजाभाऊ बर्गे, पंचायत समितीचे माजी सदस्य तथा भारतीय जनता पक्षाच्या अनुसूचित जाती जमाती मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष रवींद्र बोतालजी, नगराध्यक्षा दिपाली महेश बर्गे, उपनगराध्यक्ष सुनील बर्गे, माजी नगरसेवक महेश साहेबराव बर्गे, माजी उपनगराध्यक्ष व स्वीकृत नगरसेवक जयवंत पवार, नगरसेवक राहुल रघुनाथ बर्गे, साईप्रसाद बर्गे, सागर बर्गे, सागर वीरकर, राजेंद्र वैराट, परशुराम बर्गे, वनमाला बर्गे, संगीता ओसवाल, शितल बर्गे, संजीवनी बर्गे, स्नेहल आवटे, स्वीकृत नगरसेवक फिरोज काझी, माजी नगरसेवक सचिनभैय्या बर्गे, शिवसेना शिंदे गट कोरेगाव शहर प्रमुख महेश शामराव बर्गे, अनिकेत सूर्यवंशी व संजय दुबळे यांनी भेट घेतली व कोरेगाव नगरपंचायतीच्या विकास प्रक्रियेत अडथळा आणून कोरेगाव शहराची नाहक बदनामी करणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष रमेश उबाळे यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली.

यावेळी त्यांनी रमेश उबाळे हे केवळ कोरेगावातच नव्हे तर सातारा जिल्ह्यातील विविध विकास कामांवर आक्षेप घेऊन खोटी आंदोलने करण्याचा प्रयत्न करत आहेत, ते प्रशासनास वेठीस धरत आहेत. आजवर त्यांनी अधिकाऱ्यांवर केलेले आरोप व केलेली वेगवेगळी आंदोलने पाहता त्यांचा काय दृष्टिकोन असू शकतो, हे संपूर्ण सातारा जिल्ह्याला सर्वज्ञात झाले असल्याचेही या पदाधिकारी व नगरसेवकांनी निदर्शनास आणून दिले.

कोरेगाव शहरात सुरू असलेल्या विकास कामांची जिल्हा प्रशासनाने स्वतंत्र पथकामार्फत पाहणी करावी, विकासकामांमध्ये चुकीचे काही आढळल्यास योग्य ती कार्यवाही करावी, मात्र अनेक वर्षात कोरेगाव शहरात झाली नव्हती एवढी मोठ्या प्रमाणावर विकास कामे सुरू असल्याने यामध्ये चुकीचे काही निदर्शनास न आल्यास रमेश उबाळे यांच्यावर कडक कारवाई करण्याचे आदेश संबंधित यंत्रणेला द्यावेत, त्याचबरोबर कोरेगाव नगरपंचायतीची आणि संपूर्ण शहरांची नाहक बदनामी थांबवण्यासाठी संबंधितांवर तात्काळ कार्यवाही करावी, अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे. यावेळी पदाधिकारी व नगरसेवकांनी सर्व वस्तुस्थिती निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील यांच्या निदर्शनास आणून दिली. राज्य सरकार व जिल्हा परिषद आपल्या निवेदनावर योग्य ती कार्यवाही करेल, अशी ग्वाही नागेश पाटील यांनी दिली.



### बदनामी न थांबवल्यास वेळ प्रसंगी गुन्हा दाखल करणार

**मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे व आमदार महेश शिंदे यांच्या माध्यमातून कोरेगाव शहरात ४०० कोटी रुपयांची विकास कामे सुरू आहेत. ही सर्व कामे दर्जेदार सुरू असून रमेश उबाळे हे जाणीवपूर्वक आंदोलन करून शहराची बदनामी करत आहेत. त्यांनी बदनामीचे सत्र न थांबवल्यास जशास तसे उत्तर दिले जाईल. वेळप्रसंगी शहरातील बदनामी केली म्हणून त्यांच्या गुन्हा दाखल करू, असा इशारा नगराध्यक्षा दिपाली महेश बर्गे यांनी दिला.**

**- नगराध्यक्षा : दिपाली महेश बर्गे**

### रमेश उबाळे यांच्या आंदोलनामागील बोलवता धनी वेगळाच

**कोरेगाव नगरपंचायत निवडणुकीदरम्यान सर्वसामान्य मतदारांवर प्रभाव टाकण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेतेमंडळींनी कोणत्याही प्रकारची प्रशासकीय मंजुरी अथवा तांत्रिक मान्यता न घेता आचारसंहिता कालावधीत निकृष्ट दर्जाची विकासकामे केली होती. विशेष करून प्रभाग क्रमांक १७ मध्ये अशी कामे झाले आहेत. नगरपंचायतीत आमदार महेश शिंदे यांच्या नेतृत्वाखाली कोरेगाव विकास आघाडीची सत्ता आल्यामुळे आपली बिले निघणार नाहीत, या विवंचनेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी होते. त्यांनी मुख्याधिकाऱ्यांवर मोठा दबाव आणून बिले काढण्याची मागणी केली, मात्र कोणत्याही प्रकारची प्रशासकीय मान्यता अथवा तांत्रिक मान्यता नसताना बेकायदेशीररित्या केलेल्या विकासकामांची बिले काढण्यास स्पष्ट नकार देत असलेल्या मुख्याधिकारी दबावाला बळी पडल्या नाहीत. मुख्याधिकाऱ्यांनी काटेकोर भूमिका घेतल्यानेच रमेश उबाळे यांनी वेगळ्याच मार्गाने आंदोलन करत कोरेगाव शहराची बदनामी सुरू केली आहे. रमेश उबाळे यांच्या आंदोलनामागील बोलविता धनी वेगळाच असून त्यांच्या आंदोलनस्थळी केवळ मोजकेच लोक आहेत. सर्वसामान्य जनतेचा या आंदोलनाला अजिबात पाठिंबा नाही. ठराविक ऑफिसमधून आंदोलनाच्या ठिकाणी जावे म्हणून निरोप दिले जातात, असा आरोप सुनील बर्गे यांनी केला. रमेश उबाळे यांचा कोणत्याही प्रकारचा उद्योग व्यवसाय नाही, तरीदेखील ते आपल्या पत्नीच्या सरकारी नोकरीतील पदाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर ज्ञात स्त्रोत्रापेक्षा अन्य मार्गाने जास्त उत्पन्न मिळवत आहेत. त्यांच्या मालमत्तेची जरूर ती चौकशी झालीच पाहिजे. सातारा शहरानजिक खेड ग्रामपंचायत हद्दीत सुरू असलेल्या उबाळे यांच्या बेकायदेशीर इमारत बांधकामाची तात्काळ चौकशी झालीच पाहिजे. सातारा जिल्ह्यात आंदोलना बाबतीत सुपारी बहाद्दर असलेल्या रमेश उबाळे यांनी आजवर केलेल्या आंदोलनांची आणि त्यानंतरच्या बदललेल्या भूमिकेची, केलेल्या सेटलमेंटची निपक्षपातीपणे चौकशी करून त्यांचा खरा चेहरा समाजापुढे आणला पाहिजे, अशी मागणी सुनील बर्गे यांनी जिल्हा प्रशासनाकडे केली आहे.**

**- उपनगराध्यक्ष सुनील बर्गे**

# उंची वाढवण्यासाठी वाट्टेल तेवढे प्रयत्न



ग्रोथ हार्मोनची कमतरता असलेल्या व्यक्तींना तज्ज्ञ डॉक्टरांच्या सल्ल्याने उपचार म्हणून हे ग्रोथ हार्मोन गरजेचे असते. उंची कमी असलेल्या अनेकांमध्ये न्यूनगंड असतोच. त्यात हल्ली उंच मुली सौंदर्य स्पर्धा, मॉडेल यासारख्या करिअरमध्ये यशस्वी होतात असे बिंबवले जाते. उंची उत्तम असणं हा प्लस पॉइण्ट मानला जातो. अनेकजण उंची वाढवण्यासाठी वाट्टेल तेवढे प्रयत्नही करतात. पण खरंच उंची वाढवणं आपल्या हातात असतं का?

ते सगळं ठरवतात आपले हार्मोन्स. माणसाच्या उंची करता मुख्यतः जवाबदार असणारे हार्मोन म्हणजे ग्रोथ हॉर्मोन. मेंदूच्या तळाशी वाटाण्याच्या आकाराची असलेली पिट्युटरी ग्रंथी हे हार्मोन तयार करत असते. हे हार्मोन काही प्रमाणात आपल्या इतर अवयवांच्या वाढी करता गरजेचे असते. हे हार्मोन शरीरात जास्त झाले तर त्याचे होणारे दुष्परिणामपिट्युटरी ग्रंथीतुन तयार होणारे हे हार्मोन पेशींची वाढ करते म्हणूनच त्याचे नाव ग्रोथ हार्मोन असे पडले.

आहे. हे ग्रोथ हार्मोन लिव्हरला खत्र्क्ष्र नावाचे दुसरे हार्मोन तयार करण्यासाठी प्रवृत्त करते. खत्र्क्ष्र हा स्नायू हृदय, हाडे यांच्या वाढीला मदत करतो. त्यामुळे आपली उंची तर वाढतेच पण बांधा देखील मजबूत होतो. अश्या रीतीने वयाप्रमाणे हे दोन्ही हार्मोन्स वाढत जातात व त्यामुळे एक विशिष्ट उंची आणि बांधा तयार होतो. कुपोषण व मानसिक ताण असल्यास त्याचा परिणाम लिव्हरच्या क्षमतेवर होतो व ग्रोथ हार्मोन जरी मुबलक असले तरी खत्र्क्ष्र ची कमतरता निर्माण होते. त्यामुळे लहान मुलांना त्यांच्या वाढीच्या काळात योग्य पोषक आहाराबरोबर मानसिक संतुलन सांभाळणे देखील गरजेचे ठरते. या दोन्हीही गोष्टी मिळाल्यास मुलांची वाढ योग्य प्रकारे होते.

योग्य प्रमाणातील ग्रोथ हार्मोन- IGF1 वाढीसाठी उपयुक्त आहे हे आपण पहिले. परंतु त्याचे प्रमाण वाढले.

तर त्याचे देखील दुष्परिणाम होतात. पिट्युटरी ग्रंथी मधील ट्युमर झाल्यास हे हार्मोन अधिक प्रमाणात वाढते व या आजाराला अक्रोमेगाली असे म्हटले जाते. जगभरात प्रसिद्ध असलेला थथक्र चा खेळाडू खली यास हा आजार आहे. या आजारात उंची बरोबर, हात, पाय, स्नायू हाडे व जबडा या सगळ्यांची असामान्य वाढ होते.

ग्रोथ हार्मोनचा शरीरात वाढी साठी उपयोग होतो. त्यामुळे ग्रोथ हार्मोनच्या इंजेक्शनांचा जिम व खेळाडूंमध्ये गैर वापर वाढू लागला आहे. साधारणतः पिट्युटरी ट्युमर मुळे होणाऱ्या अक्रोमेगाली या आजारा सारखी लक्षणे या गैर वापरामुळे देखील दिसायला लागली आहेत. त्यामुळे खेळाडूस फायदा तर होत नाहीच उलट नुकसानच होते. अक्रोमेगाली या आजारात काही विशेष लक्षणे दिसतात. या शब्दाचा जणू अर्थच म्हणजेच अक्रो म्हणजे बोटे व मेगाली म्हणजे मोठी! लहानमुलांमध्ये त्यांच्या असामान्य उंची वरून हा आजार ओळखला जाऊ शकतो. या आजारातील व्यक्तींचे पंजे मोठे असतात व बुटाचा नंबर २० व्या वर्षांनंतर देखील वाढतो.

काही लोकांच्या खालच्या जबड्यामध्ये असामान्य वाढ दिसते. खास करून स्त्रियांमध्ये पाळीचे आजार व गर्भधारणा न होणे हे देखील या आजाराचे लक्षण आहे. प्रचंड सततचे डोके दुखी, घामाचा अतिरेक, गुडघे व सांधे दुखी ही देखील या आजाराची लक्षणे असू शकतात. ग्रोथ हार्मोन- खत्र्क्ष्र अधिक मात्रेत असल्याय ते कॅन्सरचा धोका निर्माण होऊ शकतो.

सर्वसाधारणपणे हा आजार आढळून येत नाही त्यामुळे अनेक वेळा याचे निदान होण्यास उशीर होतो. वेळेत

निदान झाल्यास योग्य उपचाराने हा नियंत्रणात ठेवता येतो. अधिक ग्रोथ हार्मोनने उंची नक्कीच वाढते पण याचे शरीरावर इतर जीवघेणे दुष्परिणाम होऊ शकतात.

हा आजार अधिक सामान्य नसला तरीही उंचीच्या व शरीर वाढीच्या हव्यासापोटी या ग्रोथ हार्मोनचा गैर वापर वाढला आहे. अवैध परंतु सहज उपलब्ध असलेल्या या ग्रोथ हार्मोनचा गैरवापर जिम व क्रीडा क्षेत्रात वाढलेला आढळतो. या गैर वापरामुळे आजार नव्हे पण आजारासदृश दुष्परिणाम आपल्याला भोगावे लागू शकतात. हे लक्षात घेऊन खास करून तरुणांनी स्वतः तर दूर रहावेच व जवळपासच्या व्यक्तींना या पासून परावृत्त करावे.

मात्र ग्रोथ हार्मोनची कमतरता असलेल्या व्यक्तींना तज्ज्ञ डॉक्टरांच्या सल्ल्याने उपचार म्हणून हे ग्रोथ हार्मोन गरजेचे असते.




# रोहित शर्मा ट्वेंटी-२० वर्ल्ड कप खेळणार

रोहित शर्माचे वादळ काल बंगळुरूच्या एम चिन्नास्वामी स्टेडियमवर घोंगावले. ६९ चेंडूंतील १२१ धावांच्या नाबाद खेळीत त्याने ११ चौकार व ८ षटकारांची आतषबाजी केली. १४ महिन्यानंतर भारताच्या ट्वेंटी-२० संघात परतलेल्या रोहितला पहिल्या दोन सामन्यांत भोपळाही फोडता आला नाही, परंतु तिसऱ्या सामन्यात त्याने सर्व उणीव भरून काढली. भारताचे ४ फलंदाज २२ धावांवर माघारी परतले असताना रोहित खंबीर उभा राहिला आणि रिंकू सिंगसह १९० धावांची भागीदारी करून संघाला २१२ धावांपर्यंत पोहोचवले.

अफगाणिस्ताननेही टफ फाईट दिली. दोन सुपर ओव्हरपर्यंत रंगलेल्या या सामन्यात रोहितच्या चतूर निर्णयाने कमाल केली. रवी बिश्नोईला दुसऱ्या सुपर ओव्हरमध्ये षटक देण्याचा रोहितचा निर्णय सर्वांना अचंबित करणारा होता, परंतु त्याने भारताचा विजय पक्का झाला. २०२२च्या ट्वेंटी-२० वर्ल्ड कप उपांत्य फेरीच्या सामन्यानंतर रोहित व विराट कोहली या फॉरमॅटपासून लांब होते. या कालावधीत बीसीसीआयने हार्दिक पांड्याकडे ट्वेंटी-२० संघाचे नेतृत्व सोपवले. सूर्यकुमार यादव, लोकेश राहुल यांनीही कर्णधारपद सांभाळले. पण, वन डे वर्ल्ड कप स्पर्धेतील रोहितचे नेतृत्व व कामगिरी पाहून पुन्हा एकदा त्याला ट्वेंटी-२० संघाचे नेतृत्व सांभाळण्याची जबाबदारी दिली गेली.

भारतीय संघ आता थेट ट्वेंटी-२० वर्ल्ड कप स्पर्धेत उतरणार आहे. त्यामुळेच अफगाणिस्तानविरुद्धची मालिका ही महत्त्वाची होती. जूनमध्ये होणाऱ्या वर्ल्ड कप स्पर्धेत कोणते खेळाडू खेळतील, हे या मालिकेतून सर्वांना कळणार होते. त्याचवेळी रोहितनेही आता ट्वेंटी-२० वर्ल्ड कप जिंकण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगून चाहत्यांना खूश केले. रोहितच्या या विधानाने तोच वर्ल्ड कप मध्ये संघाचा कर्णधार असेल, हे स्पष्ट होत आहे.

ट्वेंटी-२० वर्ल्ड कप २०२४ च्या संघ निवडीबाबत जिओ सिनेमाशी बोलताना रोहित म्हणाला, आम्ही अद्याप १५ खेळाडूंचा संघ निश्चित केलेला नाही, परंतु आमच्या मनात ८ ते १० खेळाडूंची नावे आहेत. आम्ही परिस्थितीनुसार संघाची जुळवाजुळव करू. वेस्ट इंडिजमध्ये खेळपट्टी संथ आहे, त्यामुळे आम्हाला त्यानुसार संघ निवडावा लागेल.

तो म्हणाला, तुम्ही १५ खेळाडूंना आनंदी ठेवू शकत नाही. बेंचवर बसलेले चार खेळाडूंना आपण का खेळत नाही, असा प्रश्न विचारतात? मी शिकलो आहे की तुम्ही सर्वांना आनंदी ठेवू शकत नाही आणि तुमचे लक्ष संघाच्या ध्येयावर असले पाहिजे. टीम इंडियाला ५ जूनला वर्ल्ड कपमध्ये आयर्लंडचा सामना करायचा आहे, यानंतर ९ जूनला त्यांची टक्कर पाकिस्तानशी होणार आहे. १२ व १५ जूनला भारतीय संघ अनुक्रमे अमेरिका व कॅनडा यांचा सामना करेल.

# कुठेही घेवून जावू शकाल हे हाऊस



घर घ्यायचे म्हटले की आधी पैशांचा, मग लोन घेण्याचा विचार आणि टेन्शन येते. प्लॉट घ्यायचा म्हटले तरी टेन्शन येते. पण आता या दोन्ही गोष्टींचे तुमचे टेन्शन दूर होणार आहे. कारण आता मुव्हेबल घरांचा ट्रेन्ड येऊ लागला आहे. अमेरिकेमध्ये अशी घरे आली सुद्धा आहे. हे घर तुम्ही कुठेही घेऊन जाऊ शकता आणि कुठेही राहू शकता.

हे घर १०६ स्केअर फूटाचे असून नॉर्थ अमेरिकेत या घरांचा ट्रेन्ड वाढतो आहे. इथे अशा प्रकारची घरे घेऊन लोक डोंगरांमध्ये राहत आहेत. कारण त्यांना हव्या त्या ठिकाणी रहायला मिळत आहे.

हे लाकूड आणि फायबरपासून तयार करण्यात आलेले एक कॅबिन आहे. कधी ते याला त्यांचे ऑफिस बनवतात तर कधी घर बनवतात. या घराची किंमत १९ हजार यूरो म्हणजे भारतीय करन्सीच्या हिशोबाने १६ लाख रुपये आहे.

एकीकडे काही लोक आपल्या गरजांची लिस्ट वाढवत आहे तर दुसरीकडे काही लोक हे आपल्या गरजा कमी करु लागले आहेत. हे घर त्यांच्यासाठीच फायद्याचे आहे. काही वर्षांनी ही घरे भारताताही आली तर नवल वाटायला नको.

# यासाठी प्लॅस्टिक स्ट्रॅने कधीच पेय पिऊ नये

सॉफ्ट ड्रिंक्स ऑर्डर केल्यानंतर प्यायचं कसं असा मोठा प्रश्न आपल्या समोर असतो. तेव्हा आपण स्ट्रॉचा उपयोग करतो. आपण जेव्हाही बाहेर जातो तेव्हा खाण्यासोबत आपण एखादं सॉफ्ट ड्रिंकही ऑर्डर करतो. मग ते स्मूदी असो, ज्यूस असो किंवा एखादं मॉकटेल.

जेवणासोबत आपण जेव्हा या गोष्टी ऑर्डर करतो. तेव्हा जेवणाचा खरा आनंद घेतल्याचं सुख मिळतं. आता सॉफ्ट ड्रिंक्स ऑर्डर केल्यानंतर प्यायचं कसं असा मोठा प्रश्न आपल्या समोर असतो. तेव्हा आपण स्ट्रॉचा उपयोग करतो. तेव्हा आपण स्ट्रॉचा उपयोग करतो. हा स्ट्रॉ प्लॅस्टिकचा असतो, जो तुमच्या शरिरासाठी अपायकारक असतो. हा स्ट्रॉ प्लॅस्टिकचा असतो, जो तुमच्या शरिरासाठी अपायकारक असतो. तेव्हा प्लास्टिकचे स्ट्रॉ कधीही न वापरणे हेच आपल्या आरोग्यासाठी चांगलं ठरणार आहे.

